मुलींच्या शाळांत बक्षिसाकरितां व
...साठीं मंजूर केलें आहे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

सचित्र

# सुमनांजलि



REFBK-0004239

किंमत सहा आणे

BOMBAY VAIBHAV PRESS

स्था०

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

(योग्य भेट)

२५.११.३०

मराठी ग्रंथ संग्रहालय

ठाणे

मुंबई विद्याखात्यानें मुलींच्या शाळांत बक्षिसाकरितां व लायब्ऱ्यांसाठीं मंजूर केलें आहे.

# सचित्र सुमनांजलि

## ( ८५ नवीन सुबोध गाणीं )



ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ४२३९
REFBK-0004239

लेखिका—श्री. कृष्णाबाई पाटील

आवृत्ति दुसरी

कार्तिक, शके १८५२ सन १९३०

किंमत सहा आणे

मुद्रकः—रघुनाथ रामचंद्र बखले, मुंबईवैभव प्रेस,
सँढर्स्ट रोड, गिरगांव मुंबई, नं. ४.

प्रकाशकः—केशव भिकाजी ढवळे, ( रामचंद्र बिल्डिंग )
गिरगांव-मुंबई.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

# अनुक्रमणिका

## भाग १ ला


| नांव. | पृष्ठ | नाव. | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ श्रीगणपति | १ | १७–१८ श्रीदत्त | १४–१५ |
| २—८ श्रीविठोबा | २–६ | १९ श्रीशंकर | १६ |
| ९–१५ श्रीराम | ७–१२ | २० श्रीअंबिका | १६ |
| १६ श्रीकेशवराज | १३ | २१ श्रीमारुती | १७ |


## भाग २ रा


| | | | |
|---|---|---|---|
| २१ श्रीरामजन्म | १८ | ३७ पूर्वस्मृति | ३३ |
| २३ श्रीमारुतिजन्म | १९ | ३८ सीतात्याग | ३५ |
| २४ अहिल्योद्धार | २० | ३९ सीतावनवासवृत्त कथन | ३६ |
| २५ दशरथनिधन | २१ | ४०–४१ धांवा द्रौपदीचा | ४१–४२ |
| २६–२७ भरतभाव | २२–२३ | ४२ चुडेदान | ४२ |
| २८ रामकीर्ति | २५ | ४३ सावित्री चरित्र | ४४–५० |
| २९ पार्वतीगर्वहरण | २६ | ४४ स्थालीपाक | ५१ |
| ३० रामाचा शोक | २७ | ४५ दुर्वासभिक्षा | ५२ |
| ३१ सीतेचा निरोप | २८ | ४६ कृष्णजन्म | ५३ |
| ३२ लक्ष्मणशक्ति | २९ | ४७ रुक्मिणीचे विचार | ५५ |
| ३३ रावण जानकी संवाद | ३० | ४८ ध्रुवस्तुति | ५६ |
| ३४ रावणास विश्वरूप दर्शन | ३१ | ४९ गजेंद्रमोक्ष | ५७ |
| ३५–३६ मुद्रिका | ३२–३३ | ५०–५१ अक्रूर | ५८–६० |
| | | ५२ रुक्मिणी स्वयंवर | ६० |

| नांव | पृष्ठ |
|---|---|
| ५३ कात्यायनी व्रत | ६२ |
| ५४ उद्धव | ६३ |
| ५५ सुदाम चरित्र | ६४ |
| ५६ प्रल्हाद चरित्र | ६५ |
| ५७ शंकराचार्य जन्म | ६७ |
| ५८ मैनावतीचा उपदेश | ६८ |
| ५९ मिराबाई | ६९–७२ |
| ६० सखूबाई | ७२–७४ |


## भाग ३ रा


| | |
|---|---|
| ६१–६२ मनास बोध | ७५–७६ |
| ६३–६५ जिव्हेस प्रार्थना | ७६–७८ |
| ६६ पंचविषय | ७८ |
| ६७ माझें सासर | ७८ |
| ६८ माहेरचें मूळ | ७९ |
| ६९ तुळशी वृंदावन | ८० |
| ७० संसार | ८१ |
| ७१ भाऊबीज | ८३ |
| ७२ परीक्षा | ८३ |
| ७३ नवरात्र | ८४ |
| ७४ हलवा | ८५ |
| ७५ शंकर झालेला राम | ८५ |
| ७६ संतमालिका | ८६ |
| ७७-७८ कथेचें वेड | ८६–८९ |
| ७९ नाशिक येथील टिळकांची स्वारी | ८९ |
| ८० अक्कलकोट | ९० |
| ८१ यशोदागोदोहन | ९१ |
| ८२ स्वप्न | ९१ |
| ८३ चहा | ९१ |
| ८४ मंगळागौर | ९२ |
| ८५ ,, आरती | ९३ |

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

सांसारिक आपत्तीशीं झगडतांना येत असलेल्या मनस्तापाचे शमनार्थ महाराष्ट्र संत कवींचे प्रासादिक ग्रंथ वाचण्याचा क्रम ठेविला. अशा रीतीनें काळ घालवीत असतां, आपण "**वेडें वांकुडें गाईन परी तुझा म्हणवीन**" या साधूक्तीप्रमाणें यथाशक्ति परमेश्वराचे गुणानुवाद गावे अशी आवड उत्पन्न झाली, त्याचेंच दृश्य फल सुमनांजलि होय. याचे एकंदर तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांत गणपति, विठोवा, राम वगैरे देवांचीं स्तुतिपर गाणीं आहेत. दुसऱ्यांत रामायण, भारत, भागवत व इतर ग्रंथ यांतील निरनिराळ्या पौराणिक प्रसंगावर पदें कटाव वगैरे निरनिराळे छंदांतील गाणीं आहेत. तिसऱ्या भागांत उपदेशपर, व्यवहारांतील प्रसंग रूपकानें स्पष्ट केलेले, व इतर किरकोळ प्रासंगिक रचना आहे. तीन्ही भागांत मिळून एकंदर ८५ गाणीं आहेत. वहुतेकांवर साधारण स्त्री वर्गास समजतील अशा चाली दिलेल्या आहेत. या सुमनांजलीचा माझ्या भगिनींकडून हंसक्षीर न्यायानें आदर होईल अशी आशा आहे.

**ग्रंथकर्त्री.**

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आठ वर्षांनीं कां होईना कै. कृष्णाबाईच्या गाण्यांचा पुनर्मुद्रणयोग आला यावद्दल आनंद वाटतो. सन १९२२ त सुमनांजलीची प्रथमावृत्ति निघाली व १९२४ त मुंबई इलाख्याच्या विद्याखात्यानें हें पुस्तक मुलींच्या शाळेकरितां "लायब्ररी पुस्तक व" "वक्षीस पुस्तक" म्हणून मंजूर केलें. या आवृत्तींत पहिल्या आवृत्तींत चुकून राहिलेले ऱ्हस्व दीर्घादि मुद्रणदोष काढून टाकले आहेत. ठिकठिकाणीं देवांचीं चित्रें घातलीं आहेत. शिवाय गाण्यांना संदर्भ सूचक टीपा जोडल्या आहेत. यामुळें पृष्ठ संख्या दाडपटीनें वाढली आहे. परंतु किंमत पूर्वीच्या निम्मपट म्हणजे सहा आणे ठेविली आहे. तेव्हां ज्ञान, बोध व मनोरंजन यांचा एकसमयावच्छेदेंकरून लाभ करून देणाऱ्या या ग्रंथाचें भगिनीवर्गाकडून योग्य स्वागत होईल अशी आशा आहे.

मुंबई, कार्तिक शु.<br>
द्वितीया शके १८५२.

**प्रकाशक**

# ग्रंथकर्त्रींचा अल्प परिचय.

कृष्णाबाईचा जन्म मुंबईत कऱ्हाडे ब्राह्मण कुळांत सन १८८५ त झाला. वडिलांचें नांव महादेवराव वाके. यांस एका वकिलाचे कचेरींत हिशोबी कारकुनाची नोकरी होती. कृष्णाबाईचा विवाह अगदीं लहानपणीं म्हणजे वयाच्या नवव्या वर्षी झाला असून तिचे पति परशुराम नरहर पाटील हे अलीबागेजवळ आक्षी म्हणून एक गांव आहे तेथील असून इंग्रजी शिक्षण घेत होते. त्यांचें शिक्षण वगैरे आटोपून नोकरी धंद्यास सुरवात होते न होते तोंच प्लेगचें निमित्त होऊन सन १९०० सालीं त्यांस देवाज्ञा झाली व कृष्णाबाईवर अल्पवयांत–१६ वे वर्षी–वैधव्याची आपत्ति कोसळली. त्या वेळीं वडील मातुश्रींनीं स्वतःचें दुःख गिळून मुलीचें उपदेशाच्या गोष्टी सांगून समाधान केलें व तिचें आयुष्य सन्मार्गांत जावें म्हणून कथा पुराणें व संत कवींचे ग्रंथ यांची गोडी तिचे अंतःकरणांत उत्पन्न केली व तिजकडून रोज रामविजय, पांडव–प्रताप, हरिविजय, भक्तविजय वगैरे पौराणिक व भक्तिपर ग्रंथ वाचून घेण्याचा परिपाठ ठेवला. कृष्णाबाईच्या शिक्षणाची ( शाळेंतील ) मजल जरी मराठी चवथ्या पुस्तका पलीकडे गेली नाहीं तरी श्रीधर, महीपति यां सारख्या प्रासादिक कवींच्या अध्ययनानें तिच्या ज्ञानांत भर पडून मोरोपंत, वामन, मुक्तेश्वर यांचे ग्रंथ वाचावे असें तिला वाटूं लागलें. त्याप्रमाणें मोरोपंती भारत तिच्या वाचनांत आलें. तेव्हां पासून आपणहि कांहीं पद्यरचना करावी असें तिच्या मनांत आलें व मुंबईतील ठाकुरद्वार व आसपासचीं राममंदिरें, खानदेशांतील तिच्या बंधूंच्या गांवीं असलेलीं विठ्ठल, केशवराज व दत्त यांचीं मंदिरें व आक्षीचें–श्वशुरांचे गांवचें–विठोबाचें देऊळ अशांच्या वर्णनांपासून सुरवात होऊन आख्यानें, इतर प्रासंगिक गोष्टी वगैरे निरनिराळ्या विषयांवर कविता होऊं लागल्या. कोणतें पद केव्हां रचलें हें समजण्याला तूर्त कांहीं साधन उपलब्ध नाहीं. असो अशा रीतीनें वैधव्याचे दिवस लोटीत असतां तिची प्रकृति बिघडूं लागली. तेव्हां केलेल्या कविता छापून काढाव्या म्हणजे वाचतां येणाऱ्या स्त्रियांना त्यांचा फायदा घेतां येईल व बोध व करमणूक हीं एकाच वेळीं मिळतील याहेतूनें जेवढीं पदें मिळालीं तेवढीं घेऊन छापण्यास सुरवात केली. परंतु छापलेलीं ४८ पृष्ठें पुरीं होतात तोंच कृष्णाबाईस देवाचें बोलावणें आलें व प्रकाशकांचे हेतु मनांत राहिले व सन १९२१ चे आक्टोबरांत ( आश्विन कृ. ११ ) आपल्या मातापितरांस व बंधू वर्गास दुःखसागरांत लोटून तिनें इहलोकाचा त्याग केला.

# समर्पण.

ज्यांच्या प्रेरणेनें मला संत कवींच्या ग्रंथांची गोडी

लागली, त्या माझ्या पूज्य मातापित्यांचे

चरणांवर ही सुमनांजलि

भक्तिपूर्वक अर्पण

केली असे.

कृष्णाबाई.

# "सुमनांजलि" वरील अभिप्राय.

कृष्णे ! जन्मुनि धन्य तूं जनिं जशी मुक्ता, मिरा, वा जनी ॥
वाक्रे पाटिल वंश-रत्न विमल स्वर्गीय वाटे मनीं ॥
हा ! हा ! कोण अदृष्ट भोग तुज हा वैधव्य ये षोडशीं ॥
सत्काव्यीं सुमनांजलि ग्रथुनियां षट्त्रिंशि जाशी कशी ॥ १ ॥

वाणी गोड सुसंस्कृता हरि गुणीं जी रंगली प्रत्ययें ॥
वाणी कोण कितीक माधुरि तिची, तें वर्णितां मीं नये ॥
भक्तीचे स्फुट बोल-कर्त्रि कवयित्री जानकी सांगती ॥
झाली तीहि अदृश्य ? माधव-सुते, प्रत्यक्ष तूं भारती ॥ २ ॥

गावोनी मुलि नाटकांतिल पदें दुर्वृत्त होती जनीं ॥
त्यापेक्षां सुमनांजलीस भजतां होतील सद्वर्तनी ॥
सद्बोधामृत लाभ, भक्ति ठसुनी होतें मनोरंजन ॥
यासाठीं कवि-विश्वनाथ कथि हा सद्ग्रंथ घ्या सज्जन ॥ ३ ॥

"अरविंद-वासी."

या पुस्तकांत निरनिराळ्या सोप्या अशा नव्या चालींवर तीन भाग मिळून ८५ गाणीं आहेत. पद्यरचना सुबोध व वरीच विनचूक आहे. कित्येक गाणीं फारच बहारीचीं आहेत. तीं वाचून असेंही वाटलें कीं, कवयित्री हयात असत्या तर त्यांस गोमातेवर गाणीं देण्याची भिक्षा मागितली असती. वरील पुस्तक प्रत्येक कुटुंबवत्सलानें आपल्या मायभगिनी, किंवा भार्या मुलींना अवश्य घेऊन द्यावें अशी शिफारस आहे.

"गोग्रास" मुंबई.

॥ श्री ॥

# सचित्र सुमनांजलि

४२३९

## भाग पहिला

### १ श्रीगणपति



( चाल-क्षणभंगुर नरतनु जाइल राजहंसा० )

हा भाद्रपदाचा महिना सुखकर झाला ॥ गणराज गृहासी आला ॥ ध्रु० ॥ शिशु म्हणति गणपतीबाप्पा आला सदनीं ॥ करि मोदक लाडू जननी ॥ दीपोत्सव जिकडे तिकडे दिसतो नयनीं ॥ जाहली सुशोभित रजनी ॥ चाल ॥ द्विज मंत्रघोष कुणि करिती ॥ कुठें पुराण कीर्तन प्रीती ॥ कुठें जय जय मंगल मूर्ती ॥ कुठें मधुर वाजवुनि पेटी रिझविति प्रभुला ॥ गणराज० ॥ १ ॥ गजवक्त्र गौरिचापुत्र स्वतंत्र स्वयेंचा ॥ पुरवितो लळा दासांचा ॥ पशुपाळ बाळ लडिवाळ काळ विघ्नांचा ॥ स्वामीच सकल सिद्धींचा ॥ चाल ॥

चंद्रकोर विलसे भाळा ॥ हृदयावरि मौक्तिक-माळा ॥ कांसेस पितांबर पिंवळा ॥ सिंदुरासुरासि वधाया सायुध झाला ॥ गणराज० ॥ २ ॥ अहंकार सिंदुरासुर मातला भारी ॥ विघ्नेशा विघ्न निवारी ॥ मनसहित इंद्रियें यानें जिंकुनि सारीं ॥ जाहला आपण अधिकारी ॥ चाल ॥ चहूंकडे चालवी सत्ता ॥ मारील कोण या मत्ता ॥ नाहींच धीर या चित्ता ॥ हे काम कोप आणि लोभ मिळाले ह्याला ॥ गणराज० ॥ ३ ॥ करितोस नाश विघ्नांचा निज नामांनीं ॥ ऐकिलें असें मी कानीं ॥ सिंदुरासुरावरि स्वारी करिसि नच अजुनी ॥ प्रार्थना तुला दिनरजनी ॥ चाल ॥ कां विलंब झाला ताता ॥ तुज-वीण कोण मज त्राता ॥ मी काय करूं तरि आतां ॥ तव नाम करिल मम काम भरंवसा धरिला ॥ गण० ॥ ४ ॥

[ १ ग्रंथकर्त्रीनें बाळपणीं पाहिलेले सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रकार—मेळे, व्याख्यानें, प्रवचनें, इ.—वर्णन या गाण्यांत आहे. ]

---

## २ श्रीविठोबा




( चाल—श्रीगुरुचे चरण कंज० )

कधितरि मज पांडुरंग चरण भेट देइल कां ॥ ध्रु० ॥ शांति क्षमा

ऋ/७२१ ९-८-



किमपि नसे ॥ भूतदया दूर वसे ॥ धांव पाव म्हणु मी कसें ॥ आस पूर्ण होइल कां ॥ कधिं० ॥ १ ॥ भजन पुजन नाहिं कदा ॥ श्रवण मनन विषय सदा ॥ काम क्रोध मोहमदा ॥ घडिभरि तरि आवरिल कां ॥ कधिं० ॥ २ ॥ तीर्थव्रतें बोलुं नका ॥ दान धर्म नाहिं रुका ॥ धरियेली आस फुका ॥ भक्त सखा पावेल कां ॥ कधिं० ॥ ३ ॥ भक्ति भाव नाहिं मनीं ॥ समदृष्टी नाहिं जनीं ॥ व्यर्थ आस धरिलि मनीं ॥ खास पूर्ण होइल कां ॥ कधिं० ॥ ४ ॥ नच ठावा संतसंग ॥ परोपकारिं न झिजे अंग ॥ वदनिं म्हणे पांडुरंग ॥ एकवार पाहिन कां ॥ कधिं० ॥ ५ ॥

---

## ३ श्रीविठोवा

( चाल–खरें वाणलें अर्जुना० )

चला एकदां जाउं या पंढरीला ॥ पाहुं डोळेभरी श्रीहरीला ॥ध्रु०॥ चंद्रभागे तटीं मूर्ति हे गोमटी पदकमल तळवटीं वीट साजे ॥ हस्त ठेवुनि कटीं कस्तुरी मळवटी केशराची उटी श्यामतनुला ॥ चला० ॥ ॥ १ ॥ शशी आणि दिनपती अंबरीं तळपती कुंडलें मकरकृति श्रवणिं तैसीं ॥ शंभुलिंगा शिरीं भक्तवत्सल धरी मुकुट चपलेपरी मस्तकाला ॥ चला० ॥ २ ॥ पीतवसनें कटीं वेष्टुनी गोमटी नासिकाग्रीं दिठी ठेउनीयां ॥ रत्नकौस्तुभ उरीं वैजयन्तीवरी तुलसिचे त्यावरी हार त्याला ॥ चला० ॥ ३ ॥ रुक्मिण्यादिक सती भोंवत्या विलसती गरुड आणि मारुती बद्धहस्ती ॥ कार्तिकाषाढिला संतमेळा भला ॥ पंढरी चालला दर्शनाला ॥ चला० ॥ ४ ॥ पाहुं विठ्ठलसखा पाहुं तुळशी बुका नाशि जो पातकां नाममात्रें ॥ विठ्ठले माउले तव कृपें गाइलें दाखवीं पाउलें कन्यकेला ॥ चला० ॥ ५ ॥

[ २–३ श्रीविठ्ठलाच्या दर्शनासाठीं झालेली मनाची तळमळ या दोन गाण्यांत चित्रित केली आहे. ]

---

## ४ श्रीविठोबा

( चाल–मन माझें भ्यालें० )

न सुचे कांहिं मला ॥ रुक्मिणिचा वर उभा विटेवरि मजवरि कां रुसला ॥ ध्रु० ॥ दाटी मोडुनि दिधली वाट ॥ चरणां संनिध नेउनि नीट ॥ धुळभेटीचा ऐसा थाट ॥ मग कां विट आला ॥ ॥ रुक्मिणिचा० ॥ १ ॥ अलंकार भूषणें घालुनी ॥ कटिवरि ठेवियले कर दोन्ही ॥ पहावा पुंडलीकवरदानी ॥ दसरा सण आला ॥ रुक्मिणिचा० ॥ २ ॥ काय भयंकर तेथें दाटी ॥ किमपी रीघ दिसेना दृष्टी ॥ कैंचे दर्शन कैंची भेटी ॥ कष्टी जिव झाला ॥ रुक्मि० ॥३॥ सर्वे शिपाई बरवा होता ॥ दाटी मोडुनि दिधला रस्ता ॥ नयनीं पाहुनियां भगवंता ॥ हर्ष मना झाला ॥ रुक्मिणिचा० ४ ॥ नयनीं देखियलें मुखकमळ ॥ पदकमळीं जों ठेविन भाळ ॥ करिती पुजारी कोल्हाळ ॥ जिव मम गोंधळला ॥ रुक्मिणिचा० ॥ ५ ॥ देव सांवळा आहे बाई ॥ लागूं नको तूं याच्या पायीं ॥ दूर उभी राहुनियां घेई ॥ दर्शन जरि तुजला ॥ रुक्मिणिचा० ॥ ६ ॥ दुरुनिच वंदुनियां पदकमलें ॥ खिन्न मनें मग सदनीं आलें ॥ हृदयीं विठ्ठल देखुनि धालें ॥ सकलहि श्रम हरला ॥ रुक्मिणि० ॥ ७ ॥

---

## ५ पंढरपुरचा श्रीविठोबा

( चाल–ईश्वर हा स्थिरचरीं० )

चंद्रभागेच्या तिरीं कर कटावरी विटेवरि मूर्ति दिसे गोजिरी ॥ चला जाऊं पाहूं डोळेभरी ॥ ध्रु० ॥ कितिक मर्दिले अरी उचलिला गिरी कष्टला भगिनीपतिच्या घरीं ॥ श्रमुनियां कर ठेवी कटिवरी ॥ १ ॥ दुस्तर म्हणती जरी भवनदी परी नसे कीं मद्भक्तां यावरी ॥ सुचवितो कर ठेवुनि कटिवरी ॥ २ ॥ किंबहुना श्रीहरी म्हणे अंतरीं न कळे भक्त येति काधिं तरी ॥ यास्तव कर ठेवी कटिवरी ॥ ३ ॥ श्रवणिं कुंडलें वरीं तिलक कस्तुरी विराजे शंभुलिंग कीं शिरीं ॥ मस्तकीं मुकूट चपळेपरी ॥ ४ ॥ उटि शोभे केशरी श्यामतनुवरी

कौस्तुभमणि तो हृदयावरी ॥ तुळसिचे हारहि नानापरी ॥ ५ ॥ नासिकाग्रदिठीवरी दीन उद्धरी उधळला बुका श्रीमुखावरी ॥ कटीला शोभवि पीतांबरी ॥ ६ ॥ टाळविणा निजकरीं हर्ष अंतरीं हरिदिनीं संत येति पंढरी ॥ मुखानें पांडुरंगश्रीहरी ॥ ७ ॥ मनुजजन्म ये जरी जाई पंढरी एकदां नयनिं पाहिं श्रीहरी ॥ वदतसे संतांची वैखरी ॥८॥

[ ४-५ ग्रंथकर्त्रीस पंढरीस श्रीविठ्ठलदर्शनाचा योग आला, तेव्हां तिच्या अंतःकरणाची झालेली स्थिति व तेथील वर्णन वरील ५ व्या गाण्यांत केलें आहे. ]

---

## ६ वैद्यांचा श्रीविठोबा

( चाल-जाऊं कामाला० )

जाऊं पाहुं चला ॥ विठोबा पंढरीहुनि आला ॥ ध्रु० ॥ एके वेळीं भीमक बाळी प्रभुला करि विनती ॥ हौस मम पुरवा प्राणपती ॥ अमरपुरीसम मुंबापुरि ही ऐकियली ख्याती ॥ आपुले भक्त तिथें वसती ॥ चार दिवस राहुनियां येऊं पुनरपि पंढरिला ॥ विठोबा० ॥ १ ॥ रुक्मिणिसंगें विठ्ठल आले मुंबापुरिं त्वरित ॥ कळविला नाहिं कुणा बेत ॥ मोटारीचा वेग पाहुनी झाली भयभीत ॥ रुक्मिणी० ॥ प्रभूनें दृढ धरिला हात ॥ दिवे मजेचे ट्राम विजेची दावियली तिजला ॥ विठोबा० ॥ २ ॥ आषाढीच्या यात्रे सम ही मार्गी कां दाटी ॥ धांवती लोक कशासाठीं ॥ मुंबापुरिची नित्यचि यात्रा वदले जगजेठी ॥ रुक्मिणी नवल करी पोटीं ॥ इतुक्यामाजी भक्त जनांनीं विठ्ठल ओळखिला ॥ विठोबा० ॥ ३ ॥ सुंदर मंदिर निर्मुनि तेथें रुक्मिणीचा कांत ॥ नेउनी पूजियला त्वरित ॥ प्रेमानंदें कीर्तन छंदें मोहियलें चित्त ॥ विसरला पंढरिची मात ॥ पंढरपुर हें इथेंच आमुचें जय विठ्ठल बोला ॥ विठोबा० ॥ ४ ॥

---

## ७ श्रीविठोबा–आक्षीचा

( चाल–हा भाद्रपदाचा महिना० )

या अक्षय ग्रामामाजी सुखरुप वसला ॥ पांडुरंग नयनीं दिसला ॥ ध्रु० ॥ परिसोनी भक्तविनंती धांवत येई ॥ सवें आणिली रखुमाबाई ॥ त्या अष्टनायिका कोठें दिसति न बाई । गरुडासि जाहलें काई ॥ चाल ॥ हनुमंत दिसेना नयनीं ॥ तूं पुंडलीकवरदानी ॥ आलासि कसा त्यां त्यजुनी ॥ कां पंढरपुर रक्षाया ठेविसि त्यांला ॥ पांडुरंग० ॥ १ ॥ किति मंद सुगंधित वायू येत चहुंकडुनी ॥ गळताति सुमन तरुवरुनी ॥ हे आम्रवृक्ष किती लवले फळभारांनीं ॥ दिसताहे प्रमुदित अवनी ॥ चाल ॥ नारळी पोफळी केळी ॥ हे जांव लिंव आणि आंवळी ॥ करवंद जांभुळें काळीं ॥ हीं चंपकसुमनें पिंवळीं परिमळ सुटला ॥ पांडुरंग० ॥ २ ॥ स्थळ रमणिय देखुनि रमला रुक्मिणिकांत ॥ राहिला इथेंच निवांत ॥ कुणि साधुसंत नच दिसति करितसे खंत ॥ कटिवरी ठेवुनी हात ॥ चाल ॥ दहिंपोहे रगडुनि खावे ॥ कडकडेवाल चावावे ॥ पोह्यांचे पापड बरवे ॥ स्वादिष्ट आंबवणिभात रुचेल कीं तुजला ॥ पांडुरंग० ॥ ३ ॥ नच पुराण कीर्तन कैंची काकडआरती ॥ दिनरात खपति जन शेतीं ॥ खावोनी पानतमाखु कुचेष्टा करिती ॥ तव भजनिं किमपि नच रमती ॥ चाल मिळवोनी सुंदर जोडी ॥ मौजेनें उडविति गाडी ॥ तव भजनिं कायसी गोडी ॥ दे आवड तव भजनाची या कृष्णेला ॥ पांडुरंग० ॥ ४ ॥

---

## ८ श्रीविठोबा खानदेशी

( चाल–लोभ हरीचा लटका० )

पांडुरंग मज दिसला ॥ गे बाई ॥ पांडुरंग मज दिसला ॥ ध्रु० ॥ राई रखुमाई घेउनि संगें अंजनिच्या तटिं बसला ॥ गे बाई० ॥ १ ॥ पंढरपुरच्या भक्तजनांवरि काय म्हणवुनी रुसला ॥ गे बाई० ॥ २ ॥ दहिं दुध लोणी विपुलचि येथें ऐकुनि व्यर्थचि फसला ॥ गे बाई० ॥ ॥ ३ ॥ नैवेद्याचा थाट विलोकुनि मौन धरुनि मनिं हंसला ॥ गे बाई० ॥

॥ ४ ॥ भक्त कधीं मज नेतिल म्हणुनी वाट बघत जणुं बसला ॥ गे बाई० ॥ ५ ॥ सुमनहार जर नित्य मिळेना मुक्ताहार मग कसला ॥ गे बाई० ॥ ६ ॥ बहुत प्रयत्नें नयनिं दिसेना प्रेमभाव मनिं नसला ॥ गे बाई० ॥ ७ ॥ मुकुट कुंडला रहित प्रभू हा कृष्णेच्या मनिं ठसला ॥ गे बाई० ॥ ८ ॥

[ ६-७-८ मुंबईंत वैद्य वाडींतील, अलीबागेजवळ असलेल्या आक्षी गांवांतील व पूर्वखानदेशांत एरंडोल गांव आहे तेथील अशा तीन ठिकाणच्या विट्ठल मंदिरांतील मूर्तींचीं वर्णनें या तीन गाण्यांत आहेत. ]

## ९ श्रीरामवर्णन



( चाल-वाडीग्रामीं पुण्यक्षेत्रीं० )

रामदर्शनासि चला लाभ हा भला ॥ सूर्यवंशीं हृषीकेशी आजी अवतरला ॥ ध्रु० ॥ चरण गोजिरे जान्हवी जेथें पावली जन्माला ॥ त्यावरि वाळे वांक्या साजति प्रभुच्या चरणांला ॥ सरळ पोटऱ्या लाजविती ज्या कर्दळीस्तंभाला ॥ सुनीळ मांड्या वर्तुळ गुडघे शोभति बहु ज्याला ॥ सिंहासम कटि दिव्य पीतांबर त्यावरि वेष्टियला ॥ १ ॥ उदर साजिरें त्यावर सुंदर शोभतसे त्रिवळी ॥ बहुताचि शोभे चारमुखांचा विधि नाभिकमळीं ॥ श्रीवत्साभिध सुंदर लांछन शोभे

हृत्कमळीं ॥ कौस्तुभतेजें लपविलि वाटे सूर्यप्रभा सगळी ॥ सरळ बाहु रातोत्पलसम ते शोभति कर ज्याला ॥ २ ॥ बाहुभूषणें जडित शोभती कंकण करिं त्याला ॥ दशांगुलीं त्या मुद्रा तळपति भासति जणुं चपला ॥ कंठ कंबुसम बहुताचि शोभे प्रभुच्या वदनाला ॥ अधर पोंवळीं दंत हिऱ्यासम जिव्हा जणुं चपला ॥ श्रवणिं कुंडलें प्रकाश त्यांचा प्रभुच्या गालांला ॥ ३ ॥ त्रिभुवनिचेंही तेज उणें ये प्रभुच्या नयनांला ॥ सरळ नासिका सौख्याचि जेथें झालें पवनाला ॥ भाळ विशाळचि तिलक कस्तुरी त्यावरि रेखियला ॥ कुरळ केश ते सारुनि त्यावर घालित मुकुटाला ॥ बहुताचि शोभा मुकुटाजवळी मयूरपिच्छाला ॥ ४ ॥ जनककुमारिसी अंकीं घेउनि सिंहासनिं बसला ॥ चरणसरोजीं वानरवेषें मारुति मज दिसला ॥ दिव्य धनुर्धर त्रिभुवनसुंदर प्रभुच्या रूपाला ॥ दृष्ट खरोखर होइल ऐसें वाटतसे मजला ॥ जगपालक तो बालक किति मी वर्णावें त्याला ॥ ५ ॥

[ ९ यांत पट्टाभिषिक्त श्रीरामचंद्राचें वर्णन आहे. ]

---

## १० श्रीराम

( चाल–असा धरि छंद० )

श्रीरघुराया ॥ वंदन हें तुझिया पायां ॥ ध्रु० ॥ सुरकार्यास्तव दिनकर वंशीं ॥ दशरथसदनीं अवतरलासी ॥ गाधिज तुज ये मागायासी ॥ मख रक्षाया ॥ वंदन० ॥ १ ॥ विदेहपुरिला ऋषिसह जातां ॥ मार्गी उद्धरिली मुनिकांता ॥ भंगुनियां शिवचाप तत्त्वतां ॥ परिणिलि जाया ॥ वंदन० ॥ २ ॥ पित्राज्ञेनें जाशि वनासीं ॥ संगें सीता लक्ष्मण नेसी ॥ भरत येइ तुज विनवायासी ॥ राज्य कराया ॥ वंदन० ॥ ३ ॥ दिधल्या पादुकाचि भरताला ॥ समजाविलें बहुताचि त्याला ॥ चवदा वर्षें क्रमुनि वनाला ॥ येइन सखया ॥ वंदन० ॥ ४ ॥ ऋषिवचनानें पंचवटीतें ॥ वससी बांधुनि पर्णकुटीतें ॥ विटंबूनियां शूर्पणखेतें ॥ वधिसि खरा या ॥ वंदन० ॥ ५ ॥ मायामृग तो

आणायातें ॥ सीतावचनें जाशी त्वरितें ॥ रावण येउनि पर्णकुटीतें ॥ हरिली जाया ॥ वंदन० ॥ ६ ॥ देखुनि पंपासरोवरासी ॥ शोकाकुल तूं फारचि होसी ॥ नग सीतेचे दाखवि तुजसी ॥ मारुतिराया ॥ वंदन० ॥ ७ ॥ देखुनियां नग हर्षित होसी ॥ सख्यचि केलें प्लवंगमासी ॥ वाली वधुनी सोडविलीसी ॥ सुग्रिवजाया ॥ वंदन० ॥ ८ ॥ सीताशुद्धिस वानर गेले ॥ नलगे वार्ता व्यर्थचि श्रमले ॥ मणि सीतेचा घेउनि आले ॥ मारुतिराया ॥ वंदन० ॥ ९ ॥ सेतु बांधुनी त्वरितगतीसी ॥ लंके जाउनि रावण वधिसी ॥ लंकापुरि मग बक्षिस देशी ॥ बिभिषणराया ॥ वंदन० ॥ १० ॥ स्त्री बंधूसह पुष्पकयानीं ॥ बैसुनियां येसी निजसदनीं ॥ आनंदें भरतासि भेटुनी ॥ करिशि राज्या या ॥ वंदन० ॥ ११ ॥ तव गुण रामा अगणित असती ॥ दशशतवदना नच वर्णवती ॥ तेथें मजला कैंची शक्ती ॥ गुण वर्णाया ॥ वंदन० ॥ १२ ॥

[ १० यांत श्रीरामास वंदन करून बाळपणापासून अवतार समाप्तीपर्यंत केलेल्य सर्व लीला संक्षेपानें वर्णिल्या आहेत. ]

---

## ११ श्रीराम

( चाल—हटा तटानें पटा रंगवुनि० )

जय जय रामा रघुकुळदीपा रविवंशाभूषणा ॥ वर्णिती सनकादिक तव गुणा ॥ ध्रु० ॥ चवदा वर्षें क्रमुनि वनासी राक्षसकुळ मारुनी ॥ सोडिले सुरवर बंदींतुन ॥ सोडविलें सीतेसी लंका बिभीषणा देउन ॥ येशि मग निज नगरा परतुन ॥ सर्व अयोध्या हर्षित झाली श्रीरामा पाहुन ॥ निमाले दोषदुःख मुळिंहुन ॥ चाल ॥ प्रभुसाठीं ज्याचा कंठिं प्राण दाटला ॥ बहु आनंदानें भरता त्या भेटला ॥ तो समय तयाला सुखकर बहु वाटला ॥ साष्टांगें प्रणिपात करितसे वशिष्ठगुरुकारणा ॥ वर्णिती० ॥ १ ॥ कौसल्येसी वंदुनियां प्रभु वंदि कैकईप्रती ॥ पाहुनी लज्जित मनिं दुर्मती ॥ करी नमन तो लक्ष्मणाच्या मातेला रघुपती ॥ जाहली मुदित सुमित्रासती ॥ सुसुहृ-

तीनें सिंहासनिं मग बैसे सीतापती ॥ पाठिसीं बंधुत्रय शोभती ॥ चाल ॥ अंकावर शोभे सुंदर सीतासती ॥ पुढें हस्त जोडुनी तिष्ठ-तसे मारुती ॥ तें रूप साजिरें वर्णु तरी मी किती ॥ हीच विनंती प्रभुचरणाप्रति चुकावि भवभ्रमणा ॥ वर्णिती० ॥ २ ॥

[ ११ रावणवधानंतर श्रीराम, सीता, लक्ष्मण व वानरसेना यांसह अयोध्येस परत आले तेव्हां अयोध्यावासी जनांची झालेली मनःस्थिति यांत दाखविली आहे. ]

---

## १२ गोराराम-झावबाचा

( चाल-ईश्वर हा स्थिरचरीं० )

पालवमार्गावरी राममंदिरीं चला जाऊं पाहूं या सत्वरी ॥ असे कीं राममूर्ति गोजिरी ॥ ध्रु० ॥ फुलझाडें कितितरी दिसाति बहुपरी गमतसे ऐसें मज अंतरीं ॥ प्रभूची पुष्पवाटिका खरी ॥ पालव० ॥ १ ॥ घनश्याम हा जरी गौरतनु धरी कराया भक्तकामना पुरी ॥ असे कीं भक्ताधिन श्रीहरी ॥ पालव० ॥ २ ॥ विशाल भालावरी तिलक कस्तुरी झळकतो दिव्यमुकुट तो शिरीं ॥ सुबकसें छत्र दिसे त्यावरी ॥ पालव० ॥ ३ ॥ स्मित वदनेंदूवरी चापशर करीं मौक्तिक-माला हृदयावरी ॥ तयावर सुमनमाळ साजिरी ॥ पालव० ॥ ४ ॥ पीतवास हा जरी शुभ्र कधितरी कधीं तो पीतांबर केशरी ॥ कटीला शोभवि वरव्यापरी ॥ पालव० ॥ ५ ॥ वामांगीं सुंदरी निकट नच दुरी उभा तो लक्ष्मण दक्षिण करीं ॥ दिसतसे अनुपम शोभा खरी ॥ पालव० ॥ ६ ॥ स्मरतां विघ्नें हरी दीन उद्धरी होय जो प्रसन्न दूर्वांकुरीं ॥ तयाची मूर्ति दिसे साजिरी ॥ पालव० ॥ ७ ॥ रामाज्ञा शिरिं धरी दनुज संहरी असे जे चिरंजीव महिवरी ॥ तयाची मूर्ति दिसे गोजिरी ॥ पालव० ॥ ८ ॥ पाहतां निशिअवसरीं सुबक किति-तरी लाविले दीपच नानापरी ॥ जशीं कां नक्षत्रें अंबरीं ॥ पालव० ॥ ९ ॥ हीच अयोध्यापुरी गमे क्षणभरी पाहतां तृप्ति नव्हे अंतरीं ॥ पुरेना वर्णाया वैखरी ॥ पालव० ॥ १० ॥

---

## १३ काळाराम–ठाकुरद्वार

( चाल–मन माझें म्यालें० )

सिंहासनीं बसला ॥ जाउं चला एकवेळ पाहुंया राजारामाला ॥ ध्रु० ॥ तिघे बंधु हे उभेच जवळी ॥ अंकावरि जनकाची बाळी ॥ बद्धांजलि मुखकमळ न्याहाळी ॥ वळिया कपि दिसला ॥ जाउं० ॥ १ ॥ सव्यभागिं श्रीअवधुत बरवा ॥ सांबप्रभू तो सन्मुख पाहावा ॥ श्रीरामाचा प्राणविसावा ॥ वंदन करुं त्याला ॥ जाउं चला० ॥ २ ॥ सिंहासनिं बसला शरपाणी ॥ मुकुट कुंडलें तळपति श्रवणीं ॥ नानापरिची लेवुनि लेणीं ॥ सुखवी भजकांला ॥ जाउं चला० ॥ ३ ॥ श्यामल कोमल पहिला होता ॥ वनिं पाठवि कैकेयी माता ॥ शीत उष्ण बहु साहुनि आतां ॥ रंगचि पालटला ॥ जाउं चला० ॥ ४ ॥ सीताविरहाग्नीची ज्वाळा ॥ पोळवि तेव्हां दशरथबाळा ॥ श्यामवर्ण तो झाला काळा ॥ भासे मम मतिला ॥ जाउं चला० ॥ ५ ॥ पुनरपि राक्षस येतील कोणी ॥ हरुनी नेतिल मत्प्रियरमणी ॥ ऐसें कल्पुनि अंतःकरणीं ॥ अंकीं वसवि तिला ॥ जाउं चला० ॥ ६ ॥ रावण कुंभकर्ण तैं वधिले ॥ बंधविमुक्तचि सुर वर केले ॥ त्या समयींचे श्रम मनिं स्मरले ॥ स्वस्थचि अजि बसला ॥ जाउं चला० ॥ ७ ॥ आत्मारामीं आवड मोठी ॥ ऐसें जाणुनियां जगजेठी ॥ बंधु स्त्रियेसह आला भेटी ॥ भक्तीस्तव भुलला ॥ जाउं चला० ॥ ८ ॥

---

## १४ पंचवटीचा राम

( चाल–फटक्याची० )

कौसल्येचा नंदन आजि मी नयनमनोहर पाहिला ॥ लक्ष्मणसीता घेउनि संगें गंगातटिं जो राहिला ॥ ध्रु० ॥ बाळपणीं एकवेळ जयाचीं देखियलीं म्यां पदकमलें ॥ बहुदिन झाले काय कशाचें स्मरण किमपि तें मज नुरलें ॥ परि कनवाळु दीनदयाळु पुनरपि येथें मज अणिलें ॥ त्र्यंबकराजा दावुनि आधीं दर्शन आपुलें मज दिधलें ॥

गंगेचें तिर नयनमनोहर क्षणभर मनिंचा श्रम हरला ॥ कौसल्येचा० ॥ १ ॥ कृष्णवर्ण श्रीराम देखुनी क्षणभर विस्मय होय मनीं ॥ राम नव्हे हा गमे मनाला पुंडलिकाचा वरदानी ॥ न कळे येथें कां आला हा पंढरपुरिंचे जन त्यजुनी ॥ नीट पहातां वीट न चरणीं कटिवर नच ते कर दोन्हीं ॥ जवळ पहातां लक्ष्मण सीता पुढें मारुती देखियला ॥ कौसल्येचा० ॥ २ ॥ शामल कोमल रूप तुझें हें बहुत मुखींचें ऐकियलें ॥ लक्ष्मण सीता गौरवर्ण हें वाल्मिकमुनिनें वर्णियलें ॥ तुझिया सन्निध या दोघांचें स्वरुप दिसे कीं पालटलें ॥ कृष्णवर्ण कृष्णेच्या हृदयीं रूप तुझें हें नच पटलें ॥ दिव्यधनुर्धर गौरतनूचा जानकिचा वर मनि भरला ॥ कौसल्येचा० ॥ ३ ॥

---

## १५ मौनीबुवांचा राम

( चाल–फटक्याची० )

दिव्यधनुर्धर नयनमनोहर जानकिचा वर पाहुं चला ॥ मौनिराज भक्तांचे सदनीं प्रेमभरें जो राहिला ॥ ध्रु० ॥ रावण वधुनी बसुनि विमानीं निज सदनीं प्रभु चालिले ॥ नवलपरीचें मुंबापुर हें अंजनिकुमरें दावियलें ॥ चवदा वर्षें वनवासाचे बहुत परिश्रम जाहले ॥ क्षणभर येथें घ्याजि विसावा मारुतिचें वच मानिलें ॥ मज वाटे या मुंबापुरिनें दशवदनारी मोहियला ॥ मौनिराज० ॥ १ ॥ दत्तात्रय गणराय प्रथम हे द्वारासंनिध पाहिले ॥ मौनिराय प्रियभक्त प्रभूच्या चरणिं सदोदित राहिले ॥ गौरकाय रघुराय देखुनीं भ्रांत चित्त मम जाहलें ॥ हेंच काय प्रभु दशरथ–सदनीं ब्रह्म सांवळें अवतरलें ॥ पटली ओळख फिटली भ्रांति जवळ मारुती जंव दिसला ॥ मौनिराज० ॥ २ ॥ खुपतिल जणुं हे पैंजणवाळे चरण-कमल अति सुकुमार ॥ भक्ताधिन हा कांहि वदेना कोमल कौसल्याकुमर ॥ नानापरिचीं वस्त्रभूषणें कितितरि सुमनांचे हार ॥ मुकुट कुंडलें मौक्तिकमाळा देखियले करिं चापशर ॥ निज भक्तांच्या हृदयमंदिरीं लक्ष्मणसीतेसह वसला ॥ मौनिराज० ॥ ३ ॥

दिपवाळीचा दीपोत्सव हा रामप्रभूचे दरबारीं ॥ अन्नकुटोत्सव पहावयाला धांवति किति ह्या नरनारी ॥ लक्ष्मणसह श्रीराम देखुनी संनिध जनकाची कुमरी ॥ क्षणभर वाटे हीच अयोध्या लटकी नच हे गोष्टि खरी ॥ अति आवडिनें या कृष्णेनें दशरथनंदन गाइला ॥ मौनिराज० ॥ ४ ॥

[ १२–१५. वैद्यवाडींतील मौनी बुवांचें, ठाकुरद्वारीं आत्मारामबुवांचें व झावबाचें अशीं मुंबईतील तीन व नाशिक येथील पंचवटींतील एक मिळून चार ठिकाणच्या राममूर्तींचीं वर्णनें या चार पदांत आहेत. या वर्णनांत ग्रंथकर्त्रींची सूक्ष्म दृष्टि, कल्पनाचातुर्य व प्रसाद हे गुण ठळकपणें दिसतात. ]

## १६ केशवराज–एरंडोलचा

( चाल–फटक्याची० )

मनमोहन हा केशवराजा सहज आज मी पाहिला ॥ न कळे कवण्या भक्तास्तव हा येथें येउनि राहिला ॥ ध्रु० ॥ भक्तजनांच्या करुणावचनें पीतवसन हा कळवळला ॥ जाहली घाई मग लवलाही विचार कांहीं नच केला ॥ रुक्मिणि रुसली परि न आणिली म्हणती झाला उशीर मला ॥ कोमल चरणीं धांवत आला नाहिंच गरुडावर बसला ॥ कृश दिसतो बहु केशवप्रभु हा खानदेश नच मानवला ॥ मन० ॥ १ ॥ आठ वाजतां पहांट म्हणती काकड आरती कोण करी ॥ हार फुलांचे काय कशाचें वस्त्र भूषणें त्याचपरी ॥ षड्रस अन्नें नयनिं न दिसती झुणका भाकर हीच खरी ॥ कथा पुराणें श्रवणिं न पडती स्वस्थ मानसीं झोंप बरी ॥ मुकुट करविला तुजला बरवा दिला केशवा कवणाला ॥ मन० ॥ २ ॥ व्यर्थ कलागत करुनि उपास्थित शिशुसम द्विज हे भांडती ॥ कटकट करुनी द्वय तट पडले कोणि कुणाचें नायकती ॥ केशवराया मौन धरुनियां मौज अजुनि वा पाहसि किती ॥ मिटवुनि तंटा सुखसंतुष्टी विप्रवरांना दे सुमती ॥ विप्रप्रिय तूं केशवराया काय दया मग न ये तुला ॥ मनमोहन० ॥ ३ ॥ केशवचरणां वंदुनि प्रेमें अंजनि-

तनया मग नमिलें ॥ भव्यकाय गणराय विलोकुनि क्षणभरी विस्मित मन झालें ॥ मायभवानी श्रीजगदंबा तिचीं वंदिलीं पदकमलें ॥ पार्वतिचा वर शंकर भोळा देखुनि मनिंचे श्रम हरिले ॥ अंजनि-नदिच्या पैलतिरीचा श्रीगुरु कृष्णेनें नमिला ॥ मनमोहन० ॥ ४ ॥

---

## १७ श्रीदत्त



( चाल–फटक्याची० )

भाविक भोळे जन ताराया अंजनितटिं राहिला ॥ अनसूयेचा नंदन बरवा नयनीं मी पाहिला ॥ ध्रु० ॥ भवनदिसम ही अंजनि भरली जाउं कशी मी परतीरीं ॥ अविवेकाचा पूर पहा हा येतो वर-चेवरी ॥ अवचित येतो अज्ञानाचा लोंढा न कळे जरी ॥ दृढनिश्चय

हा दिसतो खासा बंधारा त्यावरी ॥ चाल ॥ सद्बुद्धी मैत्रिण बरी ॥ भजसवें आलि सत्वरीं ॥ जावोनि दत्तमंदिरी ॥ प्रभुपद नमितां नुरली चिंता देहभाव हरपला ॥ अनसूयेचा० ॥ १ ॥ जन ताराया त्रिविध परीचे ऐसें मनिं आणुनी ॥ अघटित लीला तीनमुखांचा जाहला त्रिभुवन-धनी ॥ काम क्रोध मद मत्सर छळिती मम भजकां निशि-दिनीं ॥ सहाहस्त धरियले वाटतें षड्रिपु निर्दालनीं ॥ चाल ॥ भक्तांचें मनमंदिर ॥ फोडाया अतितत्पर ॥ हा दुरभिमान तस्कर ॥ सर्वे आणिले श्वान दोन हे भाव दिसे यांतला ॥ अनसूयेचा० ॥ २ ॥ वाडीग्रामीं हवा न माने खानदेश पाहिला ॥ सत्वर न मिळे दुग्ध म्हणोनी कामधेनुसह आला ॥ कडुलिंबाचा कोमलपाला आवडिनें भक्षिला ॥ अनुपम दिसतो दत्तप्रभू हा निजनयनीं लक्षिला ॥ चाल ॥ मम भजनीं नच सावध ॥ घ्या सांगें नानाविध ॥ हें नाटकगृह संनिध ॥ अल्पमतीच्या या कृष्णेनें हाच अर्थ काढिला ॥ अन-सूयेचा० ॥ ३ ॥

## १८ श्रीदत्त एरंडोलचा

( चाल-तूं माझा यजमान० )

दत्तात्रय भगवान् ॥ देखिला दत्तात्रय भगवान् ॥ ध्रु० ॥ दत्तप्रभूचें मानस रमलें ॥ रमणिय गमलें स्थान ॥ देखिला० ॥ १ ॥ मार्गी पाहतां जिकडे तिकडे ॥ कडुलिंबाचें रान ॥ देखिला० ॥ २ ॥ विमल अशा या अंजनि नदिचें ॥ आवडलें कीं स्नान ॥ देखि० ॥ ३ ॥ रमणिय चिमणें रूप बघोनी ॥ निवली भूक तहान ॥ देखि० ॥ ४ ॥ दर्शनमात्रें भव-भय हरितो ॥ न म्हणे थोर लहान ॥ देखि० ॥ ५ ॥ शोभतसे जर-तारी छाटी ॥ मुकुट कुंडलें छान ॥ देखि० ॥ ६ ॥ मनकुसुमानें पुजुनी त्यासी ॥ मागुं कृपेचें दान ॥ देखि० ॥ ७ ॥ श्रीगुरुराया या कृष्णेनें ॥ गावें तव गुणगान ॥ देखि० ॥ ८ ॥

[ १६-१८ ग्रंथकर्त्री कांहीं दिवस आपले बंधूचे गांवीं-एरंडोल-होती तेथील श्रीकेशवराज व श्रीदत्त या दोन मंदिरांतील मूर्तींचें वर्णन या तीन गाण्यांत रेखाटलें आहे. ]

## १९ श्रीशंकर



( चाल-नियम पाळावे० )

पार्वतिरमणा ॥ वंदन हें तुझिया चरणां ॥ ध्रु० ॥ स्मशानवासी भाळीं चंद्र ॥ पंचवदना कर्पुरगौर ॥ मस्तकिं झुळझुळ वाहे नीर ॥ पन्नगभुषणा ॥ वंदन० ॥ १ ॥ चिताभस्म हें प्रिय बहु ज्यासी ॥ बहुत आवडी बिल्वदळासी ॥ धत्तुरपुष्पें प्रसन्न होसी ॥ भक्तजन-भुषणा ॥ वंदन० ॥२॥ विभूतिलेपन सर्वांगासी ॥ गजचर्मांबर शोभत ज्यासी ॥ नारद तुंबर गाति गुणासी ॥ गिरिजारमणा ॥ वंदन० ॥३॥ नीळकंठा त्रिशूळधारी ॥ अंकीं शोभती गणपति गौरी ॥ परिस विनंती हे मदनारी ॥ चुकवि भ्रमणा ॥ वंदन० ॥ ४ ॥

---

## २० अंबिका




( चाल-धांव विभो करुणाकर० )

श्रीजगदंबे माय भवानी ॥ वंदन तुजला त्रिभुवनजननी ॥ ध्रु० ॥ महिषासुर या नामें होता ॥ परम भयंकर पीडी समस्तां ॥ सुरवर

अवघे करिती चिंता ॥ विनविति तुजला कर जोडोनी ॥ १ ॥ परिसुनियां सकलांची विनती ॥ कृपा उपजली तुझिया चित्तीं ॥ महिषासुर मर्दुनि निजहस्तीं ॥ झालिस सकलांतें सुखदानी ॥ २ ॥ क्रोधमहिष नाटोपे कवणा ॥ अहंकार कोल्हासुर जाणा ॥ जगदंबे तूं करिशिल करुणा ॥ म्हणुनि विनवितें तुज दिनरजनीं ॥ ३ ॥

---

## २१ श्रीमारुती




( चाल-कधिं भेटेल सखये० )

चला नमन करूं या वायुसुता ॥ उदार धीरा अंजनिकुमरा ॥ रजनिचरांसी संहरिता ॥ चला० ॥ १ ॥ पिंगटनयना षड्रिपुदमना ॥ कलिमलदहना कपिनाथा ॥ चला० ॥ २ ॥ द्रोणागिरीसी घेउनि येसी ॥ लक्ष्मणासी वांचविता ॥ चला० ॥ ३ ॥ रुद्ररूपिया मारुतिराया ॥ मति द्यावी तव गुण गातां ॥ चला० ॥ ४ ॥

[ १९–२१ यांत श्रीशंकर, देवी व मारुति यांची स्तुति केली आहे. ]

---

# सचित्र सुमनांजलि

## भाग दुसरा

### २२ श्रीरामजन्म

( चाल-आजि अक्रुर हा० )

तुम्हि श्रवण करा रामजन्म चरिताला ॥ अवतार अयोध्ये झाला ॥ ध्रु० ॥ रविवंशि गडे धन्य नृपति परि कांहीं ॥ संतती तयाला नाहीं ॥ नच सुत उदरीं म्हणुनी व्याकुळ होई ॥ अंतरीं उदासिन राही ॥ चाल-विषतुल्य मानि सुखभोग ॥ नावडे कामिनीसंग ॥ जडला त्या चिंतारोग ॥ सुतकामेष्ठी यज्ञ गुरुकृपें केला ॥ अवतार० ॥ १ ॥ मखसमयीं त्या अग्नि मुदित बहु झाला ॥ दे प्रसाद अजपुत्राला ॥ सुत चवघे बा होतिल ऐसें वदला ॥ दशरथा हर्ष बहु झाला ॥ चाल-नृपस्त्रिया मुख्य ज्या तीन ॥ दे प्रसाद त्यां वांटून ॥ जाहल्या गरोदर पूर्ण ॥ पुरवि डोहाळे मुनि सांगे नृपतीला ॥ अवतार० ॥ २ ॥ प्रथम कैकइच्या मंदिरासि नृप गेला ॥ डोहाळे पुसाया तिजला ॥ बहु सुंदर ती पावे अभिमानाला ॥ पहुडली पाहुनी पतिला ॥ चाल-तो म्हणे रुसशि कां सांग ॥ सोडि गे सर्व ही राग ॥ इच्छिलें प्रियतमे माग ॥ तव ज्येष्ठ सुता धाडीं वनवासाला ॥ अवतार० ॥ ३ ॥ तंव खिन्न मनें नृपति तेथुनी गेला ॥ पुसतसे सुमित्रा सतिला ॥ वद डोहाळे पुरविन तव इच्छेला ॥ विनयेंच वदे ती पतिला ॥ चाल-मम पुत्र होय जो बरवा ॥ ज्येष्ठाची करावी सेवा ॥ आणीक नावडे जीवा ॥ हे डोहाळे होति प्राणपति मजला ॥ अवतार० ॥ ४ ॥ मग कौसल्यामंदिरासि नृप येत ॥ देखिलें नयनिं विपरीत ॥ नेत्र झांकुनियां कौसल्या ध्यानस्थ ॥ रामरूपिं जडलें चित्त ॥ चाल-नेणोनि वदे अजपुत्र ॥ कां प्रिये लाविले

नेत्र ॥ मजकडे पाहिं क्षणमात्र ॥ परि बोले ना उघडी ना नयनांला ॥ अवतार० ॥ ५ ॥ रामनामासी नृप वदला खेदानें ॥ तंव नेत्र उघडिले सतिनें ॥ भ्रम कां गे हा सांग मला मृगनयने ॥ पुसतसे पुन्हा प्रेमानें ॥ चाल–भ्रमरहित स्वयें मी राम ॥ सर्वांचा आत्माराम ॥ मजमाजि कल्पिसी भ्रम ॥ भय पावुनियां नृप पाचारी गुरुला ॥ अवतार० ॥ ६ ॥ मुनिवर्या बा हीस झडपिलें भूतें ॥ तूं पंचाक्षरि हो येथें ॥ गुरु वशिष्ठ तो पाहे कौसल्येतें ॥ रामरूप दिसलें त्यातें ॥ चाल–स्वानंद लहरिसी पोटीं ॥ जिरवूनि वदे ऋषि गोष्टी ॥ अवतरेल बा जगजेठी ॥ रविवंशासी धन्य सुदिन हा आला ॥ अवतार० ॥ ७ ॥ ऋतु वसंत हा चैत्र शुद्ध नवमीला ॥ रवि मध्यान्हीं तो आला ॥ नवमास पुरे झाले कौसल्येला ॥ ते समयिं प्रभू अवतरला० ॥ चाल–सांवळी तनू ही ज्याची ॥ प्रभुमूर्ति अष्ट वर्षांची ॥ लोपली प्रभा सूर्याची ॥ श्रीराम असें रूप दावि मातेला ॥ अवतार० ॥ ८ ॥ हो मत्सुत बा आवरिं या रूपाला ॥ परिसुनी बालरुप नटला ॥ नृप हर्षे तो पाहुनि श्रीरामाला ॥ बहु याचकजन तोषविला ॥ चाल–कैकईस झाले पुत्र ॥ प्रभु शंख चक्र अवतार ॥ शेष तो सुमित्रा कुमर ॥ किति वर्णावी रामप्रभूची लीला ॥ अवतार० ॥ ९ ॥

[ २२ ते ३९ मिळून १८ गाणीं रामायणांतील निरनिराळ्या प्रसंगांवर रचिलीं आहेत. गाणें २२ यांत रामजन्माच्या कथेचें वर्णन आहे. श्रीरामाचा अवतार नवमीस झाला तेव्हां गाण्याचींही कडवीं ९ रचण्यांत ग्रंथकर्त्रीचें चातुर्य दिसून येतें. ]

---

## २३ श्रीमारुती जन्म

( चाल–भजति नर अनन्य जे मातें० )

आइका भक्तचरित्राला ॥ रामदूत हनुमंत बलाद्भुत भूवरि अवतरला ॥ ध्रु० ॥ केसरी नामें कपि होता ॥ सद्गुणसरिता पति भजनीं रत अंजनि तत्कांता ॥ तियेनें तप बहु आचरितां ॥ प्रसन्न झाले श्रीशंकर वर माग म्हणाति आतां ॥ सती म्हणे जोडुनियां हातां ॥

रामदूत विख्यात बलाद्भुत पुत्र देईं ताता ॥ आणिक नलगे कांहीं मला ॥ रामदूत० ॥ १ ॥ होइल पुत्र तुला बरवा ॥ येइल तव उदरासी साक्षात् रुद्रचि अकरावा ॥ परि तुवां अंजुली पसरावा ॥ करीं पडे जें प्रसाद म्हणुनी सत्वर भक्षावा ॥ कथुनि हें प्रभु गुप्तचि झाला ॥ रामदूत० ॥ २ ॥ दशरथें पुत्रकाम धरुनी ॥ याग मांडितां प्रसाद देई अग्नि प्रगटोनी ॥ तयाचे पिंड करुनि तीन्ही ॥ भूपालानें तिघी स्त्रियांसी दिधले वांटोनी ॥ कैकयी बसलीसे रुसुनी ॥ घारीनें तैं पिंडचि नेला करिंचा उचलोनी ॥ कैकई करी विलापाला ॥ रामदूत० ॥ ३ ॥ समीरें घारी वदनींचा ॥ पिंड झडपुनी अंजनि हस्तीं ठेवियला साचा ॥ समजुनी प्रसाद सांबाचा ॥ भक्षितांचि तैं हेतचि पुरला बहुतां दिवसांचा ॥ उगवला दिवस पूर्णिमेचा ॥ चैत्र मास रवि उदयिं जन्मला सुत तो अंजनिचा ॥ सुरवर वर्षति सुमनांला ॥ रामदूत० ॥ ४ ॥ अंजनी स्वरूप न्याहाळीत ॥ कर्णि कुंडलें पिंगट नयन वदन हास्ययुक्त ॥ मस्तकीं मुकुट लखलखित ॥ सुवर्ण कटि कांसोटी झळके गळां यज्ञोपवीत ॥ कंकणें करीं रत्नजडित ॥ कनकवर्णि वपु तोडर चरणीं पुच्छचि अद्भुत ॥ जयाच्या कंठीं नाममाला ॥ राम० ॥ ५ ॥

[ २३ यांत श्रीरामास सर्व प्रकारें साहाय्य करणारे श्रीमारुतिराय यांच्या अवतारकथेचें वर्णन आहे. मूळ वाल्मीकि रामायणांत ही कथा उत्तर कांडांत वर्णिली आहे. ]

---

## २४ अहिल्योद्धार

( चाल–हा भाद्रपदाचा महिना० )

तव पदरज महिमा न कळे दशरथतनया ॥ मज उद्धरिलें रघुराया ॥ ध्रु० ॥ कामांध पुरंदर होउनि आश्रमिं येई ॥ पतिरूप धरुनि ते समयीं ॥ मत्पातिव्रत्य धनासि लुटुनियां घेई ॥ मज कपट कळेना काई ॥ चाल–इतुक्यांत कांत मम आला ॥ तत्काळ शाप मज वदला ॥ पापिणी होई जड शीला ॥ मुनिशापें शचिवर होय भगां-

कित काया ॥ १ ॥ पदकमळिं लवविलें भाळ देखुनी डोळा ॥ उःशाप वदति ते वेळां ॥ रघुवीर करिल उद्धार होशि जड शिळा ॥ परि पाहशील घननीळा ॥ चाल-मज धन्य सुदिन हा आला ॥ तव चरण रजानें झाली पावन काया ॥ २ ॥ सनकादिक तुजला ध्याती परमपवित्रा ॥ नमिते तुज पशुपति-मित्रा ॥ तव महिमा निगमा न कळे स्वरूप स्वतंत्रा ॥ नमितें तुज दशरथपुत्रा ॥ चाल-ना कळसी शास्त्रपुराणां ॥ श्रुति म्हणती न कळे अपणा ॥ शेष तो होय दिनवाणा ॥ मतिहीन दीन मी तुजला किति वर्णाया ॥ ३ ॥ मुनिमानस रंजन दशरथनंदन रामा ॥ त्रिपुरारि ध्यात तव नामा ॥ मत्पातक-कानन-दहना हे गुणग्रामा ॥ वैकुंठवासि सुखधामा ॥ चाल-निज ज्ञानें कळलें मुनिला ॥ येवोनि वंदि घननीळा ॥ ऋषिसहित पुजुनि रामाला ॥ निज आश्रमिं गेला संगें घेउनि जाया ॥ ४ ॥

[ २४ यांत वर्णिलेली हकीकत अयोध्या कांडांत आलेली आहे. विश्वामित्र ऋषींनीं यज्ञ रक्षणार्थ दशरथराजाकडे राम लक्ष्मणांची मागणी केली. त्याप्रमाणें उभयतां बंधु ऋषी बरोबर जात असतां मार्गांत गौतमऋषीची पत्नी अहल्या ही पति शापानें शिला होऊन पडली होती तिचा उद्धार श्रीरामांनीं आपल्या पादस्पर्शानें करून तिची शापापासून मुक्तता केली. गौतमांनींहि अहल्येचा स्वीकार केला. शापमुक्ततेनंतर अहल्येनें श्रीरामाची स्तुति केली ती या गाण्यांत आहे. ]

---

## २५ दशरथनिधन

( चाल-अजि अक्रुर हा० )

कुणि जाउनियां आणा रघुरायाला ॥ मम अंत समय हा आला ॥ध्रु०॥ बहु वृद्धपणीं पुत्र जाहले चार ॥ मनिं हर्ष वाटला फार ॥ मम सेवेला दक्ष सदा सुकुमार ॥ नुरला मद्भाग्या पार ॥ चाल-ऐसें जों आलें चित्ता ॥ गाधिज येई अवचिता ॥ घेउनी जाय रघुनाथा ॥ गुरुवचनें मी काळ कसा तरि क्रमिला ॥ मम अंत० ॥ १ ॥ मुनिसंगें तैं राम जाय मिथिलेला ॥ भंगियलें भव चापाला ॥

नृपकन्येनें अर्पियली वरमाला ॥ आनंद होय सकळांला ॥ चाल-घेउनी जनकसुतेसी ॥ श्रीराम येइ नगरासी ॥ हर्षले अयोध्यावासी ॥ सुरनर अवघे वर्णिती मम भाग्याला ॥ मम अंत० ॥ २ ॥ मम सुत दोघे गेले मातुल देशीं ॥ सौमित्र राम वनवासी ॥ या समयाला कवण नसे मजपाशीं ॥ अहा कर्मगती ही कैसी ॥ चाल-ये शत्रुघ्ना ये भरता ॥ ये सौमित्रा रघुनाथा ॥ ये ये ना जानकीकांता ॥ तुज पाहुनियां जाइन परधामाला ॥ मम अंत० ॥ ३ ॥ नृप मृत झाला रामवियोगें करुनीं ॥ आकांत वर्तला भुवनीं ॥ ती कौसल्या शोक करी बहु परिनीं ॥ नच येइ वर्णितां कवनीं ॥ चाल-त्रैलोक्यनाथसुत ज्यासी ॥ तद्विरहें मरण नृपासी ॥ प्रारब्धगती हे कैसी ॥ असे अघटित कीं श्रीरघुपतीची लीला ॥ मम अंत० ॥ ४ ॥

[ २५ हा प्रसंगहि अयोध्या कांडांतला आहे. दशरथानें प्रजेच्या संमतीनें रामास यौवराज्य देण्याचें ठरविलें व अभिषेक समारंभाचा मुहूर्तहि निश्चित केला. परंतु पूर्वी एका प्रसंगीं राजाचे प्राण त्याच्या-कैकयी नांवाच्या आवडत्या राणीनें वांचविले होते त्यावेळीं तिला दोन वर देण्याचें त्यानें वचन दिलें त्याची तिनें यावेळीं आठवण देऊन समारंभास विघ्न आणलें. राजा वचनबद्ध झाल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन रामास वनास पाठविणें त्यास भाग पडलें. परंतु सर्व मुलांमध्यें राजाची प्रीति रामावर विशेष असल्यामुळें त्याच्या वियोगामुळें राजास मृत्यु आला. त्यावेळेस काढलेले शोकपर उद्गार या गाण्यांत आहेत. ]

---

## २६ भरतभाव

( चाल-कृष्ण माझा प्राण० )

राम माझा मज टाकुनी ॥ गेला तरि कवण्या रानीं ॥ ध्रु० ॥ कैकईची दुष्टवाणी ॥ परिसोनी चापपाणी ॥ वल्कलानें तनु वेष्टुनी ॥ गेला० ॥ १ ॥ धन्य धन्य लक्ष्मण ॥ सेवी श्रीरामचरण ॥ धन्य विदेहनंदिनी ॥ गेला० ॥ २ ॥ रामविरहें मेला तात ॥ कां हा वांचला भरत ॥ अंतरला मोक्षदानी ॥ गेला० ॥ ३ ॥ राम झाला वनवासी ॥

पिता झाला स्वर्गवासी ॥ दुर्दैवी मी त्रिभुवनीं ॥ गेला० ॥ ४ ॥ पाहावया घननीळ ॥ भरत होय उतावेळ ॥ चित्रकूटासी येऊनी ॥ गेला० ॥ ५ ॥ देखोनीयां सीताकांत ॥ नेत्रीं आले अश्रुपात ॥ चरणीं मस्तक ठेवोनी ॥ गेला० ॥ ६ ॥ पुत्रें पाळावी पित्राज्ञा ॥ खेद न करावा सुज्ञा ॥ जाईं पादुका घेवोनी ॥ गेला० ॥ ७ ॥ चवदा वर्षांनीं भेटी॥ वत्सा होऊं नको कष्टी ॥ बहुपरी समजावोनी ॥ गेला० ॥८॥ देखोनीयां राघवाला ॥ निजांतरीं भरत धाला ॥ मति देई गुणवर्णनीं ॥ गेला० ॥ ९ ॥

[ २६ हा प्रसंग अरण्यकांडांतील आहे. श्रीराम सीता लक्ष्मणासह वनास गेले त्यावेळीं भरत व शत्रुघ्न हे आपल्या मातुलगृहीं असल्यामुळें रामाच्या वनवासाची गोष्ट त्यांस माहीत नव्हती. ते अयोध्येस परत आले तेव्हां त्यांस सर्व हकीगत समजली रामावर भरताचें अत्यंत प्रेम असल्यामुळें त्यास रामाच्या वनवासामुळें फार वाईट वाटलें. त्याच्या आईनें–कैकईनें–जरी भरतास राज्यपद देण्याचा वर राजाकडून मिळविला होता तरी भरतानें त्या राज्यपदाचा तिरस्कार करून रामाच्या भेटीसाठीं उतावीळ होऊन त्यानें चित्रकूटपर्वतावर रामाची गांठ घेतली व आपण अयोध्येस परत येऊन राज्याचा स्वीकार करण्यास त्यानें रामास अत्याग्रहानें सांगितलें. परंतु रामानें पितृआज्ञेचें उल्लंघन न होतां भरताची समजूत जेणेंकरून होईल अशी युक्ति लढवून व आपल्या पादुका भरतास देऊन १४ वर्षें पुरीं झाल्यावरोवर खचित परत येतों असें त्यास अभिवचन देऊन परत पाठविलें. हा सर्व प्रसंग या गाण्यांत वर्णिला आहे. ]

---

## २७ भरतभाव

( चाल–मन माझें भ्यालें० )

पाहिन रघुराया ॥ भरतासि निदिध्यास निरंतर वंदिन मी पायां ॥ ध्रु० ॥ श्रीरामें धाडिला मारुती ॥ भरत उतावीळ झाला चित्तीं ॥ कोठें आहे सांग रघुपती ॥ ओंवाळिन काया ॥ १ ॥ पहावया मग भाव तयाचा ॥ वदे विनोदें सुत अंजनिचा ॥ रघुपति तुज विस्मरला

साचा ॥ श्रमसी तूं वायां ॥ २ ॥ राघव इकडे नच ये आतां ॥ एक वेळ ऐकियलें वदतां ॥ वरवी ते कैकेयी माता ॥ मजवरि करि माया ॥ ३ ॥ वनिं निघतां जरि वदली रागें ॥ वस्त्रभूषणें नच न्या संगें ॥ पादत्राण न मजसी मागे ॥ ऐशी ती सदया ॥ ४ ॥ ऐसें आलें तिच्या अंतरा ॥ पादत्राण असो सुकुमारा ॥ तंव आला भरताचा फेरा ॥ प्रेमा दावाया ॥ ५ ॥ नानापरिचीं बोलुनि वचनें ॥ मोहियलें मम चित्त तयानें ॥ पदिंच्या पादुकाच यापरिनें ॥ गेला घेउनियां ॥ ६ ॥ लंकेमाजी सुखरूप वसला ॥ नायकिलें कधिं स्मरतां तुजला ॥ व्यर्थेचि कष्टविशी निजतनुला ॥ विसरें तूंहि तया ॥ ७ ॥ कथिसी जरि हे अघटित वार्ता ॥ सीतापति विस्मरला भरता ॥ रामप्रिया तूं संनिध असतां ॥ त्यजितों ही काया ॥ ८ ॥ किमपी लोभ नसे देहाचा ॥ अग्निकुंडिं उडि घालिन साचा ॥ गडबडला तैं सुत अंजनिचा ॥ घालित मिठि पायां ॥ ९ ॥ भरता हा बघ राघव आला ॥ त्यजिसी निजदेहासि कशाला ॥ लावियलें तव प्रेम कसाला ॥ कोपुं नको सखया ॥ १० ॥ लक्ष्मण सीतेसहित विमानीं ॥ भरत भरत हा मंत्रचि वदनीं ॥ त्वरितचि रघुपति पाहशिल नयनीं ॥ लटिका न म्हणें या ॥ ११ ॥

[ २७ भरत श्रीरामाच्या वचनाप्रमाणें त्याच्या परत येण्याचीं १४ वर्षे नंदिग्रामीं वाट पहात राहिला होता. इकडे श्रीराम रावण वध करून पुष्पकविमानांतून अयोध्येस परत येण्यास निघाले. नंदिग्रामासमीप येतांच आपल्या येण्याचें वृत्त कळविण्याकरितां त्यांनीं मारुतीस पुढें पाठविलें. भरताचें रामाविषयींचें भ्रातृप्रेम कोणत्या दर्जाचें आहे हें पाहण्यासाठीं मारुतीनें रामाविषयीं भरताचे मनांत अप्रीति उत्पन्न होईल अशा प्रकारचा मजकूर भरतास सांगितला. परंतु भरताचें रामावर खरें प्रेम असल्यामुळें मारुतीच्या भाषणाचा त्याच्या मनावर परिणाम होऊन तो अग्निकाष्ठें भक्षण करण्यास तयार झाला. तेव्हां भरताची सत्यनिष्ठा पाहून मारुति घावरला व त्यानें खरा प्रकार निवेदन केला. हें कथानक या गाण्यांत वर्णिलें आहे. ]

## २८ श्रीरामकीर्ति

( चाल-रामकृष्ण नरहरे० )

नमुनि म्हणे तरुवरा ॥ जानकी ॥ तुजमाजी वा कवण वदतसे रामगुणान्वित गिरा ॥ ध्रु० ॥ ताताज्ञा परिसुनी ॥ रघुपती ॥ भ्राता कांता यांसह राहे गोदातटिं काननीं ॥ खर त्रिशिरा मारुनी ॥ निज-शरें ॥ हरिणापाठीं धांवत गेला प्रिया इच्छि म्हणवुनी ॥ मायिक तो जाणुनी ॥ वधियला ॥ परि मरतांना माव करी तो आर्तस्वर काढुनी ॥ चाल-संकट पडलें आतां ॥ धांव सुमित्रासुता ॥ शब्द असा ऐकतां ॥ निजभर्त्यातें संरक्षाया साति धाडी देवरा ॥१॥ नेली सीतासती ॥ रावणें ॥ मारिच वधुनी पर्णकुटीला आले श्रीरघुपती ॥ गोदातटिं शोधिती ॥ प्रियेला ॥ ये ये सीते सद्गुणसरिते ऐशापरि वाहती ॥ शिला वृक्ष कवळिती ॥ निजकरीं ॥ धरणीवर लोळती प्रभूचें मन कोमल या रिती ॥ चाल-ऋष्यमूक पर्वतीं ॥ आले सहजस्थिती ॥ सुग्रिवासी भेटती ॥ वाली वधुनी किष्किंधेचें राज्य दिलें कपिवरा० ॥ २ ॥ असंख्यात वानर ॥ निघाले ॥ म्हणाति मनीं जानकी शोधुनी सुखवूं श्रीरघुवीर ॥ फिरले गिरिकंदर ॥ तेधवां ॥ जनकबाळ नकळेच कुणाला म्हणाति कर्मदुस्तर ॥ मरण न ये सत्वर आम्हां कां ॥ संपातीनें शोध सितेचा सांगितला यावर ॥ चाल-शत गांवें सागर ॥ उडे एक वानर ॥ पावे लंकापुर ॥ लंका-पुरि शोधिली परि तथा न दिसे प्रभुसुंदरा ॥ ३ ॥ अशोक विपि-नांतरीं ॥ येतसे ॥ रामप्रिया लक्षिली तयानें बैसुनि वृक्षावरी ॥ बोले मधुरोत्तरीं ॥ जानकी ॥ भाग्यवंत श्रीरामदूत मज कां नच भेटे तरी ॥ परिसुनि तव वैखरी ॥ तुष्टल्यें ॥ वदन तुझें पाहुं दे एकदां ये ये बा झडकरी ॥ चाल-मग आला मारुती ॥ दिधलि मुद्रिका हातीं ॥ वंदुनि सीतासती ॥ ते समयींचा हर्ष न वदवे कुंठित झाली गिरा ॥ ४ ॥

[ २८ राम लक्ष्मण वनांत असतांना रावणानें कपट करून सीतेचें हरण केलें व तिला लंकेंत अशोकवनांत वंदोबस्तानें ठेविलें इकडे रामांनीं सीतेचा शोध चाल-

विला. पुढें सुग्रीवाची गांठ पडून त्याच्याशीं रामाचा स्नेह जमला व त्याच्या भावाला-वालीला-मारून रामांनीं सुग्रीवास किष्किंधेचें राज्य मिळवून दिलें; सुग्रीवानें आपला मंत्री मारुति यास सीतेचा शोध आणण्यास धाडलें. त्याजबरोबर रामांनीं खुणेकरितां आपली मुद्रिका दिली. मारुति लंकेंत गेला व हिंडतां हिंडतां अशोक वनांत त्यास सीता दिसली. तेव्हां त्यानें मुद्रिका सीतेस देऊन रामाचें कुशल वृत्त तिला कथन केलें. सीता व मारुति यांचा संवाद या गाण्यांत आहे. ]

---

## २९ पार्वती गर्वहरण

**( चाल–रामकृष्ण नरहरे० )**

**अघटित लीला करी ॥ रघुपति ॥ सीते सीते म्हणवुनी कवळी वृक्षलता निजकरीं ॥ ध्रु० ॥ चरित्र हें पाहुनी ॥ तेधवां ॥ श्रीसांबाला अंबा पुसते दोन्ही कर जोडुनी ॥ सांगावें स्वामिनीं ॥ मला हें ॥ कवणाला ध्यातसां निरंतर नेत्रद्वय झांकुनी ॥ परिसें दाक्षायणी ॥ सांगतों ॥ परब्रह्म निष्काम राम जो जपतों मी निशिदिनी ॥ चाल–हंसुनि म्हणे अंबिका ॥ निष्कामचि म्हणुं नका ॥ आहे मज ठावुका ॥ सीते सीते म्हणुनी रडतो पडतो विपिनांतरीं ॥ १ ॥ सांगावें तुज किती ॥ मत्प्रिये ॥ कामुक भासे सकल जनांपरि परब्रह्म रघुपती ॥ न कळे स्वरूप स्थिती ॥ जयाची ॥ सहा शास्त्र अठराहि पुराणें निगमहि कुंठित मती ॥ सुरवर पद वंदिती ॥ जयाचे ॥ गाति जया सनकादिक तो हा जनकसुतेचा पती ॥ चाल–महिमा बहु सांगतां ॥ परि मज वाटे वृथा ॥ वनिं जाइन मी आतां ॥ उमा म्हणे मी भुलविन रामा मौज पहा क्षणभरी ॥ २ ॥ शिवचरणा वंदुनी ॥ निघाली ॥ जनकसुतेचें रूप धरोनी उभि राहे काननीं ॥ सुरवर विस्मित मनीं ॥ जाहले ॥ म्हणति सत्य हे जानकी आली दशवदना निवटुनी ॥ भ्रमलों रे हिंडुनी ॥ बहुतची ॥ रे सौमित्रा कोमलगात्रा दावी नृपनंदिनी ॥ चाल–दयाघना रघुपती ॥ भ्रमली कैसी मती ॥ आली सीता सती ॥ ये ये सीते सद्गुण सरिते म्हणुनि पडे भूवरी ॥ ३ ॥ संनिध ये सत्वरी ॥ शिवप्रिया ॥ शोक**

पुरे हा पहा मजकडे बोले मधुरोत्तरीं ॥ लपल्यें मी क्षणभरी ॥ विनोदें ॥ परि चुकल्यें कीं क्षमा करावी दासी तुमची खरी ॥ बोले ते अवसरीं ॥ रघुविर ॥ किमर्थ येथें आलिस माते कृपा करीं मजवरी ॥ चाल–शिवप्रिये पार्वती ॥ कां त्यजिला निजपती ॥ नमन असो तुजप्रती ॥ लज्जित होउनि गजमुखजननी रामचरण धरि करीं ॥ ४ ॥ बोले शिवकामिनी ॥ राघवा ॥ जाणुनि चित्ता कां हो श्रमतां वृक्षाशिला कवळुनी ॥ परिसें कात्यायनी ॥ गूढ हें ॥ तरु पाषाणचि होउनि ठेले मत्प्राप्तीस्तव मुनी ॥ भाव असा जाणुनी ॥ अंतरीं ॥ मीष सितेचें दावुनि साचें कवळी तो धांवुनी ॥ चाल–वंदुनि घनसांवळा ॥ सति गेली स्वस्थळा ॥ अघटित प्रभुची लिळा ॥ दशरथबाळा परम कृपाळा मति द्यावी मज वरी ॥ ५ ॥

[ २९ रावणानें सीता चोरून नेल्यामुळें श्रीराम सीता वियोगानें विव्हळ होऊन उन्मत्ताप्रमाणें वृक्ष, पशु, पक्षी, इत्यादिकांस सीतेचें कुशल व पत्ता विचारूं लागले व सीते सीते म्हणून वृक्षलतांस मिठी मारूं लागले. श्रीराम हें महादेवाचें दैवत असल्यामुळें पार्वतीनें त्यांजपाशीं ही गोष्ट सांगून बायको करितां सामान्य मनुष्याप्रमाणें शोक करणाऱ्या रामाचें तुम्हीं ध्यान करितां यांतील बीज काय असें तिनें नवऱ्यास विचारलें व रामाची परीक्षा पाहण्यास जाण्याकरितां परवानगी मिळवून सीतेचें रूप घेऊन राम हिंडत होते त्या वनांत गेली. परंतु रामांनी तिला ओळखून आपल्या करण्याचें मर्म सांगितलें व तिला परत पाठविलें. हा कथा भाग या गाण्यांत आहे. ]

---

## ३० श्रीरामाचा शोक

( चाल–आजि अक्रुर हा नेतो० )

रे सौमित्रा सांग सख्या तूं मजला ॥ कुठें शोधूं जनकसुतेला ॥ ध्रु० ॥
बहु शिणलों रे हरिणामागें फिरतां ॥ न कळेच नेलि कुणी सीता ॥
तिजवांचुनियां वांचुनियां मज आतां ॥ मम जीवित व्यर्थचि पाहतां ॥
चाल–हा नभीं उगवला मित्र ॥ पोळवी पहा मम गात्र ॥ तूं उभा राहिं क्षणमात्र ॥ भ्रमरहित प्रभु परि दावी भ्रम झाला ॥ कुठें० ॥ १ ॥
श्रीरघुराया भलतें वदसी कां हें ॥ नभिं चंद्र उगवला पाहें ॥

मज कळलें कीं तम नाशक हा नोहे ॥ तूं कोण सांग लवलाहें ॥ चाल—कैसा भ्रम झाला चित्ता ॥ मी बंधु तुझा भगवंता ॥ तूं म्हणसि जरी मम भ्राता ॥ मी कोण वरें पुसतों ऐसें तुजला ॥ कुठें० ॥ २ ॥ नृप दाशरथीरामा म्हणती तुजसी ॥ तूं भूषण रविवंशासी ॥ जरि नृपसुत मी कां झालों वनवासी ॥ वद याचें कारण मजसी ॥ चाल-न कळे कां तुजला अजुनी ॥ इतुक्यास्तव येशी रानीं ॥ ताताज्ञा परिसुनि कानीं ॥ वनिं आलो रे कोण कोण वद मजला ॥ कुठें० ॥ ३ ॥ प्रभुदाशरथी वनवासासी निघतां ॥ घेतला सवें निज भ्राता ॥ गुरु आज्ञेनें सवें निघाली सीता ॥ इतुक्यांसह झाला येता ॥ चाल-सांडोनी पर्णकुटीतें ॥ मी काय करितसें येथें ॥ ना शोधिसि निज कांतेतें ॥ रे म्हणसि तरी मम कांता कवणाला ॥ कुठें० ॥ ४ ॥ त्या जनकसभे जाउनियां निज हातें ॥ भंगुनियां भवचापातें ॥ तैं जनकसुता पर्णियली रघुनाथें ॥ कां विस्मरलां सीतेतें ॥ चाल-हा हा मम कोठें सीता ॥ सुकुमारी जनकदुहिता ॥ मजला ती दावी आतां ॥ श्रीराम अशी दावी अघटित लीला ॥ कुठें० ॥ ५ ॥

[ ३० या गाण्यांत ( २९ ) वर्णिलेली रामाची उन्मत्तस्थिति असतांना श्रीराम व लक्ष्मण या उभयतांचा एका प्रसंगीं झालेला संवाद या गाण्यांत ग्रथित केला आहे. मुक्तेश्वर कवीनें आपल्या श्लोकबद्ध रामायणांत अशाच अर्थाचे दोन श्लोक लिहिले आहेत. ]

---

## ३१ सीतेचा निरोप ( राम जानकी संवाद. )

( चाल–हा भाद्रपदाचा महिना० )

श्रीराम म्हणे सीतेसी कितिक सांगावें ॥ विपिनासि तुवां नच यावें ॥ ध्रु० ॥ मम विरह होय बहु दुःसह कौसल्येसी ॥ समजाविल कवण तियेसी ॥ मूर्च्छीत जाहला तात सत्य तूं पहासी ॥ होईल सांग गति कैसी ॥ चाल–आहेस प्रिये तूं ज्ञाती ॥ कर विचार बरवा चित्तीं ॥ कां उगाच करिसी खंती ॥ मृदु मधुर बोलुनी त्यांचें दुःख

हरावें ॥ विपिनासि० ॥ १ ॥ भयभीत होसि चित्तांत परिस वचना या ॥ नानापरि राक्षसि माया ॥ बहु क्रूर श्वापदें फार असति ते ठायां ॥ कां करिसि दुराग्रह वांया ॥ चाल-खडे कंटक रुततिल पाया ॥ सुकुमार तुझी हे काया ॥ नाहींच तिथें मृदु शय्या ॥ मम मातृपितृ निज दैवत पुजुनि असावें ॥ विपिनासि० ॥ २ ॥ फळ मूळ जळ हि कधीं काळीं न मिळे तेथें ॥ सुखरुप वसें तूं येथें ॥ निज जनक-जननि तूं समजे या दोघांतें ॥ होईल सौख्य वनिं मातें ॥ चाल-सीते तूं चतुर शहाणी ॥ कां नयनीं आणिलें पाणी ॥ परिसोनि पतीची वाणी ॥ विनयेंच वदे श्रीरामा मज न त्यजावें ॥ विपिनासी० ॥ ३ ॥ इतिहास पहा पूर्वीचे कठिण प्रसंगीं ॥ त्यजिले कुणि कांत अभागी ॥ तारामति तशि दमयंती पतिसह वेगीं ॥ जाहल्या दुःखविभागी ॥ चाल-तैशीच अश्वपतिबाला ॥ जिंकिलें जियेनें काळा ॥ ठावीच असे जी सकळां ॥ आणीक वदूं मी किति तयांचीं नांवें ॥ विपिनासि० ॥ ४ ॥ श्रम नाहीं किमपि मज कांहिं भय नसे चित्ता ॥ प्राणेश्वर संनिध असतां ॥ बहु दिवस असे मज हौस सांगत्यें आतां ॥ सेवा नच आली हाता ॥ चाल-गुरु वशिष्ठ बोले काई ॥ सीतेसि सवें तूं नेई ॥ उभयतां लागती पायीं ॥ वनवास चरित यापुढति असे कीं वरवें ॥ विपिनासि० ॥ ५ ॥

[ ३१ पित्याच्या आज्ञेवरून श्रीराम वनास जाण्यास निघाले तेव्हां सीतेनें बरोबर जाण्याचा हट्ट धरला. तेव्हां रामांनीं तिची नानाप्रकारें समजूत केली परंतु तिचा निश्चय ढळला नाहीं. पुढें वशिष्ठांनींच रामास सीतेस नेण्यास सांगितलें. या संबंधी राम—सीता या उभयतांचा संवाद या गाण्यांत आहे.

---

## ३२ लक्ष्मणशक्ति

( चाल-उद्धवा शांतवन करजा० )

सौमित्र पडियला समरीं ॥ श्रीराम बहुत गहिंवरला ॥ ध्रु० ॥ एकदां नेत्र उघडोनी ॥ मजकडे पाहिं सुकुमारा । मधुरशा गोष्टि मजपाशीं ॥ वद कांहिं सुमित्रा-कुमरा ॥ तुजवीण कोण मज नाहीं ॥

मम हृदयानंदाविहारा ॥ चाल-अपराध तिळभरी नसतां ॥ कटु वचन वदलि तें सीता ॥ तो कोप आणुनी चित्ता ॥ सोडोनि जासि कां मजला ॥ १ ॥ त्यजुनियां राज्य धन दारा ॥ मजसवें काननीं येसी ॥ फलमूलकंद बहु परिचे ॥ मजसाठिं आणितां श्रमसी ॥ उपवासी चवदा वर्षे ॥ मम सेवा निशिदिनीं करिसी ॥ चाल-त्रैलोक्य धुंडितां पाहीं ॥ तुज ऐसा बंधु नाहीं ॥ हें मौन टाकुनी देई ॥ चल ऊठ जाउं अयोध्येला ॥ २ ॥ कौसल्या कोपेल मजसी ॥ तुजवीण अयोध्ये जातां ॥ त्यागील सत्य प्राणासी ॥ ती जाण सुमित्रा माता ॥ उर्मिळेसि काय वदूं रे ॥ केसें मुख दाखवुं आतां ॥ चाल-रघुपतिचे वंदुनि पाय ॥ तो सुषेण बोले काय ॥ आहे गा एक उपाय ॥ जंव रविचा उदय न झाला ॥ ३ ॥ औषधी द्रोणागिरि-वरच्या ॥ जरि कोणी आणिल आतां ॥ तरिच हा उठे तव बंधु ॥ सत्य जाण सीताकांता ॥ कार्य हें नव्हे इतराचें ॥ सांगावें श्रीहनुमंता ॥ चाल-हनुमंत निघाला वेगें ॥ पवनासि टाकुनी मागें ॥ कालनेमि वधुनी स्वांगें ॥ द्रोणागिरी घेउनि आला ॥ ४ ॥ गिरिप्रकाश देखुनि भारी ॥ श्रीराम कोपला बहुत ॥ सौमित्रा मारायासी ॥ रवि उदया आला सत्य ॥ तंव अंगद बोले रामा ॥ हा सूर्य नव्हे हनुमंत ॥ चाल-उठविला सुमित्रा बाळ ॥ हर्षला रामघननीळ ॥ मारुती वंदि पदकमळ ॥ श्रीराम धन्य बोलियला ॥ ५ ॥

[ ३२ रामरावणांचे युद्धांत रावणानें फेंकलेल्या शक्तीमुळें लक्ष्मण मूर्छित झाला असतां रामानें केलेला शोक या गाण्यांत आहे. त्या शक्तीचा प्रभाव असा होता कीं सूर्योदयाचे आंत इलाज न झाल्यास लक्ष्मण जगण्याची आशा नाहीं. तेव्हां मारुतीनें द्रोणगिरि आणून सुषेण वैद्याचे स्वाधीन केला. सुषेणानें द्रोणगिरीवरील दिव्य औषधींच्या योगानें लक्ष्मणास उठविलें. व सर्वांस आनंद झाला. ]

---

## ३३ रावण जानकी संवाद

( चाल-वारी संकट हरी दामाजीचें० )

विनवी जानकिसी राक्षसराया ॥ होई मम जाया ॥ध्रु०॥ श्रमसी वनवासी देखुनि तुजसी ॥ आणिलें सायासीं ॥ आतां मानिसि जरि

मम वचनासी ॥ भोगिसि सौख्यासी ॥ मंदोदरि देइन सेवेसी कष्टविसी निज तनु कां वाया ॥ १ ॥ दुष्टा नष्टा तव जिभली चळली ॥ कशि नाहीं जळली ॥ बुद्धीपर-दारा-गमना वळली ॥ कामें मति मळली ॥ वडवडसी किति दशतुंडा रे दंडिल तुजला श्रीरघुराया ॥ २ ॥ सोडीं सुंदरि गे रामाशेला ॥ ऐकें मम बोला ॥ रात्रौ मम वीरीं घालुनि घाला ॥ वधिलें दोघांला ॥ सौमित्रासह श्रीरामाचें आणियलें शिर तुज दावाया ॥ ३ ॥ दोन्ही शिरकमळें मायिक केलीं ॥ पाहातां मति भ्रमली ॥ आहा देवा मज काशि गत घडली ॥ म्हणुनी बहू रडली ॥ विपरित कैसें झालें आजी हा सौमित्रा हा रघुराया ॥ ४ ॥ त्रिजटा जानकिसी सांगे गोष्टी ॥ सुखरूप जगजेठी ॥ आल्यें पाहुनि मी अपुल्या दृष्टी ॥ धैर्य धरी पोटीं ॥ अल्पचि काळें नेइल तुजला मति देइल मज तद्यश गाया ॥५॥

[ ३३ रावणानें सीतेस लंकेंत अशोक वनात ठेवल्यावर ती आपणांस वश व्हावी म्हणून तिचें मन वळविण्याचे अनेक प्रकार सुरू केले. आपलें वैभव प्रदर्शन, रामाची निंदा, सुखोपभोगांची लालूच वगैरे. आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे मायेनें राम लक्ष्मणांचीं शिरकमलें उत्पन्न करून सीतेला दाखविलीं. हेतु कीं सीतेनें त्याचा नाद सोडावा. प्रथम सीता घाबरली परंतु त्रिजटा नांवाची एक राक्षसी जी सीतेवर प्रेम करीत होती तिनें खरा प्रकार सांगितला. हा प्रसंग या गाण्यांत आहे. ]

---

## ३४ रावणास विश्वरूप दर्शन

( चाल–अर्जुना इतर मज कांहीं० )

चहुंकडे बघुनि रामाला ॥ रामरूप रावण झाला ॥ नवलची ॥ध्रु०॥ सन्मुख चाप घेवोनी ॥ पाठिसी भक्त वरदानी ॥ बघे वाम सव्य निरखोनी ॥ दशरथसुत दों बाजूंनीं ॥ नवलची ॥ रथ अश्व सारथी नयनीं ॥ पाहतां राममय अवनी ॥ नवलची चाल–निजकरीं, चाप दृढ धरी, मूर्ति गोजिरी देखुनी भ्रमला ॥ क्षण एक राहिला उगला ॥ नवलची ॥ चहुं० ॥ १ ॥ निज सैन्य बघे लवलाहें ॥ जानकीरमण

**दिसताहे ॥ नवलची ॥ भयभीत वघे निज देह ॥ रामाविण कांहींच नोहे ॥ नवलची ॥ मग नेत्र झांकिले मोहें ॥ अंतरीं राम भरला हे ॥ नवलची ॥ चाल-जीव भाव, अयोध्याराव, पळाया ठाव कुठें ही नुरला ॥ स्थिर चरीं व्यापुनी उरला ॥ नवलची ॥ चहुंकडे० ॥२॥**

[ ३४ राम-रावण युद्धांत रावणाकडील सर्ववीर पडल्यावर प्रत्यक्ष राम-रावणाची लढाई जुंपली. त्या वेळीं रावणाची मनःस्थिति फार चमत्कारिक झाली होती. बंधु, पुत्र, सेनापति वगैरे मोठ मोठी मंडळी कामास आल्यामुळें ( युद्धांत पडल्यामुळें) तो रागानें जळफळत होता. अशा स्थितींत त्याला रामाचा ध्यास लागल्यामुळें त्यास सर्व ठिकाणीं राम दिसूं लागला. हें वर्णन या गाण्यांत आहे. ]

---

## ३५ मुद्रिका

( चाल-सांग विभो स्थिरमतिचें लक्षण० )

**सांग सखे तूं मुद्रे मजसी ॥ सुखी आहे कां राघव माझा ॥ध्रु०॥ म्यां पापिणिनें पाठविलें गे ॥ मृग मारुनियां सत्वर या जा ॥ १ ॥ मम हेतूतें पुरवायातें ॥ त्वरितांचि गेला श्रीरघुराजा ॥ २ ॥ मागितलें मी व्यर्थचि हरिण ॥ हरण करी मज राक्षसराजा ॥ ३ ॥ मुद्रे मजसी कांहिं न वदसी । आलिस सखये कवण्या काजा ॥ कां नच वदसी कुशल प्रभूचें ॥ म्हणुनि गहिंवरे राघवभाजा ॥ ५ ॥ हें देखुनियां तरुवरुनी मग ॥ संनिध आला तो कपिराजा ॥ ६ ॥ जोडुनियां कर अंजनि-कुमरें ॥ सांगितलें कीं सुखि रघुराजा ॥ ७ ॥**

[ ३५-३६ सीता रावणाचे बंदिशाळेंत अशोक वनांत असतांना श्रीरामांनी मारुतीस तिचा शोध घेऊन येण्यास सांगितलें. बरोबर खुणेकरितां मुद्रिका दिली. मारुतीनें ती मुद्रिका सीते समोर टाकली व आपण एका वृक्षावर बसून राहिला. मुद्रिकेला स्त्री कल्पून तिजबरोबर जानकीनें ज्या सुखदुःखाच्या गोष्टी केल्या त्यांचें शब्दचित्र या दोन गाण्यांत आहे. ]

---

## ३६ मुद्रिका

( चाल-अर्जुना इतर मज कांहीं० )

वनिं दुःखित सीताबाई ॥ वदतसे मुद्रिके काई ॥ जिवलगे ॥ ध्रु० ॥ भंगुनी ग शिव चापासी ॥ श्रीरामें वरिलें मजसी ॥ जिवलगे ॥ परिसुनी पितृवचनासी ॥ उभयतां आलों वनासी ॥ जि० ॥ माया-मृग आणायासी ॥ पाठविलें श्रीरामासी ॥ जि० ॥ चाल-रघुवीर रणांगणिं शूर, जाति बहु दूर, वनाच्या ठायीं ॥ मोहिले मृगाच्या पायीं ॥ जि० ॥ वनिं० ॥ १ ॥ निशिदिनीं जपत सेवेसी ॥ भावोजी रक्षण मजसी ॥ जि० ॥ वदलें मी कटुवचनासी ॥ शिणविलें बहुतचि त्यांसी ॥ जि० ॥ छळितां गे सौमित्रासी ॥ प्रचिती मज आली कैसी ॥ जि० ॥ चाल-म्हणुनीच नेइ मज नीच अभागी मीच स्वामिच्या पायीं ॥ अंतर हें पडलें पाहीं ॥ जि० ॥ वनिं० ॥ २ ॥ सुकुमार काननीं भ्रमले ॥ मजसाठीं बहुतचि श्रमले ॥ जि० ॥ कोणत्या देशिं ते बसले ॥ मुद्रिके तुजसि कां त्यजिलें ॥ जि० ॥ गहिंवरें जानकी बोले ॥ मौन कां मजसि त्वां धरिलें ॥ जि० ॥ चाल-मज त्वरें सांग तूं खरें तुजसि रघुविरें त्यजुनियां बाई ॥ परलोका गेले काई ॥ जि० वनिं० ॥ ३ ॥ वदे सद्गद जनककुमारी ॥ सखे आलिस कवण प्रकारीं ॥ जि० ॥ रावण हा कपटी भारी ॥ रचि माव दुष्ट अविचारी ॥ जि० ॥ मग नमीत ब्रह्मचारी ॥ म्हणे माये परिस वैखरी ॥ जि० ॥ चाल-रघुराज सुखी कीं आज शोधिलें तूज बहुतां ठायीं ॥ वंदन हें तुझिया पायीं ॥ जि० ॥ वनिं० ॥ ४ ॥

---

## ३७ पूर्वस्मृति

( चाल-जाऊं नको रे विषयवाटेची० )

दशरथ-नंदन राम दयाघन रुसला कां मजवरी ॥ करूं गत कैसी त्यजिलें मजसी निर्जन विपिनांतरीं ॥ ध्रु० ॥ वननीळासी सुमनमाळ मीं जे काळीं अर्पिली ॥ अत्यानंदें जनक वदे तैं भाग्याची तूं मुली ॥ मज ही वाटे नाहीं कोणी मज ऐसी भूतलीं ॥ न कळे

कैशी दृष्टचि माझी मद्भाग्या लागली ॥ चाल-दशरथें सुदिन पाहिला ॥ नृपपदीं राम योजिला ॥ जाहला हर्ष बहु मला ॥ कैकइ वचनें श्रीरघुनंदन वनिं निघती सत्वरी ॥ दशरथ० ॥ ॥ १ ॥ नच ठावा तो खेदचि मातें जरि गेलों काननीं ॥ पतिपद सेवा करीन अवघी सौख्यचि वाटे मनीं ॥ भावोजी ही बहुतचि जपले सेवेला निशिदिनीं ॥ परि दैवाची विचित्र करणी सुवर्णमृग ये वनीं ॥ चाल-मी सुवर्णमृग देखिला ॥ तो सत्यचि वनिं लेखिला ॥ त्यासाठीं प्रभु प्रार्थिला ॥ हरिणापाठीं राघव जातां दशमुख मजला हरी ॥ दशरथ० ॥ २ ॥ मम विरहानें रघुरायानें दुःख बहुत सोशिलें ॥ हा सीते हा सीते म्हणुनी शिला वृक्ष कवळिले ॥ विसरुनियां निज महत्व आपुलें वानरगण जोडिले ॥ मजसाठीं देउनी मुद्रिका हनुमंता धाडिलें ॥ चाल—मग आले लंकापुरीं ॥ निजकरें वधियला अरी ॥ बहु हर्षचि मम अंतरीं ॥ बसुनि विमानीं सदनीं जातां दाविति नानापरी ॥ दशरथ० ॥ ३ ॥ पहा खालतें वानर हातें सागरिं तरल्या शिला ॥ इथेंच आम्हां दशमुख बंधु शरणागत जाहला ॥ ऋष्यमूक नग दावुनि म्हणती इथें सुग्रिव भेटला ॥ येच स्थळिं नग तुझे दाविले हनुमंतानें मला ॥ चाल-बघ सुरम्य पंपासर ॥ हें पवित्र गोदातिर ॥ ही पंचवटी सुंदर ॥ शूर्पणखा स्मरते कां पुसती मजला मधुरोत्तरीं ॥ दशरथ० ॥ ४ ॥ आठवतें कां मृग सोन्याचा दिसला तुज या वनीं ॥ भरतभाव आठवतो म्हणती चित्रकूट पाहुनी ॥ गहिंवरुनी मज म्हणति तेधवां वसतों मी काननीं ॥ बंधुप्रेम सांगतां पातले अश्रुपूर लोचनीं ॥ चाल—दावुनियां ऐशा रिती मग गेलों नगराप्रती ॥ भरतातें आलिंगिती ॥ सिंहासनिं श्रीराम विराजे मुदित अयोध्यापुरी ॥ दशरथ० ॥५॥ नुरली चिंता वाटे आतां रामराज्य जाहलें ॥ नगरीं कोणी रजक निंदितां रामांनीं परिसिलें ॥ सामासांची गर्भिणि जरी मी नाहिं मनीं आणिलें ॥ दयाघनानें दया त्यजुनियां वनिं मातें त्यागिलें ॥ चाल-शोकाकुल प्रभु कामिनी ॥ तंव आला वालिमकमुनी ॥ निज आश्रमिं तिज नेउनी ॥ पुत्रवती ती सती जाहली सुरस कथा यावरी ॥ दशरथ० ॥ ६ ॥

[ ३७. यांतील प्रसंग उत्तर कांडांतील आहे. रावण वधाचें कार्य आटोपून श्रीराम लक्ष्मण, सीता व वानरमंडळी यां सह अयोध्येस परत आले. सर्वांस आनंद झाला. रामास राज्याभिषेक होऊन सर्व गोष्टी सुरळीत रीतीनें चालूं लागल्या. पुढें एके दिवशीं सीतेच्या संबंधानें लोकांत उठलेला प्रवाद रामाच्या कानीं येऊन त्यांनीं ती गरोदर असतांना तिला वनांत पाठविलें. त्यावेळीं रानांत एकटी, असहाय अशा स्थितींत असतां सीतेला आपल्या जन्मापासून झालेल्या सर्व गोष्टी, अनुभविलेले निरनिराळे प्रसंग आठवले ते या गाण्यांत वर्णिले आहेत. ]

---

## ३८ सीतेचा त्याग

( चाल–सुवक हें फूल गुलाबाचें० )

**भाउजी मार्ग तुम्हीं चुकलां ॥ ध्रु० ॥ ऋषिंचे आश्रम दिसति न अजुनी ॥ होम धूम्र कां न दिसे नयनीं ॥ वेदघोष कां नच ये कानीं ॥ न सुचे कांहिं मला ॥ भाउजी० ॥ १ ॥ ऋषिपत्न्या मज दिसतिल केव्हां ॥ गंगेचें तिर मजला दावा ॥ लक्षुमणा तुम्हि शोध करावा ॥ स्वस्थ कसे बसलां ॥ भाउजी० ॥ २ ॥ दुश्चिन्हें मज नयनीं दिसती ॥ धीर नसे किमपी मम चित्तीं ॥ निर्जन वन हें दिसतें पुढती ॥ फिरवा रथ आपुला ॥ भाउजी० ॥ ३ ॥ कैचे झाले मज डोहाळे ॥ मम दैवाचे विपरित चाळे ॥ काय गती कशि होइल नकळे ॥ रघुविर अंतरला ॥ भाउजी० ॥ ४ ॥ लक्ष्मण बोले कर जोडोनी ॥ रजकें निंदियलें परिसोनी ॥ रामें त्यजिलें तुम्हांसि वहिनी ॥ उपाय नच याला ॥ भाउजी० ॥ ५ ॥**

[ ३८. हाहि प्रसंग वरील गाण्यांतलाच आहे. सीता गरोदर असून तिला पुनः कांहीं दिवस आपण ऋषि आश्रमांत राहून त्यांची सेवा करावी असे डोहाळे झाले. सीते संबंधी उठलेला लोकप्रवाद दूर कसा होईल ह्या विचारांत राम होतेच. तेव्हां त्यांनीं या गोष्टीचा फायदा घेऊन लक्ष्मणास सीतेला वनांत पोंचविण्यास सांगितलें असतांना सीतेची समजूत आपण ऋषि–आश्रमाकडे चाललों अशी झाली. तिचा लक्ष्मणाबरोबर झालेला संवाद या गाण्यांत आहे. ]

---

## ३९ सीतावनवासवृत्त

( चाल-अनंत भगवंताचीं नामें० )

वनवासाची कथा सांगत्यें पुसतां मजला जरी ॥ खेद नच मानावा अंतरीं ॥ ध्रु०॥ श्रुतकीर्ती उर्मिळा मांडवी विदेह-तनयेप्रती ॥ वनींचा वृत्तान्तचि पुसती ॥ तुझिया वदनें गोडचि लागे कथा असो कवण ती ॥ जानकी म्हणे पुरे ही स्तुती ॥ चित्रकुटाहुनि भरत भाउजी गेले नगराप्रती ॥ आम्ही मग वनिं गेलों पुढती ॥ चाल-मी श्रमल्यें ऐसें स्वामी मनिं जाणती ॥ निज कृपाकटाक्षें मजला अवलोकिती ॥ श्रम हरले माझे सुख सांगूं तें किती ॥ अत्रि-आश्रमीं गेलों आम्हीं अनसूया सुंदरी ॥ मायशी वेणी फणि मम करी ॥ १ ॥ ऋषिची कांता ममतेनें मज हृदयीं आलिंगुनी ॥ म्हणे गे जपुनि रहा काननीं ॥ पंचवटीसी सत्वर गेलों ऋषिपायां वंदुनी ॥ राहिलों पर्णकुटी बांधुनी ॥ मम सेवेला बहुतचि जपले तुझे उर्मिळे धनी ॥ निज तनु श्रमवुनि दिन यामिनी ॥ चाल-तंव तेथें आली शूर्पणखा राक्षसी ॥ भाउजींस बोले वरिलें तुज मानसीं ॥ परि कर्ण नासिका गमवुनि पडली फशीं ॥ तिचा भाउ खर युद्ध कराया आला ते अवसरीं निमाला परि तो प्रभुच्या करीं ॥ २ ॥ चवदा सहस्र राक्षस तेव्हां स्वामीनीं मारले ॥ असें त्या राक्षसिनें पाहिलें ॥ लंकाभुवनीं त्वरित जाउनी रावणासि कळविलें ॥ ओस कीं जनस्थान पाडियलें ॥ मारिचासी मृगवेष देउनी आम्हां समिप धाडिलें ॥ रावणें छळण असें योजिलें ॥ चाल-मी म्हणें कधीं नच सुवर्ण मृग पाहिला ॥ तो धरुनी आणा हौसचि वाटे मला ॥ मम हेतु जाणुनी प्राणनाथ चालिला ॥ राक्षस कपटी जाणुनि पोटीं वधियेला सत्वरी ॥ तयानें मावचि केली परी ॥ ३ ॥ लक्षुमणा मी संकटिं पडिलों धांव धांव रे आतां ॥ तुजविणें कोण मला रक्षिता ॥ धडकी भरली हृदयीं माझ्या शब्द असा ऐकतां ॥ म्हणें मी धांव सुमित्रासुता ॥ माव राक्षसी म्हणति भाउजी वहिनी भय हें वृथा ॥ रघुविरा कवण असे मारिता ॥ चाल-मी म्हणे भाउजी अजुनी स्वस्थचि कसे ॥ कां अग्रजघाता

तव मन वांछीतसे ॥ मजविषयीं तुझिया पापबुद्धि मनिं वसे ॥ कपट तुझें मज कळलें आतां वहिनी म्हणसी जरी ॥ अंतरीं कुटी कल्पना पुरी ॥ ४ ॥ धनुष्य-रेखा मार्गी ओढुनि पुसुनि नयनिंच्या जला ॥ गेले वंदन करुनी मला ॥ विनापराधें दुर्वचनें मी छळिलें भाउजीला ॥ पाप तें फळलें माझें मला ॥ संन्याशाचा वेष घेउनी दशमुख मग पातला ॥ भिक्षा दे ऐसें बोलिला ॥ चाल-त्या भिक्षा द्याया रेखा उल्लंघिली ॥ मेल्यानें मजला तात्काळचि उचलली ॥ तत्स्पर्शे माझी काया कोमेजली ॥ लक्ष्मणा या श्रीरघुराया या हो या सत्वरीं ॥ हांक मी फोडिलि दीर्घ स्वरीं ॥ ५ ॥ मामाजीचे मित्रहि मोठे गृध्र जातिचे भले ॥ जटायू मजसाठीं धांवले ॥ वृद्ध जरी रावणासवें ते शौर्यानें झगडले ॥ युद्ध तें नेत्रीं मी पाहिलें ॥ परि दशवदनें अन्यायानें तत्पक्षचि उपटिले ॥ मूर्छित भूवरि ते पडियले ॥ चाल-नभ मार्गें जाई घेउनि तो मजप्रती ॥ देखिले तेधवां कपिविर ते पर्वतीं ॥ नग काढुनि मग मी टाकियले खालतीं ॥ शत गांवें तो सिंधु लंघुनी येउनि लंकापुरीं ॥ ठेवि मज अशोक विपिनांतरीं ॥ ६ ॥ महा भयंकर किति तरि राक्षसी मजलागीं रक्षिती ॥ तयांचा त्रास वदावा किती ॥ मारीच वधुनी पर्णकुटीला येतां श्रीरघुपती ॥ मार्गी लक्ष्मण पद वंदिती ॥ वृत्त परिसुनी म्हणती वत्सा बरी दिसेना गती ॥ जाउं चल त्वरित आश्रमाप्रती ॥ चाल-मग पर्णकुटीला येउनियां पाहती ॥ मजसाठीं अवघें गोदातट शोधिती ॥ मग शोक करिति तो सांगुं तुम्हांला किती ॥ माझीं नामें घेउनि प्रेमें वृक्ष कवळिती करीं ॥ भाउजी समजावित बहुपरी ॥ ७ ॥ मजसि शोधितां अवचित मार्गी जटायु अवलोकिले ॥ धरुनियां कंठिं प्राण राहिले ॥ मम हरणाचें वृत्त सांगुनी मरणातें पावले ॥ स्वामिसी दुःख बहुत जाहलें ॥ गहिंवरुनी म्हणती ताता आम्हां कां त्यागिलें ॥ शोकें मूर्छित ही जाहले ॥ चाल-निज जनकासम त्यां चित्तीं समजोनियां ॥ स्वकरेंच तयांची सकळहि केली क्रिया ॥ क्षणभरी तेधवां नाठवली हे प्रिया ॥ पुनरपि रडती मजसि शोधिती कबंध दोघां धरी ॥ मार्गी उद्धारिला तो अरी ॥ ८ ॥ पंपा सरोवरीं मग आले भेटुनि शबरी-

प्रती ॥ देखिला तिथेंच हा मारुती ॥ सूर्यपुत्र सुग्रीव भेटला ऋष्यमूक पर्वतीं ॥ तयाचें वृत्त सकल परिसती ॥ वाली वधुनी सुग्रिव केला किष्किंधेचा पती ॥ तो म्हणे उपकारा नच मिती ॥ चाल-नग आणुनि मग ते मारुतिनें दाविले ॥ मम शोधासाठीं वानर बहु धाडिले ॥ मम वार्ता न कळे बहु परि ते भागले ॥ सुग्रिव-हस्तें मरण निश्चयें परतुनि गेलों जरी ॥ मरावें म्हणती सागर तिरीं ॥ ९ ॥ सागर तीरीं वानर म्हणती धन्य जटायू भला ॥ स्वदेह रामकाजिं लाविला ॥ शोक करी संपाती तेथें बंधुनाश ऐकिला ॥ कपींना मम शोधचि कळविला ॥ शंभर गांवें हनुमंतानें नदीपाति उल्लंघिला ॥ शोधिली लंकापुरिसी मला ॥ चाल-मग अशोक वानिं ये बैसे वृक्षावरी ॥ मज प्रार्थाया ये दशमुख ते अवसरीं ॥ त्या कामांधाला न रुचे मम वैखरी ॥ राक्षसिपाशीं सांगुनि गेला जरि हे मासांतरीं ॥ वश नव्हे तरि खाइन सत्वरीं ॥ १० ॥ रावण जातां हनुमंतानें वर्णुनि जगपाळका ॥ दिधली मजला मग मुद्रिका ॥ स्कंधिं बसुनि मज म्हणे चल आतां भेटं रघुनायका ॥ माते धन्य करीं सेवका ॥ म्हणे तया मी येतिल स्वामी मारितील दशमुखा ॥ न यें मी तोंवर कपिनायका ॥ चाल-बहु क्षुधा लागली सांगे मज कपिवर ॥ मी म्हणे खाइं रे पडलिं फळें सत्वर ॥ तो वृक्ष झोडुनी फळें पाडि भूवर ॥ दशवदनाचा कुमर मारिला नामें अखया जरी ॥ वधियले वन रक्षक किति तरी ॥ ११ ॥ ब्रह्मपाशिं कपि बांधुनि घेई इंद्रजिताचे करीं ॥ न व्हावी मिथ्या विधि-वैखरी ॥ अग्नि लाविती कपि-पुच्छासी बहुत प्रयत्नांतरीं ॥ जाहलें नवलचि ते अवसरीं ॥ घरें गोपुरें मंदिर माड्या वाडे नाना परी ॥ तयानें जाळियलीं एकसरी ॥ चाल-लंकेची होळी करुनी ऐशा रिती ॥ मज पुसुनी गेला स्वामिकडे मारुती ॥ मम कुशल ऐकुनी सुखावले रघुपती ॥ सरितापति भेटुनियां सांगे सेतु करा मजवरी ॥ सुखानें जावें लंकापुरी ॥ १२ ॥ हित वचनें सांगतां नायके सभेंत अवमानिला ॥ बिभीषण शरण राघवा आला ॥ शरणागत वत्सल मत्स्वामी पाहुनि अरि-बंधुला ॥ बोलिले लंकापुरि घे तुला ॥ सेतु बांधिला अद्भुताचे तो नवल

वाटतें मला ॥ जळावरि तरल्या कीं जड शिळा ॥ चाल–त्या सेतु-पथानें आले लंकापुरी ॥ अंगदा धाडिलें बोधाया निज अरी ॥ त्या कथिली त्यानें स्वामींची वैखरी ॥ कोपुनियां दशकंठ म्हणे रे धरा धरा सत्वरी ॥ मर्कट वदतें भलत्यापरी ॥ १३ ॥ नायकेच दशवदन तेधवां स्वामी मनिं कोपले ॥ तत्क्षणीं वानर आज्ञापिले ॥ शिळा वृक्ष घेवोनि हस्तकीं कपिविर मग धांवले ॥ राक्षस दळ तैं निर्दाळिलें ॥ बहुत प्रयत्नें दशवदनें मग घटकर्णा उठविलें ॥ प्रभूसी माराया धाडिले ॥ चाल–सगळेंच गिळी तो वानर-सेनेप्रती ॥ तत्कर्णनासिकीं निघुनी गेले किती ॥ हें परिसुनियां त्या तिघीजणी हांसती ॥ हसूं नका सांगत्यें आइका बलाद्भुत तो अरी ॥ निमाला मम स्वामींच्या करीं ॥ १४ ॥ इंद्रजितानें हवन मांडिलें जय इच्छा धरि मनीं ॥ बैसला गुप्त स्थळ पाहुनी ॥ इतर जुत्पती मारुति सह तो बिभीषणहि घेउनी ॥ भाउजी गेले तैं धांवुनी ॥ इंद्रजीत हें नाम पावला पुरंदरा जिंकुनी ॥ परि तो वधिला भाउजींनीं ॥ चाल–तनु जर्जर झाली वधिला ऐसा अरी ॥ सुरसुमनें वर्षिति सौमित्राचे शिरीं ॥ हनुमंतें त्यांसी वाहुनि स्कंधावरी ॥ प्रभुपाशीं रणवृत्त कळवुनी मारुतिनें सत्वरीं ॥ घातला लक्ष्मण चरणावरी ॥ १५ ॥ करकमळें मुख कुरवाळुनियां बोले रवि-कुळ-मणी ॥ सख्या रे श्रमलासी आजि रणीं ॥ नेत्र उघडुनी पहा मजकडे वद रे मजसीं झणी ॥ तुजविणें मज नाहीं रे कुणी ॥ त्रिभुवनही शोधितां दिसेना तुजसम बंधू गुणी ॥ मौन कां धरिलें त्वां येक्षणीं ॥ चाल–मग सुषेण वैद्यें दिव्यौषधि आणुनी ॥ केले कीं सावध तुझे उर्मिळे धनी ॥ रघुपती तोषले हृदयीं आलिंगुनी ॥ इंद्रजिताचा अंत जाहला परिसुनि हे वैखरी ॥ रडतसे दशमुख दीर्घस्वरीं ॥ १६ ॥ सुलोचना इंद्रजित-ललना गेली शिर घेउनी ॥ जाहली धन्य सती त्रिभुवनीं ॥ बंधु मित्र आणि पुत्रहि सरले ऐसें अवलोकुनी । दशमुख आला रथिं बैसुनी । बिभीषणा सन्मुख पाहतां कोप नावरे मनीं ॥ प्रेरिली शक्ती अभिमंत्रुनी॥ चाल–पाठिसी घालुनी तेव्हां तो बिभीषण ॥ भावोजि धांवले सन्मुख तैं आपण ॥ तंव शरण म्हणे ती ब्रम्हशक्ति दारुण ॥ शरणागत म्हण-

वुनी तियेला ठाव दिला निज उरीं ॥ पडियले मूर्छित धरणीवरी ॥ १७ ॥ निज बाणें रावणा पळवुनी बंधु समिप सत्वर ॥ येउनी शोक करिति रघुविर ॥ रे लक्ष्मणा मम प्राण तूं होउं नको निष्ठुर ॥ जिवलगा रुसशी कां मजवर ॥ ऊठ ऊठ एकलाचि उरला मारूं तो दशशिर ॥ सुखानें पाहुं अयोध्यापुर ॥ चाल–शोकाकुल झाले राघव ऐशा रिती ॥ द्रोणागिरि तेव्हां आणितसे मारुती ॥ जिवविले बाइ गे तुझे उर्मिळेपती ॥ आलिंगिति बंधूसी रघुपति हर्षित बहु अंतरीं ॥ धांवली कपि–सेना अरिवरी ॥ १८ ॥ युद्ध जाहलें अत्यद्भुत तें सांगुं तुम्हां कुठवर ॥ स्वामिनीं मारियला दशशिर ॥ मज आणाया मारुतिराया पाठविला सत्वर ॥ जाहलें हर्षित मम अंतर ॥ जनापवादासाठीं मजला वदले कठिणोत्तर ॥ जाहलें मूर्छित मी क्षणभर ॥ चाल–मग अग्नि–कुंडिं मी निज काया न्हाणितां ॥ सुर सुमन वर्षती ऐसें अवलोकितां ॥ स्वर्गींहुनि आले मामांजी अवचितां ॥ मामांजीची आज्ञा परिसुनि तशीच नभ–वैखरी ॥ मजप्रती घेति निजांकावरी ॥ १९ ॥ बसुनि विमानीं सदनीं येतां स्वामीनीं दाविला ॥ अद्भुत सेतू पथ पाहिला ॥ सुग्रिव–दारा ताराबाई भेटवुनीयां मला ॥ चाललों पहाताचि नाना स्थलां ॥ भरत भरत हा नाम मंत्र मी स्वामि मुखें ऐकिला ॥ लोचनीं अश्रुपूर देखिला ॥ चाल–मग आलों आम्हीं अयोध्येसि सकाळिक ॥ सकळांस भेटुनी झालें अनुपम सुख ॥ आहेच तुम्हाला पुढिल वृत्त ठाउक ॥ राम कथा ऐकतां भव–व्यथा त्वरिताचि होइल दुरी ॥ संशय न धरावा अंतरीं ॥ २० ॥

[ ३९. रामायणांतील निरनिराळ्या प्रसंगांवर रचलेल्या सर्व गाण्यांत हें गाणें विस्तारानें मोठें आहे. रावणवधादि कार्य आटोपून सर्व मंडळी परत आल्यावर सीतेस तिच्या धाकट्या जावांनीं तिला सर्व हकीकत विचारली व तिनें भरतभेटीपासूनचा सर्व वृत्तांत मनोरंजक तऱ्हेनें सांगितला. कविश्रेष्ठ मोरोपंत यांनीं मुलींकरितां सुमारें १७५ ओंव्यांचें एक लहानसें प्रकरण रचलें आहे तोच आधार या गाण्यास आहे. ]

## ४० धांवा—द्रौपदीचा

( चाल– हा भाद्रपदाचा महिना० )

हे कृष्णा यदुकुलभूषा नंद कुमारा ।। बा धांव पाव यदुवीरा ।। ध्रु० ।। कपटेंच करुनि पण साच पांडुच्या कुमरां ।। जिंकोनि साधिलें वैरा ।। हे कृष्णा० ।। १ ।। धृतराष्ट्र पुत्र पापिष्ट म्हणे मी नवरा ।। पति त्यजुनि होईं मम दारा ।। हे कृष्णा० ।। २ ।। पति पांच साहती जाच अंध-सुत दुसरा ।। ओढितो पहा मम पदरा ।। हे कृष्णा० ।। ३ ।। अघहनना कालियदमना गिरिवरधारा ।। पूतनांतका मुरहरा ।। हे कृष्णा० ।। ४ ।। तव बहिण म्हणवितें जाण धीर उदारा ।। हे यमुनातीरविहारा ।। हे कृष्णा० ।। ५ ।। खगवहना पन्नगशयना पतितोद्धारा ।। जगपालक जगदाधारा ।। हे कृष्णा० ।। ६ ।। तव कीर्ति वर्णुं किति तरिती भक्त-कैवारा ।। धरिलेस दहा अवतारां ।। हे कृष्णा० ।। ७ ।। व्रजवासि अजुनि नच येसि कुणाचा असरा ।। तुजवीण नाहिं मज दुसरा ।। हे कृष्णा० ।। ८ ।। पाठिसी उभा हृषिकेशी हर्षे सुंदरा ।। देखोनि श्यामसुंदरा ।। हे कृष्णा० ।। ९ ।। यदुराय करितसे काय चरित अवधारा ।। तिजसाठिं धरित अवतारा ।। १० ।। दुःशासन असुडी वसन झाला बेजार ।। वस्त्रांसि अंत ना पार ।।११।। यदुराज राखिली लाज विनति अवधारा ।। निज चरणीं देईं मज थारा ।। १२ ।।

[ ४० ते ४५ हीं सहा गाणीं भारतांतील निरनिराळ्या प्रसंगांवर रचलेलीं आहेत. पैकीं ४०–४१ यांतील प्रसंग सभा पर्वांतला आहे. दुर्योधनानें पांडवांस द्यूतांत कपटानें जिंकून त्यांचें राज्य घेतलें. धर्मानें स्वतः, बंधु व पत्नी–द्रौपदी–या सर्वांस पणांत लावल्यामुळें व द्यूतांत तो हरल्यामुळें ते सर्व कौरवांचे दास झाले व दुर्योधनानें द्रौपदीस सभेंत आणवून तिला विवस्त्र करून तिची विटंबना करण्याचा घाट घातला. त्यावेळीं द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा केला व भगवंतांनीं येऊन वस्त्रें पुरवून तिची सुटका केली. दरबारांत तिचा छळ चालला असतां तिनें जो धांवा केला तो या दोन गाण्यांत आहे. ]

## ४१ धांवा–द्रौपदीचा

( चाल–खरें वाणलें० )

मला पावगा केशवा केशिहनना ॥ द्वारकावासि आनंद सदना ॥ ध्रु० ॥ धर्म नृपती खरा ॥ कपट नेणे जरा ॥ नाडियेला पुरा दुर्जनांनीं ॥ द्यूत आरंभिलें ॥ राज्यही हरविलें ॥ लाविले पणिं भले बांधवांना ॥ मला० ॥ १ ॥ मी जरी ऋतुमती ॥ अंधसुत दुर्मती ॥ ओढुनी मजप्रती नेइ बापा ॥ केश धरिले खळें ॥ मज सभे आणिलें मौन्यची मानलें गुरुजनांना ॥ मला० ॥ २ ॥ कुरु–कुलाधम जरी ॥ ओढि माझी निरी ॥ नेणसी अंतरीं सांग कैसें ॥ कुरुसभे भीतरीं ॥ लाज गेली जरी ॥ तुजसि कैसी हरी दावुं वदना ॥ मला० ॥ ३ ॥ नंदाच्या नंदना ॥ गोपि–मन–रंजना ॥ शत्रु–मद–भंजना धांव आतां ॥ श्रीरंगे माउली ॥ वहिण तव गांजली ॥ नीज कां तुज आली शेष-शयना ॥ मला० ॥ ४ ॥ येइं गा यादवा ॥ येइं गा माधवा ॥ येइं करुणार्णवा देवराया ॥ प्रल्हादा रक्षिलें ॥ पशु गजा तारिलें ॥ ब्रीद तव गाजलें भक्त जिवना ॥ मला० ॥ ५ ॥ यदुपते यदुविरा ॥ मा–पते मुरहरा ॥ धांव शारंग्धरा बंधुराया ॥ राधिका प्रियकरा ॥ धांव सर्वेश्वरा ॥ श्यामला सुंदरा कुंदरदना ॥ मला० ॥ ६ ॥ गहिंवरे द्रौपदी ॥ वाट पाहूं किती ॥ धांव कमलापती कमलनेत्रा ॥ विनति ऐशापरी ॥ परिसुनी अंतरीं ॥ प्रगटुनी श्रीहरी पुरवि वसना ॥ मला० ॥ ७ ॥

---

## ४२ चुडेदान

( चाल–चंद्रकांत राजाची कन्या० )

देवकी–तनया यादव राया सदया करुणाकरा ॥ चुडे भरावे मजला आतां श्रीरुक्मिणिच्या वरा ॥ ध्रु० ॥ राजसूय यज्ञाच्या समयीं नृपपंगति वाढितां ॥ न कळे कैचें बिरडें सुटलें कंचुकिचें अवचितां ॥ कर्ण शकुनिसह अंधसुतहि शत ऐसें अवलोकितां ॥ हंसाति परस्पर पिटिति टाळिया तुज कळली मम व्यथा ॥ चाल–

दावाया अघटित लीला ॥ सांगावें नलगे तुला ॥ केलीस चतुर्भुज मला ॥ ते वेळीं त्वां दिधली चोळी आठव आहे पुरा ॥ चुडे० ॥ १ ॥ कपट द्यूतें खेळुनि जेव्हां निज राज्य हराविलें ॥ अंधसुतानें वेणी धरूनी सभेसि मज नेलें ॥ सिंहासम मम पांच हि पति परी मौन धरुनि बैसले ॥ दुःशासन तो नष्टदांडगा मम वस्त्रांचि हिसाकिलें ॥ चाल-हें संकट त्वां जाणुनी ॥ मग आलासी धांवुनी ॥ लज्जार्णवि मज तारुनी ॥ नेसविलीं मज लुगडीं तीं घडि विस्मरली नच जरा ॥ चुडे० ॥ २ ॥ छळण कराया कौरवरायें युक्ति योजिली मनीं ॥ निशिमाजी जा भोजन मागा ऐसें बहु प्रार्थुनी ॥ ऋषिवृंदासह पाठविला मग तो दुर्वासा मुनी ॥ चाल-वा सांडुनियां भोजना ॥ आलासि जगज्जीवना ॥ रक्षियली दासांगना ॥ लेवविली गळसरी तेधवां प्राणसख्या श्रीधरा ॥ चुडे० ॥ ३ ॥ निष्पांडावि ही करितो उर्वी वध नंदाच्या सुता ॥ स्मरतें तुज कां या भीष्माचा शब्द जाहला वृथा ॥ लटकी ना हे भीष्म प्रतिज्ञा ठावें तुज अच्युता ॥ कमला कांता श्रीभगवंता चुडे भरी मज आतां ॥ चाल-हरि म्हणे द्रौपदीप्रती ॥ भीष्माच्या शिबिराप्रती ॥ चल आतां मज संगती ॥ गंगातनुजा वंदन करिं जा मुख न दाखवी जरा ॥ चुडे० ॥ ४ ॥ कंकण नादें मनिं समजे कीं साध्वी सधवा कुणी ॥ बहु आनंदें पतिसह नांदें-भीष्म बोलिले झणी ॥ कोण सती तूं मज वंदाया आलिस कां या क्षणीं। द्यूत खेळतां धर्म नृपानें हाराविली जी पणीं ॥ चाल-तुज अभय असे गे मुली ॥ वद आलिस कशि एकली ॥ श्रीरंगें मज आणिली ॥ हरिच्या दासा भय नच सहसा निर्भय जा मंदिरा ॥ चुडे० ॥ ५ ॥

[ ४२. कौरव-पांडव युद्धांत कौरवांकडील सेनापति पितामह भीष्म होते. युद्धाचे नऊ दिवस झाले तरी पांडवांकडील एकही नामांकित योद्धा पडला नाहीं हें पाहून दुर्योधन भीष्मास लागून बोलला तेव्हां भीष्मांनीं पांडवांस तरी मारीन नाहीं तर स्वतः मरून जाईन अशी प्रतिज्ञा केली. भीष्माचा पराक्रम श्रीकृष्णास माहित असल्यामुळें त्यानें युक्तीनें पांडवांचें रक्षण केलें. या प्रसंगीं द्रौपदीनें केलेला धांवा या गाण्यांत आहे. ]

## ४३ श्रीसावित्री चरित्र

( चाल–भजति नर अनन्य जे मातें० )

आयका सावित्री चरिता। मार्कंडेय मुनीनें कथिलें गाइन मी आतां॥ ध्रु० ॥ प्रथमची नमिला गजवदन। वाग्देवी शारदा वंदिली सद्भावें करुन। माये दे मज वरदान। सति सावित्री चरित्र प्रेमें करीन मी कथन। वद असें वत्से कर कविता ॥ १ ॥ काननीं पांडूचे तनय। सुखें वर्ततां सहज पातला मुनि मार्कंडेय। नृप पुसे वंदुनि तत्पाय। पांचाली सम सती त्रिभुवनीं आढळली काय। ढळेना सत्त्व जिचें पाहतां ॥ २ ॥

( चाल–जमका अजब तडाकावे० )

सावित्री चरिता। परिसे भूपाला आतां ॥ ध्रु० ॥ अश्वपती या नामें होता मद्र देशिचा भूप। प्रेमें पाळी निजप्रजेसी स्वसुता जैसा बाप। सावित्रीच्या वरप्रसादें कन्या जाहली त्याला। सावित्री हें नाम ठेवुनी करि बहु उत्साहाला। किति वर्णावें स्वरुप तियेचें उपमा नाहीं जगतीं। नृपसदनीं अवतरली साक्षात् सौंदर्याची मूर्ती। नृपांगणीं सावित्री खेळे विविध परीचे खेळ। मातापितरें मुदित होउनी म्हणति धन्य हा काळ। शुक्लपक्षिंच्या इंदूसम ती वाढे दिवसें दिवस ॥ अश्वपतीला पडली चिंता देऊं हे कवणास ॥ कन्ये-योग्य दिसे ना नवरा शोधुनि श्रमला नृपती ॥ सावित्रीस म्हणे मग राजा वर शोधुनि ये जगतीं ॥ झालिस बाळे थोर परी तुज वर नच मागे कोणी ॥ म्यां तरि कवणा व्यर्थचि द्यावी ऐशी सद्गुण खाणी ॥ येई वत्से वर शोधुनि तूं जो माने तव चित्तीं ॥ बहुत सांगणें कशास तुजला विरला तुजसम सुमती ॥

( चाल–ईश्वरहा स्थिरचरीं० )

ताताज्ञा परिसुनी भूपनंदिनी संगें सचिव सख्या घेउनी ॥ निघाली त्वरितचि मग तेथुनी ॥ पाहे मृगलोचनी कुणि नये मनीं श्रमली बहुत देश हिंडुनी ॥ नृपसुता आली मग काननीं ॥ चित्राश्वा पाहुनी सुखावे मनीं म्हणे हा योग्यचि मजला धनी ॥ आली निज

सदनीं परतुनी ॥ नृपसंनिध सुरमुनी अवलोकुनी तयांच्या चरणां-प्रति वंदुनी ॥ राहिली दूर उभी लाजुनी ॥ सस्मित वदला मुनी आलि कोठुनी नृपाला तुझि हे प्रियनंदिनी ॥ नृप म्हणे आली वर शोधुनी ॥

( चाल-नियम पाळावे० )

सांग मुलि आतां ॥ वर कवण मानला चित्ता ॥ ध्रु० ॥ वत्से किमपी नच लाजावें ॥ त्वरितचि मजप्रति त्वां सांगावें ॥ नारद मुनिनें धन्य म्हणावें ॥ सांग वृत्तांता ॥ १ ॥ ताता श्रमल्यें बहु हिंडतां ॥ योग्य दिसेना कुणि पाहतां ॥ नृप एक देखियला अव-चिता ॥ काननीं वसतां ॥ २ ॥ आहे भूप परि वनवासी ॥ द्युम-त्सेन हें नाम तयासी ॥ तोचि श्वशुर मानला मजसी ॥ परिसें ताता ॥ ३ ॥ पुसतां मुनि बोले लवलाहीं ॥ अश्वपते तुज योग्य न त्याही ॥ अंधभूप तो राज्यहि नाहीं ॥ कठिण अवस्था ॥ ४ ॥ अंध श्वशुर परि मजला व्हावा ॥ निशिदिनि करिन तयांची सेवा ॥ तत्सुत माझा प्राण विसांवा ॥ निश्चय पुरता ॥ ५ ॥ पुनरपि मुनि बोले उत्तर ॥ होतां एक संवत्सर ॥ जाइल पहावया यमपुर ॥ म्हणसि जो भर्ता ॥ ६ ॥ सद्गद नृप बोले सावित्री ॥ दुसरा वर पाहुनि ये नेत्रीं ॥ आग्रह न धरीं गे मृदुगात्री ॥ सुखवि समस्तां ॥ ७ ॥

( चाल-हरि तव विपरीत वचन दिसे० )

ताता मी वरिना चि वर दुसरा ॥ ध्रु० ॥ अल्पायुषि जरि वरिला म्यां अंतरीं निश्चय न ढळे जरा ॥ १ ॥ त्या वांचुनियां पुरुष जगीं या जनक कीं बंधु खरा ॥ २ ॥ लिहिलें जें भाळीं कुणी नच टाळी व्यर्थ कां खेद करा ॥ ३ ॥ मुनिराय बोले गे नृप-बाळे वंद्य तूं नारि नरां ॥ ४ ॥

( चाल-वारी संकट हरि दामाजीचें० )

बोले विधि-नंदन रे नृपनाथा ॥ धन्य तुझी दुहिता ॥ ध्रु० ॥ गाती जगतीं नर नारी वाचे ॥ यश सावित्रीचें ॥ राया कुल सकलहि उद्धरि तुमचें ॥ कथितों तुजसाचें ॥ द्युमत्सेन सुता दे निज दुहिता-

सुखरुप राहें येतों आतां ॥ १ ॥ रायें जायेसी कथिलें वृत्त ॥ केलें साहित्य ॥ राया द्युमत्सेना सांगति दूत ॥ परिसावी मात ॥ तव पुत्रा सावित्री देतो अश्वपती नृप सत्यचि वार्ता ॥ २ ॥ रायें उत्तम दिन तैं पाहियला ॥ काननिं मग आला ॥ पाहतां द्युमत्सेना अंतरिं श्रमला ॥ बहुताचि गहिंवरला ॥ द्युमत्सेन म्हणे रे महिपाला आलें काय तुझ्या हें चित्ता ॥ ३ ॥ राया तव तनया दे आणिकासी ॥ योग्य न आम्हांसी ॥ नाहीं आम्हां घरीं दास दासी ॥ केवळ वनवासी ॥ शीत उष्ण साहेल कशी हे सावित्री सुकुमारी पाहतां ॥ ४ ॥ माझ्या कन्येचा निश्चय अढळ ॥ वरिला तव बाळ ॥ आतां पदरीं घ्या हे लडिवाळ ॥ नच लावा वेळ ॥ अश्वपतीनें चित्राश्व-करीं दिधली विधियुक्ताचि निज दुहिता ॥ ५ ॥

( चाल–भजति नर अनन्य० )

अश्वपति चित्तीं गहिंवरला ॥ कुरवाळोनि कन्येस म्हणे गे निरोप दे मजला ॥ ध्रु० ॥ वत्से वडिलांची सेवा ॥ आवडिनें करिं मुली तयांचा बोल नुलंघावा ॥ भजावें निशिदिनिं पति देवा ॥ नांद सुखें लाडके चिरायू कांत तुझा व्हावा ॥ सांगणें नलगे बहुत तुला ॥ १ ॥ चुंबुनि तनयेचें वदन ॥ माय म्हणे सावित्रि तुजविणें शून्य आम्हां सदन ॥ मजविण भोजन वा शयन ॥ कधिं नाहीं केलेंस आजवरि जरि होतिस लहान ॥ साहुं कशी तुझिया विरहाला ॥ २ ॥ नयनीं वाहाती अश्रुपूर ॥ जनक जननिसी वंदुनि बोले सावित्री मधुर ॥ न करा खेद अतां फार ॥ कळविन मी आपुला तुम्हाला सकळ समाचार ॥ सुखानें जावें नगराला ॥ ३ ॥

( चाल–तो मज प्रियमोठा० )

राहे पति सदनीं नृपबाला ॥ सेवुनि फल मूळांला ॥ ध्रु० ॥ सेवा वृद्धांची करि जपुनी ॥ सादर पतिपद भजनीं ॥ वागे अंतरिचें ओळखुनी ॥ प्रसन्न मुख मृदु वचनीं ॥ वल्कल वेष्टुनियां निज तनुला ॥ १ ॥ सकलहि मुनि म्हणती द्युमत्सेना ॥ तव पुत्राची ललना ॥ राज्यलक्ष्मी तुझि आली वना ॥ सरली तुझि रे दैना ॥ वाटे खचितचि

हें आम्हांला ॥ २ ॥ मोजी दिवस सदा वेल्हाळ ॥ पति मरणाची वेळ ॥ कळलें मनिं ऐसें ये जवळ ॥ म्लान होय मुखकमळ ॥ नारद-वचनार्थ मनिं स्मरला ॥ ३ ॥ चारचि दिन उरले पति-मरणा ॥ परि नच सांगे कवणा ॥ चित्तीं चिंतुनियां पति चरणां ॥ सती करि व्रत आचरणा ॥ फळ मुळ वर्जियलें उदकाला ॥ ४ ॥ बोले श्वशुर तदा सावित्री ॥ झालें व्रत तिन रात्री ॥ सुकलें वदन तुझें मृदु गात्री ॥ करि भोजन नृप पुत्री ॥ वाढीं मग आम्हां सकळांला ॥ ५ ॥ करीन पारणा सूर्यास्तीं ॥ चिंता न करा चित्तीं ॥ फळ मुळ आणाया निघे पती ॥ सावित्री करि विनंती ॥ संगें मी येत्यें न्या मजला ॥ ६ ॥

( चाल-श्रीहरी दीनउद्धरी भक्त वहुपरी० )

सुकुमार प्रिये तूं फार कष्टसी थोर काय सांगावें ॥ तूं येउं नको परि मजवरि नच कोपावें ॥ ध्रु० ॥ केलेस तीन उपवास व्याघ्र सिंहांस पाहतां नयनीं ॥ तुज भरेल धडकी तद्रव पडतां कानीं ॥ वहु दिवस असे मज हौस सांगुं कवणास तुम्हां वांचोनी ॥ येईन स्वामिचा हस्त निज करीं धरुनी ॥ सुंदरी येशि तूं जरी येइं सत्वरीं वडिलां पुसुनी ॥ जरि देतिल आज्ञा जाउं उभयतां मिळुनी ॥ चाल-श्वशुरासि वंदुनी बोले हळुच ती ॥ जातात फळें आणाया मम पती ॥ त्यां सवें जाउनी येतें मागुती ॥ तुज नाहीं म्हणेना कांहीं परी लवलाही उभयतां जावें ॥ रे चित्राश्वा त्वां सांभाळुनि हिस यावें ॥ १ ॥ पतिहस्त धरुनि पथ क्रमित विनोदें हंसत बोलुनी मधुर ॥ प्रियकरा पहा हे नृत्य करिति कीं मयुर ॥ प्रियतमा नका करूं श्रमा चला आश्रमा अहो नृपकुमर ॥ हा घर्म दाटला म्लान दिसे मुख फार ॥ सुंदरी गोष्ट हे खरी होति मम शिरीं वेदना थोर ॥ मम भान हरपलें सकलहि गेला धीर ॥ चाल-मृदु अंकीं शिर पतिचें घेउनी ॥ वट तरु तळीं ते काळीं बैसुनी ॥ सत्यवान मूर्छित झाला पाहुनी ॥ करि शोक नृपाची लेक रडुं नको ऐक कुणी सांगावें ॥ प्रारब्ध गती हे अशी कितिक वर्णावें ॥ १ ॥

( चाल–आजि अक्रुर हा नेतो० )

करि शोक वनीं अश्वपतीची बाळा ॥ अश्रुपूर वाहती डोळां ॥ ध्रु० ॥ या त्वरित असें वदले तात तुम्हांसी ॥ कां विस्मरलां आज्ञसी ॥ कां बोलाना उघडाना नयनांसी ॥ चुकलि कीं काय हे दासी ॥ चाल–हा हा मम दैवचि फुटलें ॥ सौभाग्य धन कुणीं लुटिलें ॥ मम सौख्य सिंधुजळ आटलें ॥ कशि वृद्धांची दया आलि नच काळा ॥ १ ॥ रवि मावळला तंव आला रवि-तनय ॥ सति वंदितसे तत्पाय ॥ कर जोडुनियां म्हणे नाम तव काय ॥ मज म्हणती गे यमराय ॥ चाल–कां येणें जाहलें येथें ॥ न्यावया सत्यवानातें ॥ तव दूत नेति प्राण्यांतें ॥ ये समयीं कां श्रमलासी कनवाळा ॥ २ ॥ हा पुण्यात्मा साध्वीपति तव बरवा ॥ करि मातृ–पितृ–पद सेवा ॥ हा न्यायासी दूत न म्यां योजावा ॥ स्वकरें च नर असा न्यावा ॥ चाल–चालिला तदा जगहंता ॥ मागुनी निघे नृप–दुहिता ॥ यम म्हणे येसि किति आतां ॥ मी लेंक तुझी म्हणुनि नमि पद कमला ॥ ३ ॥

( चाल–मन माझें भ्यालें० )

व्यर्थचि न श्रमावें ॥ गे सावित्री परम पवित्रे परतुनियां जावें ॥ ध्रु० ॥ करिं जा आतां सत्कर्माला ॥ माझ्यामागें येशि कशाला ॥ पति जाइल तव शुभ लोकाला ॥ कथितों तुज बरवें ॥ १ ॥ यम-राया मी पडतें पायां ॥ मजला जाणावी निज तनया ॥ गृहिं नेतोसी जरि जांवया ॥ कन्येसहि न्यावें ॥ २ ॥ तुष्टुनि बोलतसे रविपुत्र ॥ माग एक वर पतिविण मात्र ॥ मामाजींनां दिव्यचि नेत्र ॥ देवा त्वां द्यावे ॥ ३ ॥ दिव्यचक्षु दिधले श्वशुराला ॥ आतां कां या करिसि श्रमाला ॥ झालें शव तें भार भुमीला ॥ किति तुज सांगावें ॥ ४ ॥ यमराया तुज म्हणती संत ॥ तुझिया संगें क्रमिला पंथ ॥ पाहुं नको अवलेचा अंत ॥ पतिसह मज न्यावें ॥ ५ ॥ दीन उपेक्षा संतीं केली ॥ ऐसी मात कधीं नायकली ॥ सत्संगति मज अवचित घडली ॥ दैव दिसे बरवें ॥ ६ ॥ ऐशा वचनें रविसुत द्रवला ॥ माग म्हणे वर पति-

विण दिधला ॥ मामाजीच्या हरुनि श्रमाला ॥ स्वराज्य पावावें ॥७॥ श्वशुरा राज्य दिलें जा बाई ॥ बहुत दूर तूं आलिस पायीं ॥ झालिस निज पतिला उतराई ॥ आतां तरि जावें ॥ ८ ॥ सत्संगें नच जाहली तृप्ती ॥ सत्संगानें उपजे भक्ती ॥ सत्संगानें सुलभचि मुक्ती ॥ किती तरि वानावें ॥ ९ ॥ सत्संग जड मूढा तारी ॥ त्रिविध ताप सत्संग निवारी ॥ सत्संगाचा महिमा भारी ॥ मजला नच वदवे ॥ १० ॥ पुनरपि बोले तो जगहंता ॥ माग तिजा वर पतिविण आतां ॥ तव वरदानें माझ्या ताता ॥ शंभर सुत व्हावे ॥ ११ ॥ तुझिया वचनें सुख बहु झालें ॥ तव बोलें मम कर्ण निवाले ॥ अश्वपतीला शतसुत दिधले ॥ आतां परतावें ॥ १२ ॥ परिस विनंती हे यमराया ॥ देहासंगें जैसी छाया ॥ सतिनें नच त्यजिजे पतिराया ॥ असेल तुज ठावें ॥ १३ ॥ कथितें तुजला कर जोडोनी ॥ पतिसंगें मज ने निज सदनीं ॥ सावित्रीच्या करुणा वचनीं ॥ रवि-सुत चित्तिं द्रवे ॥ १४ ॥ वत्से येइल तव इच्छेसी ॥ घे मागुनि वर दिधला तुजसी ॥ विधवा ऐसें तव कन्येसी ॥ लोकीं न म्हणावें ॥ १५ ॥ वंध्या शब्द नको मज ताता ॥ बोले अश्वपतीची दुहिता ॥ यम बोले जा दिधलें आतां ॥ पतिसह नांदावें ॥ धन्य धन्य सति ऐसें म्हणुनी ॥ किति तरि वर्णावें ॥ १६ ॥

( चाल—सुवक हें फूल गुलावाचें० )

प्रियकरा आश्रमीं जाऊ चला ॥ निज अंकीं पति शिर घेवोनी ॥ वारा घाली घर्म पुसोनी ॥ बोलतसे तैं कोमल वचनीं ॥ उघडा नयनांला ॥ १ ॥ सावध झाला कांत तियेचा ॥ बोले निजलों मी केव्हांचा ॥ काळ पुरुष तो कुठें मघांचा ॥ सांगें सत्य मला ॥ २ ॥ नेइ बळें तो ओढुनि मजसी ॥ काय सखे तो वदला तुजशीं ॥ कथिन उद्यां हें वृत्त तुम्हांसी ॥ न पुसा आज मला ॥ ३ ॥ पुत्र सून आलिं न अजुनी ॥ रुदन करिती वृद्धें दोन्हीं ॥ देखियली तंव पतिसह नयनीं ॥ सति सावित्रीला ॥ ४ ॥

( चाल-दत्त पदांबुजीं नमा० )

**कीर्ति जिची वानिली ॥ त्रिभुवनीं ॥ अश्वपतीची कन्या धन्या पतिव्रता माउली ॥ ध्रु० ॥ दिव्य दृष्टि पावला ॥ भूप तो ॥ प्रधान बोले राज्य कराया अरि तव निर्दाळिला ॥ न कळे हरिची लिला ॥ म्हणतसे ॥ सुखासनीं सावित्री बसवुनि निज नगरीं पातला ॥ शत सुत सावित्रिला ॥ जाहले ॥ अश्वपती नृप शत सुत पावे यमरायें वर दिला ॥ चाल-कथा अशी चांगली ॥ मुनिनें सांगीतली ॥ धर्म नृपें ऐकिली ॥ कवन कराया न ये परंतु यथामती वर्णिली ॥ १ ॥**

[ ४३. पतिव्रता सावित्रीचें चरित्र आबालवृद्धांच्या परिचयाचें आहे. प्रत्येक आर्य स्त्री ज्येष्ठी पूर्णिमेस एक किंवा तीन दिवस उपोषित राहून पतिनिष्ठेचा आदर्श अशा या साध्वीच्या चरित्राचें पठण किंवा श्रवण करते व यामुळें तिचा संसार सुखावह होण्यास मदत होते. ही कथा वन पर्वांत आहे. अश्वपति नांवाचा एक पराक्रमी राजा मद्र देशावर राज्य करीत होता. त्यास संतति नव्हती. पुढें देवीच्या प्रसादानें त्यास एक कन्या झाली. तिचें नांव सावित्री. ती उपवर झाली तरी अनुरूप वर न मिळाल्यामुळें राजाला काळजी पडली. तेव्हां त्यानें वृद्धमंत्री बरोबर देऊन सावित्रीला पतीची निवड करण्यास दूरदेशीं पाठविलें त्याप्रमाणें तिनें गुणसंपन्न अशा सत्यवान् नांवाच्या राजपुत्राची निवड केली यांत दोष एवढाच कीं त्याचा पिता वृद्ध द्युमत्सेन हा राज्यभ्रष्ट व दृष्टिहीन असा होता. तिनें आपली निवड पित्यास कळविली तेव्हां नारद ऋषि जवळ बसले होते त्यांनां ही गोष्ट कळल्यावर खुद्द सत्यवान् अल्पायुषी असून बरोबर एक वर्षानें त्यास मृत्यु येणार असल्याचें त्यांनीं भविष्य कथन केलें. व उभयतांनीं सावित्रीस दुसऱ्या पतीची निवड करण्यास सांगितलें. परंतु तिचा एकदां झालेला विचार फिरला नाहीं तेव्हां द्युमत्सेन बायको व मुलगा यांसह ज्या वनांत रहात होता तेथें अश्वपति गेला व त्यानें सावित्रीचा सत्यवानाबरोबर विवाह करून दिला. पुढें सावित्री सासूसासऱ्यांची सेवा करून आनंदानें राहूं लागली. पुढें वर्षानें त्याचा मृत्युकाल आला व प्रत्यक्ष यम त्याचे प्राण नेण्यास आला असतां सावित्रीनें आपल्या पतिनिष्ठेच्या जोरावर व वाक् चातुर्याच्या प्रभावानें यमास संतुष्ट केलें व त्याजपासून इच्छित वर मिळविले त्यामुळें सत्यवानास आयुष्यप्राप्ति, पित्यास व स्वतःस पुत्रलाभ, श्वशुरास दृष्टिलाभ राज्यप्राप्ति इ. अनेक गोष्टी घडल्या. हा सर्व कथाभाग निरनिराळ्या चालींच्या पदांनीं ग्रंथकर्त्रीनें मनोरम रीतीनें वर्णन केला आहे. ]

४२३९ ९१

## ४४ दुर्वास भिक्षा ( स्थाली पाक )

( चाल–श्रीहरी दीनउद्धरी० )

वनवासी पांडुचे बाळ साह्य गोपाळ असे ज्यांसी ॥ उडी घाली संकटासी ॥ ध्रु० ॥ दुर्वासा दुर्योधनें बहुत प्रार्थुनी म्हणे जावें ॥ पांडवां छळुनि यावें ॥ मध्यान्हीं आला मुनी द्वैत काननीं ऋषी संगें ॥ भोजना त्वरित मागे ॥ नमुनियां ऋषीचे पाय म्हणति हे होय धन्य रजनी ॥ देखिले चरण नयनीं ॥ चाल-तंव धर्म म्हणे गे सती अहो सती ॥ कशि काय करावी गती अहो गती ॥ घातली स्थाली पालथी पालथी ॥ ती म्हणे साह्य भगवान कराया स्नान वदा त्यांसीं ॥ वाढीन भोजनासीं ॥ १ ॥ स्नानासि ऋषि पाठवी मनीं आठवी कृष्णनाथा ॥ तुजवीण नसे त्राता ॥ हे मत्स्य कूर्म वाराह येइ नरसिंह वामना रे ॥ ये त्वरें परशुधारे ॥ ये कौसल्या-बाळका भक्तपाळका धांव सदया ॥ माझिया बंधुराया ॥ चाल-परिसुनी विनति यापरी यापरी ॥ लगबगां धांवला हरी अहो हरी ॥ गरुड.तो राहिला दुरी अहो दुरी ॥ जगजेठी देखुनी दिठी घातली मिठी चरणासी ॥ आनंद द्रौपदीसी ॥ २ ॥ कां मला बाहिलें सांग पुसे श्रीरंग द्रौपदीसी ॥ ऋषि आले भोजनासी ॥ गृहिं अन्न नसे रे स्पष्ट मुनी कोपिष्ट देति शापा ॥ बाहिलें तुजसी बापा॥ तव वचन कर्णि ऐकुनी ताट लोटुनी क्षुधित पोटीं ॥ धांवलों तुझ्यासाठीं ॥ चाल–श्रीकृष्ण म्हणे द्रौपदी द्रौपदी ॥ मज भोजन घाली आधीं अहो आधीं ॥ हें काय करुणानिधी अहो निधी ॥ देवास दाखवित स्थालि करित वनमाळि भाव कैसी ॥ निर्मिलें शाक पत्रासी ॥ ३ ॥ खावोनि भाजिचें पान कृष्ण भगवान् तृप्त झाला ॥ अघटीत दावि लीला ॥ तेधवां जान्हवी तिरीं करी श्रीहरी भाव कैसी ॥ निर्मिलें पांडवांसी ॥ बैसोनि विप्र पंगती द्रौपदी सती विपुल हस्तें ॥ वाढिते समस्तांतें ॥ चाल–धर्मान्न गोड हें अती अहो अती ॥ उदरांत सांठवूं किती अहो किती ॥ म्हणुनियां जेविती प्रिती अहो प्रिती ॥ सिंधूसम उदरें जरी असति तरि बरीं आम्हांपासी ॥ यावया भोज-

नासी ॥ ४ ॥ ऋषिलागीं उशिर जाहला धर्म बोलला माद्रितनया ॥ पाचारिं ऋषीवर्या ॥ सहदेव म्हणे मुनिवरा करावी त्वरा चला सदनीं ॥ चालले अन्न निवुनी ॥ दुर्वास बोलिला मुखें नांद तूं सुखें धर्मभूपा ॥ मम वचन सांग बापा ॥ चाल-भीमाचें भय अंतरीं अंतरीं ॥ ऋषि पळोनि गेले दुरी अहो दुरी ॥ भक्तांसि रक्षितो हरी अहो हरी ॥ अघटीत चरित रसभरित कवन मी करित कौतुकेंसी जरि नाहीं मती मजसी ॥ ५ ॥

[ ४४. पांडव वनवासांत असतांना दुर्योधनानें दुर्वास ऋषीस पांडवांचा छळ करण्याकरितां त्यांचेकडे पाठविलें. त्याप्रमाणें दुर्वासानें मध्यरात्रीस आपल्या अगणित शिष्यांसह धर्माजवळ जाऊन भोजन मागितलें. पांडवांस वनांत अन्नाचा पुरवठा व्हावा म्हणून सूर्याकडून एक स्थाली मिळाली होती. तिजपासून त्यांस वाटेल तितकें अन्न मिळे. परंतु सूर्य अस्तास गेल्यावर तींतून कांहीं उत्पन्न होत नसे. तेव्हां दुर्वासानें भोजन मागण्याबरोबर पांडवांची गाळण उडाली. परंतु द्रौपदीनें कृष्णाचा धांवा केला; तेव्हां कृष्णानें येऊन आपल्या मायेनें संकट निवारण केलें हा कथाभाग या गाण्यांत आहे.]

## ४५ दुर्वास भिक्षा

( चाल-भूपती खरें तें वैभव सुख० )

श्रीहरिनें कथिलें चरित्र निज पुत्राला ॥ मी वर्णितसें कीं वंदुनि हरि पदकमला ॥ ध्रु० ॥ भूदेव निरंतर वंद्य आपणां सकळां ॥ तच्चरण-चिन्ह मी वागवितों हृत्कमळां ॥ द्विजचरण सेवनीं आवड मज गोपाळा ॥ इतिहास सांगतों येच विषयिं तुज बाळा ॥ चाल-अत्रिचा तनय दुर्वासा तापसी ॥ द्वारके सहज तो आला तामसी ॥ सकळही जाणती त्यातें मानसीं ॥ या सदनीं ऐसें कुणि नच म्हणती त्याला ॥ गृहिं आणियलें मी प्रार्थुनियां त्या मुनिला ॥ १ ॥ किति सांगूं वत्सा कोप मुनीचा तुजसी ॥ तत्सेवा करितां कंप सुटे मत्तनुसी ॥ मुनि भयें येइना निद्रा तव मातेसी ॥ न कळे च काय कधीं मागे हा तपराशी ॥ चाल-कधिं म्हणे स्नान मज घाला झडकरी ॥ कधिं जाळितसे मृदु शय्या निज करीं ॥ कधिं म्हणे व्हावि

मज आतां नोवरी ॥ कधिं सुगंध तैलें लावुनि घे आंगाला ॥ कधिं नग्न दिगंबर विभुति चर्चुनी बसला ॥ १ ॥ शत सहस्र खंड्या अन्न खाय एक दिवशीं ॥ कधिं षड्रस अन्नें भक्षिनाच परि नाशी ॥ गर्जोनि एकदां म्हणे ऊठ हृषिकेशी ॥ मज पायस द्यावें विलंब न रुचे मजसी ॥ चाल-करविली त्वरित मग क्षिप्रा यावरी ॥ भक्षिली तयानें कांहीं निज करीं ॥ मग म्हणे ऐक रे आतां श्रीहरी ॥ उरलें हें पायस सारवोनि निज तनुला ॥ व्हा सिद्ध उभयतां मम रथ ओढायाला ॥ ३ ॥ रथ ओढितसों मग मी आणी तव माता ॥ तैं विस्मित झाले नगरवासि जन पाहतां ॥ रथ ओढुनि श्रमली सुकुमारी नृपदुहिता ॥ हळु हळू चालतां न ये मुनीच्या चित्ता ॥ चाल-सुकुमार जाहलां कां रे यापरी ॥ बोलोनि कोरडे हाणी किति तरी ॥ धांवतां पडे शतदां ती सुंदरी ॥ हें अवलोकुनि मुनि द्रवुनि म्हणे मग मजला ॥ नच तुजसम कोणी मम सेवेला तगला ॥ ४ ॥ धन धान्य संपदा पुत्र पौत्र आणि जाया ॥ तुज अखिल सुखें ही असोत श्रीयदुराया ॥ पायसें चर्चिलीं अभंग होइल काया ॥ वदुनियां यापरी मुनि गेला निज ठायां ॥ चाल-भोगिलीं सुखें विविधें मी अजवरी ॥ तो आशीर्वाद मुनीचा यापरी ॥ द्विज कृपा असे कीं वत्सा मम शिरीं ॥ विप्राशिर्वादें वंद्य असें मी सकलां ॥ त्वां मजसम व्हावें नम्र द्विज-पदकमला ॥ ५ ॥

[ ४५ श्रीकृष्णांनीं आपण ब्राह्मणांस किती मान देतों हें पुत्राचे अंतःकरणावर ठसविण्याकरितां आपला पूर्वीचा एक अनुभव त्याला कथन केला. दुर्वासानें छळ केला असतां आपण व रुक्मिणी अशा उभयतांनीं तो सर्व छळ निमूटपणें सहन केला. त्यामुळें ऋषि प्रसन्न होऊन त्यांनीं वर दिले वगैरे मनोरम शब्दचित्र या गाण्यांत आहे.]

---

## ४६ श्रीकृष्णजन्म

( चाल-तूं किती घालिसी संसृतिचा पिंगा० )

तुम्हिं श्रवण करा श्रीकृष्ण जन्म चरितासी ॥ भूभार हराया अवतरले हृषिकेशी ॥ ध्रु० ॥ महिवरी जेधवां दैत्य मातले फार ॥ गो विप्रगांजिले धरा न साहे भार ॥ तैं वृत्त कळविलें ब्रह्मयासि साचार ॥

विधि म्हणे पाहुंया क्षीर सिंधुचें तीर ॥ चाल–मग सकल सुरांसह तेथें जाउनी ॥ स्तुति स्तोत्रें बहुत प्रकारें गाउनी ॥ तो शेषशयन परमात्मा विनवुनी ॥ जलशायि तुष्टतां वृत्त कळविलें त्यासी ॥ हरि म्हणे भिउं नका घेइन अवतारासी ॥ तुम्हि श्रवण० ॥ १ ॥ नृप उग्रसेन सुत कंस नाम हें ज्याला ॥ तद्भगिनि देवकी दिधली वसुदेवाला ॥ त्या विवाह समयीं हर्ष बहुत कंसाला ॥ बहु सुवर्ण गज रथ दिधले भगिनी–पतिला ॥ चाल–वधुवरें रथीं बैसोनी मिर-विती ॥ जाहला कंस प्रेमानें सारथी ॥ नभ–वाणि सकलही तेव्हां ऐकती ॥ देवकी उदरिंचा गर्भ आठवा तुजसी ॥ मारील निश्चयें कंसा कां भुललासी ॥ तुम्हि श्रवण० ॥ २ ॥ नभ–वाणि ऐकुनी कंस कोपला चित्तीं ॥ निज भगिनि वधाया खड्ग घेतलें हातीं ॥ वसुदेव म्हणे तुज इजपासुनि न च भीति ॥ देईन तुला बा पुत्र हिला जे होती ॥ चाल–रक्षिली देवकी तेव्हां यापरी ॥ वसुदेव निज गृहा गेला सत्वरीं ॥ प्रसवली पुत्र पाहिल्यानें सुंदरी ॥ वसुदेवें दिधलें बाळक तें कंसासी ॥ तो म्हणे नेइं हा देइ आठवा मजसी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ३ ॥ मानिं नवल करितची शौरि जाय निज सदनीं ॥ तंव नारद आला वर्णित हरि गुण वदनीं ॥ कंसास म्हणे तुज नच कळलें कां अजुनी ॥ सुर अवतरले हे यादव रूपें धरुनी ॥ चाल–ऐकोनि मुनीची वाणी यापरी ॥ वसुदेव–पुत्र वधियेला निजकरीं ॥ यादवां छळितसे तेव्हां बहुपरी ॥ मग बसे राज्यपदिं कारागृह पितयासी ॥ तद्भयें त्यागिती यादव निज सदनांसी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ४ ॥ वसु-देव देवकी घालुनि कारागारीं ॥ दृढ बंधन करुनी रक्षण ठेवित द्वारीं ॥ उपजलीं बाळकें कंस येउनी मारी ॥ वधियलीं सहा मग शेष राहिला उदरीं ॥ चाल–मायेस करितसे आज्ञा श्रीपती ॥ गोकुळीं शौरिच्या नारी राहती ॥ त्यामाजि रोहिणी नामें जी सती तज्जठरिं घालिं गे देवकिच्या गर्भासी ॥ मग यशोदेचिया त्वां यावें उदरासी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ५ ॥ हरि–मायेनें तंव गर्भ काढुनी नेला ॥ म्हणतसे कंस मम धाकें गर्भ गळाला ॥ देवकी जठरिं तैं परमात्मा संचरला ॥ तें तेज देखुनी कंस मानसीं भ्याला ॥ चाल–निदध्यास

लागला कंसा अंतरीं ॥ आठवा दिसतसे त्यासी स्थिर चरीं ॥ आठवा दिसे कीं स्वप्नीं श्रीहरी ॥ सिंहासनिं वसतां आठवाच नयनांसी ॥ मानिं म्हणे अरीनें पाठि पुरविली कैसी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ६ ॥ सुरगणां सहित विधि कारागारीं आला ॥ गर्भस्तुति करुनी स्वस्थानासी गेला ॥ मग श्रावणमासीं कृष्णपक्ष अष्टमिला ॥ निशि मध्यरात्रिं हा वेद–वंद्य अवतरला ॥ चाल–सांवळी चतुर्भुज मूर्ति दावुनी ॥ प्राग्जन्म स्मृति दोघांसी देउनी ॥ हर्षलीं उभयतां त्यातें पाहुनी ॥ मग शामल कोमल सुंदर बाळ रुपासी ॥ धरियलें तेधवां सुर वर्षति सुमनांसी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ७ ॥ देवकी म्हणे जों नच कळलें कंसाला ॥ तोंवरी कुठें तरि लपवा कमलाक्षाला ॥ हरि–आज्ञेनें तो ठेवुनि नंद–गृहाला ॥ वसुदेव परतला घेउनि हरि–मायेला ॥ चाल–हरिवदन देखुनि नंदें सत्वरी ॥ विप्रांसि दिलीं गोदानें किति तरी ॥ उत्साह करुनियां तेव्हां बहु परी ॥ श्रीकृष्ण असें मग नाम ठेविलें त्यासी ॥ किति वर्णु तरी मी श्रीहरिच्या चरितासी ॥ तुम्हि श्रवण० ॥ ८ ॥

[ ४६ यांत विष्णूचा आठवा अवतार जो श्रीकृष्ण त्याचा जन्म वर्णिला आहे. व पुढील १० गाणीं भागवतांतील निरनिराळ्या आख्यानांवर रचिलेलीं आहेत. ]

---

## ४७ रुक्मिणीचे विचार

( चाल–कालंगडा त्रिताल० )

कधिं येइल सखये देव हरी ॥ शिशुपाळाला मी न वरी ॥ ध्रु० ॥ राजीवनेत्रा पत्र लिहोनी ॥ पाठविलें म्यां विप्रकरीं ॥ १ ॥ पत्र पाहावें त्वरितचि यावें ॥ विनती ऐशी केलि परी ॥ २ ॥ शिशु–पाळाला देइल मजला ॥ बंधु नव्हे हा खचित अरी ॥ ३ ॥ कीर्ति तयाची ऐकिलि साची ॥ भक्त–मनोरथ पूर्ण करी ॥ ४ ॥ सुदेव बोले यदुपति आले ॥ भीमक–बाळे धीर धरीं ॥ ५ ॥ वरितो तुजसी तो हृषिकेशी ॥ दीन जनांचें दुःख हरी ॥ ६ ॥

[ ४७. विदर्भापति भीमक राजाची कन्या रुक्मिणी हिला तिच्या भावानें चेदिपति शिशुपालास देण्याचें ठरविलें. परंतु तिनें मनानें श्रीकृष्णास वरिलें होतें. लग्नवेळा जवळ जवळ येत चालली तेव्हां सुदेव नांवाच्या ब्राह्मणाबरोबर तिनें श्रीकृष्णास पत्र पाठविलें त्यांत आपणास घेऊन जाण्याबद्दल प्रार्थना केली होती. पत्र पाठविल्यानंतर श्रीकृष्ण येईपर्यंत तिच्या मनांत जे विचार आले त्यांचें शब्दचित्र या गाण्यांत आहे. ]

---

## ४८ ध्रुवस्तुति

( चाल–उद्धवा शांतवन करजा० )

ध्रुव करी ईश स्तवनाला ॥ शुक सांगतसे राजाला ॥ ध्रु० ॥ मम हृदयीं वास करून ॥ ओळखिलें मम अज्ञान ॥ जो सर्वसाक्षी भगवान् ॥ त्यासी म्यां केलें नमन ॥ वाटल करावें स्तवन ॥ धड एक येइना वचन ॥ चाल–जाणोनि सुदर्शन-पाणी ॥ मग अद्भुत दिधली वाणी ॥ जो वंद्यचि शास्त्रपुराणीं ॥ नमितों मी तत्पदकमला ॥ ध्रुव० ॥ १ ॥ तूं उत्पादक जगताचा ॥ प्राणिमात्र स्थिरचर साचा हा पंचमहाभूतांचा ॥ खेळ सर्व तव मायेचा ॥ नग भिन्न गमे हेमाचा ॥ तैसा परि भास जगाचा ॥ चाल–परिपूर्ण तूंचि भरलासी ॥ ये प्रलयकाल सृष्टीसी ॥ निजउदरीं सर्व सांठविशी ॥ कथिशी तद्ज्ञान विधीला ॥ ध्रुव०॥२ ॥ भवसिंधु तराया खचित ॥ तव मानवा उचित ॥ विषयेच्छा धरुनि मनांत ॥ मज समजे तुज भजतात ॥ नच कळुनी ते फसतात ॥ हे विषय नेति नरकांत ॥ चाल–तव कथा साधु वदनींची ॥ ऐकाया मिळतां साची ॥ मग त्याहुनि स्वर्ग सुखाची ॥ नच महती किमपिही मजला ॥ ध्रुव० ॥ ३ ॥ तव पुण्यकथा वर्णीती ॥ रात्रंदिन तुजला ध्याती ॥ जे असे साधु जन जगतीं ॥ मज जडो तयांची प्रीती ॥ गातील तुझी ते कीर्ती ॥ तें श्रवण करिन मी प्रीतीं ॥ चाल–स्थिर ज्यांचें तव पदिं चित्त ॥ नाठवे तया गणगोत ॥ गृह दारा सुत आणि वित्त ॥ निज तनुला तो विस्मरला ॥ ॥ ध्रुव० ॥ ४ ॥ स्वरुपाचा अंत अनंता ॥ ब्रह्मयासि न कळे पुरता ॥

खुंटली शब्दगति पहातां ॥ जिथें वेद पावला श्रमता ॥ तुज काय वर्णुं तरि आतां ॥ मी अज्ञ बाळ भगवंता ॥ चाल-हे शेषशयन भगवंता ॥ विश्वात्मक श्रीपरमेशा ॥ भक्तांचे भवभयनाशा ॥ मी शरण अनन्यचि तुजला ॥ ध्रुव० ॥ ५ ॥

[ ४८. सूर्य वंशांत उत्तानपाद नांवाचा एक राजा होऊन गेला. त्यास सुनीति व सुरुचि या नांवाच्या दोन स्त्रिया असून त्यां पासून त्यास अनुक्रमें ध्रुव व उत्तम नांवाचे पुत्र झाले. राजाची प्रीति धाकट्या स्त्रीवर-सुरुचीवर होती. ध्रुव लहान असतां एके वेळीं सापत्न मातेनें त्याचा मर्मभेदक भाषणांनीं अपमान केला. तेव्हां ती कागाळी आईकडे नेली आईनें त्यास परमेश्वरास शरण जाण्यास सांगितले. तेव्हां त्यानें परमेश्वर प्राप्ती करितां उग्रतपश्चर्या केली. तिच्यामुळें संतुष्ट होऊन विष्णूनें त्यास दर्शन दिलें व इच्छित वर देऊन शेवटी त्यास अढळ पदीं स्थापन केलें. श्रीविष्णूचें दर्शन झालें तेव्हां ध्रुवानें त्याची स्तुति केली ती या गाण्यांत आहे. ध्रुव चरित्र भागवतांत चतुर्थस्कंधांत आलें आहें. ]

## ४९ गजेंद्रमोक्ष



( चाल-उद्धवा शांतवन करजा० )

श्रीहरिनें गज उद्धारिला ॥ तें सुरस चरित परिसावें ॥ ध्रु० ॥

इंद्रद्युम्न नामें होता ॥ कुणि द्रविड देशिंचा राजा ॥ मुनि-शापें गज-

योनीला ॥ पावला किं तो महाराजा ॥ आनंदें विचरे रानीं ॥ परिवारासह गजराजा ॥ चाल-एकदां वर्तलें काई ॥ बहु तृषार्त गज तो होई ॥ तंव रम्य सरोवर पाही ॥ जलपान कराया धांवे ॥ ॥ श्रीहरिनें० ॥ १ ॥ जल प्राशुनियां आनंदें ॥ परिवारा पाजित पाणी ॥ त्या जळीं नक्र बहु मोठा ॥ झोंबला तयाचे चरणीं ॥ नच सोडी बहु यत्नांहीं ॥ गज दुःखित अंतःकरणीं ॥ चाल-आप्त इष्ट ओढुनि थकले ॥ आपुल्या स्थला प्रति गेले ॥ गजराज मनामाधिं बोले ॥ कवणासी शरण रिघावें ॥ श्रीहरिनें० ॥ २ ॥ नच ठावा ईश्वर कैसा ॥ कैशापरि त्यासि न्हावें ॥ मतिहीना हेंहि कळेना ॥ कैशा परि तद्‌गुण गावे ॥ सर्वांतरिं वास जयाचा ॥ त्यासी मम दुःख कळाव ॥ चाल-जो सर्व जगाचा नाथ ॥ नच ज्याला आदी अंत ॥ वर्णिती जयाला संत ॥ त्यानें मम दुःख हरावें ॥ श्रीहरिनें० ॥ ॥ ३ ॥ परिसोनि गजाची वाणी ॥ गरुडावरि बैसुनि आला ॥ सालंकृत सायुध ऐशा ॥ मूर्तिसी देखुनि धाला ॥ भावार्थें कमलाकांता ॥ कमलासि अर्पिता झाला ॥ चाल-चक्रानें नक्रचि वधिला ॥ दिव्य देह करिनें धरिला ॥ साष्टांगें नमुनी हरिला ॥ सायुज्य-पदाप्रति पावे ॥ श्रीहरिनें० ॥ ४ ॥

[ ४९. हें आख्यान अष्टमस्कंधांत वर्णिलें आहे. द्रविड देशांत इंद्रद्युम्न नांवाचा एक राजा होता. त्यास विप्रशापानें गजयोनि प्राप्त झाली. तो एके दिवशीं एका सरोवरांत परिवारासह क्रीडा करीत असतां त्याचा पाय नक्रानें धरला. त्यामुळें त्यास वर येतां येईना. त्यानें स्वतः व त्याच्या परिवारानें पुष्कळ खटपट केली. परंतु नक्रापुढें त्याचें चालेना. पुढें गजेंद्रानें श्रीविष्णूचा धांवा केला तेव्हां श्रीविष्णु गरुडावर बसून तेथें आले व आपल्या सुदर्शनचक्रानें नक्रास ठार मारून गजेंद्रास सोडविलें. ]

---

## ५० अक्रूर

( चाल-मुद्रिकेची० )

गोपिका मिळुन सकळिका मारिती हाका अक्रुराला ॥ नेऊं नको कृष्णजीला ॥ ध्रु० ॥ यदुवीरा श्यामसुंदरा नंदकुमरा मंदहासा ॥

नेऊं नको पीतवासा ॥ त्रैलोक्यपाळ घननीळ यशोदाबाळ पूतनारी ॥ नेऊं नको गिरिधारी ॥ श्रीकृष्ण आमुचा प्राण नेलिया जाण गति कैसी ॥ नेऊं नको हृषीकेशी ॥ चाल-बाई कोठुन आला अरी ॥ अहो अरी ॥ रथ थांबविला क्षणभरी ॥ क्षणभरी ॥ घेऊन चालला हरी ॥ अहो हरी ॥ क्षण एक पाहुं श्रीमुख मागतें भीक दीन अबला ॥ नेऊं नको कृष्णजीला ॥ १ ॥ यशोदामती म्हणे श्रीपती त्यजिशि मजप्रती कमलनयना ॥ कवणासी पाजूं पान्हा ॥ सच्चिदानंद गोविंद तारिला नंद जळीं बुडतां ॥ आज कां त्यजिशि ममता ॥ वनमाळी तुला एक वेळीं बांधीं उखळीं जगत्पाळा ॥ म्हणुनि कां त्यजिशि मजला ॥ चाल-त्वां दावानल भक्षिला ॥ भक्षिला ॥ गोवर्धन तो उचलिला ॥ उचलिला ॥ कालिया फणी मर्दिला ॥ मर्दिला ॥ आजवरी तुवां किततरी मारिले अरी स्मरत मजला ॥ नेऊं नको कृष्णजीला ॥ २ ॥ अक्रुरा द्रव न ये जरा अरे निष्ठुरा परिस विनती ॥ नेऊं नको कृष्णमूर्ती ॥ बाई आतां रडुं नये वृथा अडवुं या रथा सकळ मिळुनी ॥ परतवुं मोक्षदानी ॥ गलबला करुं नका चला त्यजुनि गोकुळा कृष्ण गेला ॥ अक्रूर क्रूर मेला ॥ चाल-यापरी चरित ऐकुनी ॥ ऐकुनी ॥ नृप सद्गद झाला मनीं ॥ अहोमनीं ॥ गहिंवरले श्रीशुकमुनी ॥ अहो मुनी ॥ निशिदिनीं गोप-कामिनी चिंतिती मनीं कृष्णजीला ॥ नेऊं नको कृष्णजीला ॥ ३ ॥

[ ५०-५१. यांतील भाग दशमांत ३६ व्या अध्यायांत आला आहे. देवकीचे विवाहाचे वेळीं झालेल्या आकाशवाणीमुळें कंसास स्वतःचे जीविताबद्दल भीति वाटत होती. त्यामुळें कृष्णास मारण्याकरितां त्यानें नाना प्रकारचे प्रयत्न केले. परंतु ते सर्व फुकट गेले तेव्हां त्यानें बलराम व कृष्ण ह्यांस कांहीं तरी निमित्तानें मथुरेस बोलावून त्यांचा घात करण्याचा बेत केला. रामकृष्णांस बोलावण्याची कामगिरी अक्रूरास सांगितली. त्याप्रमाणें अक्रूर गोकुळांत येऊन रामकृष्णांस घेऊन गेला. कृष्ण गोकुळांतून जातेवेळीं व्रजजनांची-विशेषतःगोपींची झालेली मनःस्थिति या दोन गाण्यांत आहे. ]

## ५१ अक्रूर

( चाल–नको नको त्रिसंगनाम० )

सर्व गोपि अक्रुरासि मिळुनि प्रार्थिती ॥ नेउं नको कृष्णजीस हेंच मागती ॥ निर्दय हें हृदय तुझें जाण अक्रुरा ॥ अक्रुर हें नाम असुनि द्रव न ये जरा ॥ गोपिकांसि त्रधुनियां तुं नेइं यदुवीरा ॥ १ ॥ व्रज–ललना अक्रुरास बहुत निंदिती ॥ अपशब्दहि वदति बहुत नाहिं त्या मिती ॥ गहिंवरला अक्रुर तैं कोप नच जरा ॥ २ ॥ सद्गदीत माय वदे ऐक श्रीहरी ॥ साहुं कशी विरह तुझा सांग मुरअरी ॥ चुंबन मज देइं एक भुवनसुंदरा ॥ ३ ॥ चाराया धेनु वत्स तुजासि लाविलें ॥ हृषीकेशि उखळासी तुजसि बांधलें ॥ रुसलासी म्हणुनि काय श्यामसुंदरा ॥ ४ ॥ कोपानीं इंद्र जधीं वृष्टि बहु करी ॥ वांचविलें व्रजजनांसि उचलुनि गिरी ॥ जाहलासी निष्ठुर कां आज श्रीधरा ॥ ५ ॥ अक्रुरजी कृष्ण पहा जेवि मजपुढें ॥ दुग्धाची साय बहू हरिस आवडे ॥ कधिं येशिल परतुनियां मुरलीधरा ॥ ६ ॥ गोपस्त्रिया शोक बहुत करिति या रिती ॥ मथुरेसी त्वरितचि तो जाय श्रीपती ॥ वर्णियलें अल्पमती तुजसी श्रीवरा ॥ ७ ॥

---

## ५२ रुक्मिणीस्वयंवर

( चाल०भजति नर अनन्य जे मातें० )

आइके द्रुपदसुते आतां ॥ श्रीयदुरायें वरिलें मजसी कथितें तच्चरिता ॥ ध्रु० ॥ उपवर देखुनियां मजसी ॥ द्यावी कवणा ऐसी चिंता पडली जनकासी ॥ पित्याच्या सन्निध एक दिवसीं ॥ बसलें असतां द्विजवर आला ऐशा समयासी ॥ सुकीर्ति नाम असे ज्यासी ॥ बहुत परीनें वर्णुनि त्यानें श्रीहरि-चरितासी ॥ लाविला वेधचि मम चित्ता ॥ श्रीयदुरायें० ॥ १ ॥ परिसुनि श्रीहरिची लीला ॥ तल्लीन झालें भानचि नुरलें पडलें धरणीला ॥ पिता मम

विस्मित मनीं झाला ॥ म्हणे उठो हे दुहिता माझी देईन गोपाळा ॥ जाहलें सावध ते वेळां ॥ भूपाळाचा विचार बरवा बहुताचि मानवला ॥ जाहला हर्ष बहुत चित्ता ॥ श्रीयदुरायें० ॥ २ ॥ रुक्मी नामें मम भ्राता ॥ विचार हा नावडे तयासी कृष्णद्वेषी पुरता ॥ मोडुनी पितयाच्या बेता ॥ शिशुपाळासी लग्न योजिलें निंदुनि यदुनाथा ॥ जाहलें दुःख जरी ताता ॥ सुतापुढें न चलेच म्हणुनी मौन होय वरिता ॥ पत्र मी लिहिलें भगवंता ॥ श्रीयदुरायें० ॥ ३ ॥ लिहुनी प्रथमचि नमनाला ॥ माझ्या मनिंचा हेतु सकलहि सप्त-श्लोकिं कथिला ॥ परिसुनि तुझिया चरिताला ॥ भुवनसुंदरा श्रीयदुवीरा वरिलें मी तुजला ॥ बंधु मम देतो शिशुपाळा ॥ तूं नच येतां श्रीभगवंता अंतचि मम झाला ॥ शरण मी आलें तुज आतां ॥ श्रीयदुरायें ॥ ४ ॥ लग्न हें परवांचे दिवशीं ॥ अंबालयिं तूं गुप्त येउनी हरुनि नेइं मजशी ॥ मनानें वरिलें मी तुजसी ॥ तुझीच कांता दैत्यें हरितां दूषण कवणासी ॥ श्रीहरी जरि तूं नच येसी ॥ शतावधी मी जन्म घेउनी होइन तव दासी ॥ आणिक काय लिहूं आतां ॥ श्रीयदुरायें० ॥ ५ ॥ पत्रिका घेउनि द्विज जाई ॥ शिशु-पाळाचें वऱ्हाड आलें लग्नाची घाई ॥ लागली हळद मला बाई ॥ कांहीं सुचेना कांहीं रुचेना नच ये जलशायी ॥ व्याकुळ मम मानस होई ॥ सुदैव माझें सुदेव आला धीर मना देई ॥ वदे तो येई जगत्राता ॥ श्रीयदुरायें० ॥ ६ ॥ अंबिका पूजाया गेलें ॥ रक्षणार्थ मम सवें कितितरी सैन्य सिद्ध झालें ॥ सुमनें अंबेला पुजिलें ॥ नमन करोनी श्रीपति पति दे ऐसें विनवीलें ॥ यदुपतिस सान्निध देखियलें ॥ घननीळासी माळ घालितां मम मानस धालें ॥ जाहल्यें श्रीहरिची कांता ॥ श्रीयदुरायें० ॥ ७ ॥ चकितचि पाहती सकल वीर ॥ श्रीकृष्णानें नवरी नेली हांक झाली थोर ॥ जाहलें युद्धचि घनघोर ॥ सैन्य फार त्यामाजि जाहले विजयी यदुवीर ॥ हर्षला भीमक नृपवर ॥ यथाविधीनें लग्नसोहळा वर्णु कोठवर ॥ सुदिन तो वर्णु किती आतां ॥ श्रीयदुरायें० ॥ ८ ॥

[ ५२. कृष्णपत्न्या व द्रौपदी ह्या एके ठिकाणीं जमल्या असतां द्रौपदीनें प्रत्येकीस तिची विवाहकथा विचारली. तेव्हां सर्वांनीं आपआपल्या लग्नाच्या हकीकती सांगितल्या. पहिल्यानें रुक्मिणीनें आपली विवाहकथा सांगितली तो भाग या गाण्यांत आहे. ]

---

## ५३ कात्यायनीव्रत

( चाल—सख्यांनो घ्या हरिच्या नामा० )

हुडहुडि भरली बघ सकळां ॥ लुगडिं दे गडिया घननीळा॥ ध्रु० ॥ हरी रे आम्हीं तव दासी ॥ कां रे व्यर्थ अम्हां छळिशी ॥ दहिं दुध नवनित जें म्हणशी ॥ सांवळ्या देउं कीं रे तुजशी ॥ कशाला लुगडीं तुज बाळा ॥ १ ॥ दुसरी बोले सकुमारी ॥ दे मम पातळ जरतारी ॥ कुसुंबी साडि म्हणे तिसरी ॥ आणिक एक मागे शेलारी ॥ पांचवी मागे चंद्रकळा ॥ २ ॥ आणिक एक वदली सकळांसी ॥ कशाला आर्जवितां त्यासी ॥ जाउनि सांगुं यशोदेसी ॥ बांधिल बळकट उखळासी ॥ क्षणभरि मौज बघूं डोळां ॥ ३ ॥ विनोदें बोले व्रजललना ॥ सख्यांनो परिसा मम वचना ॥ शहाणा नंदाचा कान्हा ॥ देइल आमुचिया वसनां ॥ दिधला माझा सोनसळा ॥ ४ ॥ हांसुनि वदला घननीळ ॥ घडलें पाप तुम्हां सबळ ॥ यमुने बाहिर या सकळ ॥ रविला जोडुनि करकमळ ॥ दाखवा मजला नृत्यकळा ॥ ५ ॥ निघाल्या यमुनेंतुनि तरुणी ॥ लज्जा अर्पुनि हरिचरणीं ॥ नमिला सकळांही तरणी ॥ वसनें देइ चक्रपाणी ॥ कृष्णा नमिते पदकमला ॥ ६ ॥

[ ५३. यांतील प्रसंग कृष्णाच्या बाललीले पैकीं आहे. एकेवेळीं गोपकन्यका यमुनेंत जलक्रीडा करण्यास उतरल्या असतां त्यांची परीक्षा पाहावी म्हणून त्यांचीं वस्त्रें ( जीं कांठावर होतीं ) घेऊन कृष्ण जवळच एका कदंब वृक्षावर बसला. मग गोपी काकुळतीस येऊन शरण गेल्यावर त्यांस वस्त्रें परत दिलीं. ]

---

## ५४ उद्धव

( चाल-भजति नर अनन्य जे माते )

उद्धवा सांगा श्रीहरिला ॥ तव विरहानल दग्ध करितसे गोकुळिंच्या अबला ॥ ध्रु० ॥ कधितरी स्मरतो आम्हांसी ॥ लटिकें बोलूं नको उद्धवा कपटी हृषिकेशी ॥ जाहला वश त्या कुब्जेसी ॥ न स्मरो आम्हा परि स्मरतो कां नंद यशोदेशी ॥ तयाला प्रिय झाली दासी ॥ दैवगती आमुची उद्धवा बोल न कवणासी ॥ सुखी कीं श्रीहरि मथुरेला ॥ तव० ॥ १ ॥ नेणुनि शाश्वत स्वरुपाला ॥ व्यर्थचि रडतां म्हणतां अमुचा हरि मथुरे गेला ॥ गमनागमन नसे ज्याला ॥ निराकार निर्गुण नित्य जो सर्वांतरिं वसला ॥ कस्तुरी-मोहें मृग भ्रमला ॥ त्यापरि नेणुनि हृदयस्थातें व्यथ तुम्हीं श्रमलां ॥ त्यजावा शोक अतां पहिला ॥ तव० ॥ २ ॥ पूतना वधिली बाळपणीं ॥ क्षणक्षणां स्मरतसों उद्धवा श्रीहरिची करणी ॥ चोरिलें दहीं दुध तुप लोणी ॥ कधीं पाहुं उद्धवा पुनरपी मूर्ती ती चिमणी ॥ परिसुनी मुरली-रव श्रवणीं ॥ पतिपुत्रादिक विस्मरलों मग कैंची नग लेणीं ॥ आमुचें मन चोरुनि गेला ॥ तव० ॥ ३ ॥ हरिनें निरोप सांगितला ॥ तुमचा माझा वियोग कोठें कधींहि नच झ ला ॥ स्वप्नसम समजुनि विषयाला ॥ प्रियसखयांनों स्थीर मनानें हृदयों घ्या मजला ॥ सुलभ कीं मत्पद तुम्हांला ॥ योग याग जप तपादि करुनी इच्छित मुनि ज्याला ॥ सुखी व्हा न करा शोकाला ॥ ४ ॥

[ ५४ श्रीकृष्णांनी मथुरेस जाऊन कंसाचा वध केला व उग्रसेनास राज्यावर बसविलें. पुढें एक दिवस त्यांस गोकुळांतील मंडळीची आठवण होऊन त्यांची कुशल वार्ता विचारण्याकरितां व व्रजजनांचें शांतवन करण्याकरितां आपला प्रिय मित्र व एक प्रमुख यादव उद्धव ह्यास गोकुळास पाठविलें. गोकुळास गेल्यावर उद्धवाचा गोपी बरोबर झालेला संवाद या गाण्यांत वर्णन केला आहे. ]

# ५५ सुदामचरित्र

( चाल–तूं किती घालिसी संसृतिचा० )

श्रीहरिनें दिधली सुवर्णपुरि विप्राला ॥ हें चरित भागवतिं शुक कथिती नृपतीला ॥ ध्रु० ॥ द्विज सुदाम नामा निस्पृह आत्मज्ञानी ॥ दारिद्र्य मूर्तिमान् वसे तयाचे सदनीं ॥ तद्भार्या आर्या पतिव्रता मृदुवचनी ॥ पति भाग्यहीन परि सादर तत्पद–भजनीं ॥ चाल–निज पतिला बोले कांता एक दिनीं ॥ श्रीकृष्ण सखा तुमचा कीं म्हणवुनी ॥ ये समयिं तयाला यावें भेटुनी ॥ तो म्हणे प्रिये तव विचार मज मानवला ॥ परि रिक्त–हस्त नच जाइन हरि–सदनाला ॥ ॥ १ ॥ तंव सुदाम–कांता हिंडुनियां चहुंसदनीं ॥ पृथु मेळविले ते बहुत प्रयत्नें करुनी ॥ पतिपाशीं दिधले जीर्ण वस्त्रिं बांधोनी ॥ पृथु देखुनियां द्विज–हर्ष न मावे गगनीं ॥ चाल–द्वारके निघाला वेगें त्वरितची ॥ आनंदें हरि–स्मरणासी करितची ॥ शुभ शकुन जाहले मार्गीं बहुतची ॥ देखिली द्वारका हर्ष बहुत चित्ताला ॥ श्रीकृष्ण–मंदिरीं प्रवेशता मग झाला ॥ २ ॥ रुक्मिणी–वरानें विप्र देखिला दृष्टी ॥ लगबगा धांवला कनवाळु जगजेठी ॥ सद्गदीत झाला गळां घातली मिठी ॥ म्हणतसे बहु दिसां झालि बंधुची भेटी ॥ चाल–भू-देव पूजिला देवें–निजकरीं ॥ पद–तीर्थ वंदिलें प्रेमें निज शिरीं ॥ मग दिलीं वस्त्रभूषणें हीं बहुपरी ॥ प्रेमादर करुनी विप्रोत्तम जेवविला ॥ हरि–गृहिंचें भोजन नच ये वर्णायाला ॥ ३ ॥ हरि म्हणे सख्या रे आठवतें कां तुजसी ॥ क्रमियला काळ जो श्रीगुरुच्या सदनासी ॥ गुरु–कांता धाडी इंधनार्थ विपिनासी ॥ पर्जन्य वर्षला अकस्मात् ते दिवशीं ॥ चाल–गुरु आले प्रातःकाळीं काननीं ॥ श्रमलेति वत्स हो ऐसें बोलुनी ॥ उतरिला भार काष्ठांचा शिरिंहुनी ॥ दिधल्याच चतुर्दश विद्या तैं आपणाला ॥ गुरु–कृपें आमुचा सकळ मनोरथ पुरला ॥ ४ ॥ अति आवडिनें श्रीकृष्ण म्हणे भू–देवा ॥ मजसाठिं वहिनिनें काय धाडिला मेवा ॥ जरि पत्र पुष्प फल अर्पि धरुनियां भावा ॥ मनिं लाजुनियां मुनि कांहिं वदेना देवा ॥ चाल–शोधिल्या

तयाच्या चिंध्या सत्वरी ॥ पृथु देखुनियां आनंदे श्रीहरी ॥ मग भक्षियले बहु प्रेमें मुठभरी ॥ दुजि मुष्टि भक्षितां रुक्मिणिनें कर धरिला ॥ म्हणे प्रसाद द्यावा वांटुनियां सकलांला ॥ ५ ॥ हरि-आज्ञा घेउनि विप्र निघाला त्वरित ॥ मनिं म्हणे प्रभूनें आदर केला बहुत ॥ धनलाभें हरिचें स्मरण कधीं नच घडत ॥ म्हणवोनि हरीनें नच दिधलें मज वित्त ॥ चाल-देखोनि नगर सोन्याचें म्हणतसे ॥ न कळेच मार्ग चुकलों मी हें कसें ॥ ये स्थळीं सदन मम कोठें नच दिसे ॥ द्विज-कांतेनें निज कांत गृहाप्रति नेला ॥ समजला विप्र मनिं हरिच्या कर्तृत्वाला ॥ ६ ॥

[ ५५. यांत श्रीकृष्णाचा बालस्नेही विप्र सुदामा ह्याचें चरित्र आहे. मौंजीबंधन झाल्यावर रामकृष्ण सांदीपिनी गुरूच्या गृहीं अध्ययन करीत असतां सुदामा हाहि तेथें शिकण्यास होता. विद्या पूर्ण झाल्यावर जो तो आपआपल्या गांवास गेला. सुदामदेव विवाह करून संसारी झाला. त्याची प्रापंचिक स्थिति गरिबीची व संतति वैपुल्य तेव्हां त्याच्या बायकोस अत्यंत कष्ट पडत. तिनें त्यास एके दिवशीं द्वारकाधीश जो श्रीकृष्ण त्यास भेटून आपलें दैन्य दूर करावें असें सुचविलें व त्याचेबरोबर देण्याकरितां चार घरीं हिंडून मूठभर पोहे दिले. सुदामा द्वारकेस पोंचला. कृष्णानें त्याची उत्तम प्रकारें बरदास्त ठेविली, त्यानें आणलेले पोहे प्रेमानें भक्षण केले व सुदाम देवास सुवर्ण नगरी देऊन त्याचें दैन्य दूर केलें. सुदामचरित्र भागवतांत दशम स्कंधांत ८१ व्या अध्यायांत आलें आहे. ]

---

## ५६ प्रल्हाद-चरित्र

( चाल-शारदे दास कामदे०

श्रीहरी दीन उद्धरी किर्ति महिवरी गाति बहु ज्यासी ॥ अवतार नरहरी रक्षित प्रल्हादासी ॥ ध्रु० ॥ दैत्येश वदे पुत्रास गुरु-गृहीं वास करविला तुजसी ॥ बहु आनंदानें सांग काय शिकलासी ॥ अंकावर घेउनी त्यास चुंबि वदनास हर्ष चित्तास बहुत त्या दिवशीं ॥ कुरवाळी करानें पिता पुसत पुत्रासी ॥ चाल-परिसुनी पितृ-वच-

नासी मग असें ॥ आनंदें गोविंदासी गातसे ॥ रोमांचित तनुही त्याची होतसे ॥ नामाचा ऐकुनीं घोष त्रास दैत्यास मनिं म्हणे खास ठार करुं यासी ॥ मग अंकावरुनी लोटित प्रल्हादासी ॥ श्रीहरी० ॥ १ ॥ कुंडांत अग्नि तेजाळ निघति बहु ज्वाळ तयांमधि बाळ घातला बाई ॥ निःशंक मनें तो गोविंदासी गाई ॥ जाहला अग्नि मग शांत बहु कृपावंत रमेचा कांत सिंधु-जांवाई ॥ अग्नींत रक्षिलें नवल वर्णु तें काई ॥ चाल-पाहोनि मत्त गज पायीं बांधिलें॥ परि त्यानें गोविंदासी बाहिलें ॥ सागरोदरीं मग त्यासी बुडविलें ॥ परि कदा मरेना तदा चिंति प्रभु-पदा प्रेमभावेंसी ॥ असुरेंद्र मनामधिं युक्ति योजि मग कैसी ॥ श्रीहरी० ॥ २ ॥ तो दैत्य वदे मग स्त्रीस वचन हें परिस पुत्र मम अरिस नित्य स्मरतो कीं ॥ म्हणवुनी प्रिये त्या धाडिं यमाच्या लोकीं ॥ हें विष पाजिं पुत्रास पती-वचनास साच करिं लोकीं ॥ मग धन्यधन्य ती पतिव्रता अवलोकीं ॥ चाल-गहिंवरुनी बोले कांता प्रियकरा ॥ मम हस्तें वधितां कां हो लेंकरा ॥ करुनियां कृपा कोपातें आवरा ॥ प्रल्हाद म्हणे मातेस देइं मज वीष मोह-पाशास कासया भुलसी ॥ हरि उपेक्षील कां शरण गेलिया त्यासी ॥ श्रीहरी० ॥ ३ ॥ मग सद्गद जाहली माय मनिं म्हणे हाय नष्ट हा काय होइना माझा ॥ करि दुर्घट आज्ञा मम प्राणांचा राजा ॥ मग पाजि राजसा वीष चिंति जगदीश म्हणे तूं यास रक्षि महाराजा ॥ न लगेच विनंती धांवसि भक्ताकाजा ॥ चाल-विष ओकुनि प्रल्हादासी येतसे ॥ बहु कोपें दैत्य तयासी पुसतसे ॥ तव रक्षक कवणे ठायीं वसतसे ॥ सर्वांच्या हृदयीं असे नेणसी कसें स्थिरचरीं वसे व्यापि जगतासी ॥ तूं रिता तयाविण ठाव दाखवीं मजसी ॥ श्रीहरी० ॥ ४ ॥ मज वृथा वाटते सुता सांगसी कथा बहुत त्या अरिची ॥ पाहीन प्रचीती सत्य तुझ्या त्या हरिची ॥ सर्वत्र व्यापि भगवंत असेल स्तंभांत म्हणवुनी लाथ हाणिली साची ॥ स्तंभींच प्रगटली मूर्ति नारसिंहाची ॥ चाल-दैत्यासी घेउनि अंकीं फाडिला ॥ तंव अंजलि दैत्य-वधूनें जोडिला ॥ निजपदीं भक्त म्हणुनी त्या धाडिला ॥ तंव देखे प्रल्हादास करी स्मितहास म्हणे ये

बैस अंकिं मजसरसी ॥ बहु धन्य सुदिन तो प्रसन्न नरहरि ज्यासी ॥ श्रीहरी० ॥ ५ ॥

[ ५६. भागवतोत्तम प्रल्हाद ह्याची कथा सर्वश्रुत आहे. श्रीविष्णूचे द्वारपाल जय विजय ह्यांस सनत्कुमारादि ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांचा शाप झाल्यामुळें तीन जन्म असुरयोनींत घ्यावे लागले. पहिला जन्म हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु ह्या नांवानें झाला. त्यांपैकीं हिरण्याक्षाचा वध श्रीविष्णूनें वराह अवतारांत केला. भ्रातृवधामुळें हिरण्यकशिपूनें विष्णूशीं द्वेष आरंभिला व उग्र तप करून सामर्थ्य व अमरत्व मिळविलें व उन्मत्त होऊन तीनही लोकांस तो त्रास देऊं लागला. परंतु त्याचा मुलगा प्रल्हाद हा बापाच्या उलट निघाला. बाप विष्णूचा द्वेष करणारा तर मुलगा विष्णूस दैवत मानून त्याची उपासना करणारा. मुलास ह्या गोष्टीपासून परावृत्त करण्याचे हिरण्यकशिपूनें बरेच प्रयत्न केले. परंतु त्याला यश आलें नाहीं. तेव्हां त्यास ठार मारण्याचे अनेक उपाय योजिले. परंतु परमेश्वर रक्षण करणारा यामुळें दैत्याचें कांहीं चालेना. पुढें त्यानें प्रल्हादास तुझा रक्षणकर्ता कोठें आहे म्हणून विचारिलें. त्यानें परमेश्वर सर्वत्र आहे असें उत्तर दिलें. तेव्हां ईश्वर जर सर्वव्यापी तर ह्या खांबांत आहे काय असें विचारून हिरण्यकशिपूनें दरबारांत असतांना एका खांबावर लत्ताप्रहार केला. त्याबरोबर स्तंभांतून एक भयंकर शब्द होऊन नरहरिरूपानें ईश्वर प्रगट होऊन हिरण्यकशिपूस मांडीवर घेऊन त्याचा वध केला. ]

---

## ५७ श्रीशंकराचार्य जन्म

( चाल—उद्धवा शांतवन करजा० )

कैलासवासि शिव भोळा ॥ कलियुगामाजि अवतरला ॥ ध्रु० ॥ शिवगुरु या नामें होता ॥ विप्रोत्तम केरळ देशीं ॥ तद्भार्या आर्या अंबा ॥ केवळ जी सद्गुणराशी ॥ सन्मार्गें वर्तति दोघें ॥ परि चिंता एक तयांसी ॥ चाल—पुत्र—मुख अजुनी कांहीं ॥ नच देखियलें नयनांहीं ॥ निशिदिनीं काळजी वाही ॥ नच सुगती सुतहीनाला ॥ कैलास० ॥ १ ॥ सुत प्राप्तीस्तव द्विज गेला ॥ सांबालयिं अंबेसहित ॥ आराधन करुनी केला ॥ तो प्रसन्न गिरिजाकांत ॥ शुद्ध भाव देखुनि त्याचा ॥ प्रगटले सांब

स्वप्नांत ॥ चाल-वर माग असें प्रभु म्हणतां ॥ शिवगुरु हर्षला चित्ता ॥ मग म्हणे पुत्र दे ताता ॥ तुजसम जो वंद्यचि सकलां ॥ कैलास० ॥ २ ॥ येईन मीच तव उदरीं ॥ वरदान ऐकिलें कानीं ॥ द्विज जागृत झाला तेव्हां ॥ श्रीसांब दिसेना नयनीं ॥ अंग्नेस वृत्त हें कथुनी ॥ उभयतां येति परतोनी ॥ चाल-जाहली गरोदर कांता ॥ धर्मशास्त्र आणुनि चित्ता ॥ डोहळे जाहला पुसता ॥ द्विज तेव्हां निज भार्येला ॥ कैलास० ॥ ३ ॥ पांघरुनी भगवीं वस्त्रें संन्यास-धर्म सेवावा ॥ आवडे हेंच मम चित्तीं ॥ सन्मार्ग जनां दावावा ॥ इतुकेंच वदुनियां साति ती ॥ शिवभजन करितसे तेव्हां ॥ चाल-कैलासवासि अवतरती ॥ जाणुनियां ऐसें चित्तीं ॥ इंद्रादिक सर्वहि येती ॥ करिताति गर्भ-स्तवनाला ॥ कैलास० ॥ ४ ॥

[ ५७. हें व पुढील गाणीं महीपतीच्या संतचारित्रात्मक ग्रंथांतून निवडलेल्या आख्यानांवर रचलेलीं आहेत. कलियुगाचे आरंभीं आर्यधर्मावर आंतून व बाहेरून असे दुहेरी हल्ले सुरू झाले तेव्हां धर्माचें उज्ज्वलस्वरूप कायम राखून लोकांस सन्मार्ग-दाखवावा म्हणून केरल देशांत एका ब्राह्मण कुटुंबांत शंकराचार्यांचा अवतार झाला. आचार्यांनीं मौंजीबंधन झाल्यावर सर्वविद्यांचें अल्पकालांत ग्रहण केलें. वेदांच्या अर्थासंबंधानें माजलेलीं पाखंड मतें यांचें खंडन करण्यासाठीं प्रस्थानत्रयीवर त्यांनीं भाष्यरचना केली. भरतखंडभर प्रवास केला व चार दिशेस चार मठ स्थापन करून वयाचे ३२ वे वर्षी आपलें अवतारकृत्य संपविलें. या गाण्यांत आचार्यांच्या मातुश्रीस झालेले डोहाळे वर्णिले आहेत. ]

---

## ५८ मैनावतीचा उपदेश

( चाल-तूं टाक चिरुनि ही मान० )

नरतनु व्यर्थ जाणार ॥ काळ खाणार ॥ रे मुला सांग तूं मला आपुलें स्वहित कधीं करणार ॥ ध्रु० ॥ चौऱ्यांशी लक्ष हे फेरे ॥ फिरतां श्रम झाले बा रे ॥ आतां तरि सावध हो रे ॥ गुरुराय करुनि घे साह्य तयाविण सोय कोण करणार ॥१॥ सुंदर हे मानव काया ॥

स्टेशन बघ आलें सखया ॥ श्रद्धेचें धन घेउनियां ॥ हरिभक्ति तिकिट घे त्वरित पहा हे सहा चोर अनिवार ॥ २ ॥ बहु परिच्या देखुनि सोई ॥ रमशील जरी या ठायीं ॥ वेड्या मग होइल घाई ॥ दंडाल शिपाई काळ तुला ती वेळ कठिण येणार ॥ ३ ॥ सद्गुरू कृपेची गाडी ॥ सत्स्वरुपीं नेउनि सोडी ॥ घे सर्व सुकृत गांठोडी ॥ हे भोग त्यजुनि घे जोग असा नच योग पुन्हा येणार ॥ ४ ॥ गुरु कोण असा मज दावी ॥ जो जन्म मरण हें चुकवी ॥ श्रीजालंधर गोसावी ॥ धरि चरण जाय त्या शरण तयाविण मरण कसें चुकणार ॥ ५ ॥

[ ५८. बंगालचा पराक्रमी राजा गोपीचंद हा ऐश्वर्य, विलास व नानाप्रकारचे भोग ह्यांमध्यें गढून गेल्यामुळें नर जन्माचें मुख्य कर्तव्य जें सद्गुरुद्धार आत्मज्ञान-प्राप्ति तें तो विसरला. त्याची आई मैनावती त्यास ह्या गोष्टीबद्दल उपदेश करीत आहे ]

---

## ५९ मिराबाइ चरित्र

( चाल–कटाव० )

ऐका हो ऐका आतां ॥ भक्तीला श्रीहरि भुलला ॥ ध्रु० ॥ मिराबाइचें चरित्र ऐका भूपकन्यका अन्य नसे इजसमान धन्यचि मान्य जहाली यदुकुलतिलका बाळपणापासुनियां बाळा श्रीगोपाळा लडिवाळपणें नाना परिमळद्रव्य घेउनी षोडश परिच्या उपचारांनीं पूजन करुनी श्याम मनोहर बघुनी लोचनीं मनों तोषुनी निजचरणीं घुंगुरें बांधुनी स्तुतिस्तोत्रें त्याचींच गाउनीं नृत्य करी निःशंक होउनी हें ऐकोनी संत साधु मग येति धांवुनी मिराबाइचें प्रेम पाहुनी म्हणती वदनीं धन्य त्रिभुवनीं हिचीच जननी प्रसवुनियां इजला ॥ १ ॥ ऐसें दिवस लोटले कांहीं थोर जहाली मिराबाई तंव नगरवासि जन बोलति काइ परिसा आतां वेड लागलें या नृपनाथा प्रौढ जाहली जरि निज दुहिता लग्न योजना न येचि चित्ता न करी चिंता न दिसे बरवें काय करावें कुणि सांगावें भूपालाची एक एकु-

लति न धरी भीति किमपी चित्तीं कुलस्त्रियेची न धरी रीती बैरागी जमवोनि भोंवतीं गाति नाचती टाळविणा घेउनियां हातीं ऐशाप- रिच्या उपहासाला परिसुनियां तो भूप कोपला पाचारोनी निज कांतेला सत्वर वदला काय करावें किति सोसावें जन आम्हांला ठेविति नांवें मिराबाइला शिकवावें त्वां लहान नव्हसि तूं आतां बाळे वेडे वेडे त्यजुनी चाळे राजपुत्र वरिं गे वेल्हाळे ते सुखसोहळे दावुनि आमुचे निववीं डोळे ऐशापरिनें बहु प्रेमानें कथितां नाय- किलें जरि मुलिनें तरि मग त्वांही मोह त्यजावा विष प्याला हा सवेंच न्यावा तिजला द्यावा बुडवी जी वडिलांच्या नांवा कशास व्हावा देह तिचा कवणाला ॥ २ ॥ असें ऐकतां मिराबाइची माता तेव्हां सद्गद झाली प्रिय कन्येच्या महालीं गेली प्रेममयी ती मूर्ति पाहिली हृदयीं धाली धांवुनि तेव्हां निज बाहूंनीं आलिंगोनी प्रेमाश्रूंनीं न्हाउं घातली चुंबुनियां मुख हरिखचि वाटे म्हणे कसें मम बाळ गोमटें लोक निंदिती खोटे नाटे दिसतें माझें दैव करंटें ऐक लाडके तूं तरि आतां आवडेल जो तुझिया चित्ता त्या राजसुता घालुनि माळा तो सुखसोहळा दावी नयनीं असें ऐकुनी मिरा बोलली सुहास्यवदनीं कथित्यें तुजला सत्यचि जननी अविवाहित मी नसेच अजुनी या घननीळा घालुनि माळा लग्नसोहळा जाहला आई तुझा जांवई शेष- शाई बघ त्रिभुवनसुंदर नयन मनोहर वंदिति ज्याला सकलहि सुरवर पीतांबर कसिला कांसे मौक्तिकमाळा हृदयीं विलासे दिनमणिसम तो कौस्तुभ भासे श्रवणिं कुंडलें मोरमुकुट शिरिं छत्र विराजे सह- जचि चित्त मोहिलें माझें नसे उपायचि माय म्हणे गे बये तूं भूपा- ळेला नातरि मुकलिस तूंहि आम्हाला आम्ही तुजला हा विषप्याला तव तातानें प्राण हराया तुजलागीं दिधला ॥ ३ ॥ विषप्याला तो घेउनि हातीं परम प्रीतिनें अवलोकुनि श्रीहरिची मूर्ती अश्रुपूर नयनांतुनि वाहाती म्हणे केशवा तूं तर माझा प्राणविसावा नाहीं मज देहाची परवा खंती इतुकिच वाटे देवा निंदितील जन तुझिया नांवा म्हणतिल याची करितां सेवा यमनगरीचा मार्ग पहावा परवां ती नृपकन्या मेली बहुत चांगली सेवा केली परि ती याला नाहीं

रुचली ऐशा परिची वाहतिल देवा तुज लाखोली असें वदोनी विष-
प्याला तो सकळहि प्याली हें पाहुनियां जननी भ्याली म्हणे कशी
मज पडली भ्रांती कन्या वधिली अपुल्या हातीं पापिण मजसम
नसेल जगतीं हाय हाय करूं काय म्हणुनियां भयभित चित्तीं लक्षि-
तसे मुख मिराबाइचें आनंदाचें स्थान सुखाचें नांवाचि नाहीं भय
शोकाचें हरिगुण वाचे वर्णुनि नाचे राधाकृष्ण जय कुंजविहारी
मुरलीधर गोवर्धनधारी मदनारि-प्रिय जय कंसारी संसारीं नच
तुजविण त्राता कमलाकांता कमलाक्षा कमलोद्भवताता भवभयहरणा
जय श्रीकृष्णा मत्स्यस्वरुपा वेदोद्धरणा कूर्मरूपिया किल्बिषहरणा
जगदाभरणा करुणाकर तूं वराहवेषें धरा उद्धरी वामनरूपें बळिचे
द्वारीं हात पसरिशी दान मागशी प्रल्हादाच्या हांकेसरसी स्तंभिं
प्रगटासि नरहरिरूपें कृपेनेंच मग तया उद्धरी सहाव्या अवताराची
थोरी जन्मुनि जमदग्नीच्या उदरीं परशूधारी झाला जननीचा
कैवारी क्षत्रिय दिसला तितुका मारी जय जय शरयूतीर-विहारी
दशरथनंदन जय रघुनंदन ताताज्ञेचें करुनी पालन जाशि वनाला
मारुनि तेव्हां दशवदनाला सुरसमुहाला मुक्त करोनी सुखवी
सकलां यापरि लीला अखिल जगाला जी उद्धारी जयजय यमुना-
तीरविहारी पतितपावना जय पुतनारी अघबकहनना खलसंहारी
व्रजवनितांचे गोरस चोरी मानस हारी सवंगड्याची खाशि
शिदोरी कालियमर्दन जय गोपाळा गोकुळपाळा नंदबालका
विधिच्या जनका विश्वपाळका कृपा करोनी बौद्ध कलंकी रूपा
धरिसी भक्तसखा तूं गणगोतहि तूं प्राणेश्वर तूं तुजविण कोणी
अन्य नसे मजला ॥ ४ ॥ ऐशापरिनें बहुप्रेमानें मिराबाइनें गाउ-
निया स्तुतिस्तोत्र हरीचें वक्त्र विलोकीं नवल वर्तलें एकाएकीं
बरवी मूर्ति हिरवी पाहतां विस्मित चित्ता ती नृपदुहिता भूपालासी
कळली वार्ता धांवुनि आला चमत्कार निजनयनिं पाहिला सद्गद
जाहला अनुतापाच्या उदकें न्हाला छळिलें व्यर्थ म्हणे कन्येला
धन्य मिरे तूं उद्धरिलें त्वां मम वंशाला विनवुनि आतां गिरिधर-
प्रभुला मूर्ति दावी पहिल्या ऐसी मिरा म्हणे वृंदावनवासी शोषि-

यली पूतना राक्षसी बाळपणींची लीला ऐसी परि त्या समयीं विषबाधा तुज जाहली कांहीं यमुना डोहीं अही कालिया यादव-राया पायांतळिं तो तुवां मर्दिला त्या समयाला जाहली नाहीं तुज विषबाधा श्री गोविंदा परमानंदा नंदनंदना गोकुळपाला हा विष-प्याला सर्वांगाला कैसा भिनला श्री घननीळा अघटित लीला दाविसि आम्हां मेघश्यामा वाढविसी भक्तांचा महिमा मिराबाइचा देखुनि प्रेमा पाहिल्या ऐसी जाहली मूर्ति मातापितरें सद्गद होती प्रेमाश्रु नयनांतुनि वाहती ऐशा परिची भक्ति तुझी दे हेच विनंती परम प्रीतिनें कृष्णाबाई मागतसे तुजला ॥ ५ ॥

[ ५९. मिराबाईचा जन्म रजपूत कुळांत झाला होता, भगवान् श्रीकृष्णाचे ठिकाणीं तिची प्रीति बालपणापासूनच जडली होती. श्रीकृष्णाच्या मूर्तीची षोडशोप-चारांनीं पूजन करणें, मूर्ती पुढें भक्तियुक्त अंतःकरणानें प्रेमानें गायन वादन करणें वगैरे गोष्टी रोज चालत. पुढें पुढें ठिकठिकाणची संत मंडळीहि जमूं लागली. आई-बापांनीं तिला आपल्या इच्छेप्रमाणें एखादा राजपुत्र निवडून त्यास वरण्यास सांगितलें परंतु मिराबाई श्रीकृष्णमूर्तीसच पतिदेव मानीत असल्यामुळें आईबापांचें सांगणें व्यर्थ ठरलें पुढें पित्यानें लोकनिंदा टाळावी म्हणून मिराबाईला तिच्या आई कडून विष पिण्यास दिलें. त्या विषाचा परिणाम मिराबाईवर न होतां कृष्णमूर्तीवर झाला. तेव्हां मिराबाईच्या भक्तीविषयीं सर्वांची खात्री पटली. ]

---

## ६० सखूबाई चरित्र

( चाल—वारी संकट हरि० )

प्रेमें सखु—चरिता श्रवण करावें ॥ गाइन मी भावें ॥ ध्रु० ॥ क्षेत्र करवीर कृष्णातीरीं । विप्र दुराचारी । नांदे आनंदें सहपरि-वारी । ऐका नवल परि । सद्गुणसरिता सून सखुबाई त्या विप्राला लाभलि दैवें ॥ प्रेमें० ॥ १ ॥ करितां दिनरजनी गृहींचा धंदा । आठवि गोविंदा । सासू कटु वचनें बोलुनि बहुधा । नेदी सौख्य कदा । पोटभरी तिस नेदिच अन्न रात्रंदिन गृहकृत्य करावें ॥ प्रेमें० ॥ २ ॥ आली आषाढी एकादशी । जाइन पंढरिसी

आलें सखुबाईच्या चित्तासी । पाहुं विठ्ठलासी । कृष्णा-तिरिं घागर ठेवोनी यात्रेसंगें तैशिच धांवे ॥ प्रेमें० ॥ ३ ॥ सखुच्या सांगातिणी होत्या तेथ । गृहिं आल्या त्वरित । सखुच्या सासूला सांगति मात॥ सखु झाली संत । वारकऱ्यांचा हस्त धरोनी यात्रेसंगें गेली पाहावें ॥ प्रेमें० ॥ ४ ॥ क्रोधें पुत्रासी कळवी वृत्त । तोही संतप्त । आला यात्रेच्या समुदायांत । सखु देखुनि तेथ । मारित हाणित सदनीं आणी त्या दुःखासी किति वर्णावें ॥ प्रेमें० ॥ ५ ॥ पंधरा दिन जाइल यात्रा ऐसी । तोंवरि या सखुसी । ठेवूं बांधुनियां दृढ खांबासी । जाइल मग कैसी । मांसामध्यें रुतलिं चऱ्हाटें म्हणती बंधन केलें बरवें ॥ प्रेमें० ॥ ६ ॥ बोले सखुबाई श्रीभगवंता ॥ पंढरिच्या नाथा ॥ ऐसें आलें जरि तुमच्या चित्ता ॥ कोण मला त्राता ॥ अंतरलें तव पाय पहाया पंढरिराया काय करावें ॥ प्रेमें० ॥ ७ ॥ हेतू तव दर्शनिं बहुताचि होता ॥ ठावें तव चित्ता ॥ पतितपावना रुक्मिणिकांता ॥ अवघी तव सत्ता ॥ देह जावो अथवा राहो एक वेळ तव रूप पाहावें ॥ प्रेमें० ॥ ८ ॥ चित्तीं गहिंवरला पंढरीनाथ ॥ कौतुक करी तेथ ॥ सखुच्या सदनासी आला त्वरित ॥ रूप तिचें धरित ॥ सखू पुसे तूं कोण ग बाई नाम विठाई हें जाणावें ॥ प्रेमें० ॥ ९ ॥ बोले श्रीविठ्ठल सखुबाईला ॥ जाई पंढरीला ॥ ठेवीं तुज ऐसी बांधुनि मजला ॥ पाहिं विठ्ठलाला ॥ सखू म्हणे गे माय विठाई तव उतराई कैसें व्हावें ॥ प्रेमें० ॥ १० ॥ गेली पंढरिसी सखुही जाणा ॥ कळलें नच कवणा ॥ नयनीं देखुनियां यादवराणा ॥ भाकितसे करुणा ॥ पुनरपि घालुं नको संसारीं इतुकें श्रीहरि मजला द्यावें ॥ प्रेमें० ॥ ११ ॥ प्रेमें मिठि घालित विठ्ठल-चरणीं ॥ कुडि पडली धरणी ॥ कृष्णा-तिरवासी ब्राह्मण कोणी ॥ ओळखिलें त्यांनीं ॥ सखुच्या प्रेता दिधला अग्नि म्हणती सार्थक झालें बरवें ॥ प्रेमें० ॥ १२ ॥ राणी रखुमाई चित्तीं विचारी ॥ कोठें श्रीहरी ॥ सखुच्या नवऱ्याची होउनि नारी ॥ गृह धंदा सारी ॥ निजभक्तांचें काज कराया लाज न धरितो काय करावें ॥ प्रेमें० ॥ १३ ॥ प्रेमें उठवुनियां सखुला सांगे ॥ गृहिं अपुल्या जा गे ॥ कोणी कधिंही तुज भरति न

**रागें ॥ मम वचनीं वागे ॥ कृष्णा-तीरीं आली सखूबाई नूतन सखुही तेथें पावे ॥ प्रेमें० ॥ १४ ॥ यात्रा तव धर्मे घडली पाहीं ॥ बोले सखूबाई ॥ हृदयीं आलिंगुनि माय विठाई ॥ पदिं ठेवी डोई ॥ गुप्त जाहली माय विठाई सखुबाई निजसदना पावे ॥ प्रेमें० ॥ १५ ॥ ज्यांहीं जाळियलें सखुचें प्रेत ॥ द्विज सदनीं येत ॥ मेली सखु ऐसें कथिती वृत्त ॥ सखु देखिलि तेथ ॥ विप्र म्हणति हें अघटित झालें केलें हरिनें कौतुक बरवें ॥ प्रेमें० ॥ १६ ॥ वार्ता ऐकुनियां म्हणती सत्य तो पंढरिनाथ ॥ कैंची सखु तोचि श्रीभगवंत ॥ कष्टविला बहुत ॥ आम्हां पासुनि घडलें अनुचित त्यासिच आतां शरण रिघावें ॥ प्रेमें० ॥ १७ ॥ जाती नियमानें प्रतिवर्षासी ॥ सखुसह पंढरिसी ॥ प्रेमें वंदुनियां तो हृषिकेशी ॥ करिती स्तवनासी ॥ पतित-पावना दीनदयाळा तव चरणीं मम चित्त जडावें ॥प्रेमें०१८॥**

[ ६०. सखूबाई ही महाराष्ट्रांत कृष्णा कांठीं एका खेड्यांत राहत होती. लहानपणापासून श्रीविठ्ठलाच्या भजनाची आवड तिला होती. परंतु तिच्या सासूसासऱ्यास तिचें ईश्वरा विषयींचें प्रेम पसंत नव्हतें. त्यामुळें त्यांचेकडून तिला बराच छळ होत असे. एके समयीं तिचे गांवीं वारकरी मंडळी पंढरीस जाण्याकरितां आली व सखू नदीवर धुणीं घेऊन गेली असल्यामुळें त्यांची व तिची गांठ पडली. विठ्ठलदर्शनाची तिची फार दिवसांची इच्छा प्रबळ होऊन ती त्यांचे बरोबर निघाली. परंतु सासूला तिच्या जाण्याची बातमी लागून तिला पकडून आणलें व तिला शिक्षा करण्याकरितां एका खोलींत कोंडून एका खांबाशीं बांधून उपाशीं ठेविलें. तशा स्थितींत असतांना सखूनें विठ्ठलाचा धांवा केला. पांडुरंगानें स्त्री वेषानें तिची सुटका केली व तिला पंढरपुरास पाठविलें व आपण सखूचें रूप धारण करून तिच्या घरीं राहिला. इकडे सखू पंढरपुरास पोंचली व तिनें पांडुरंगाचें दर्शन घेतलें पांडुरंगाचे पायांवर मस्तक ठेवून स्वतःला संसारबंधापासून मुक्त करण्याबद्दल देवाची करुणा भाकली. आश्चर्याची गोष्ट कीं तिला त्यावेळींच मरण आलें. तिच्या गांवची कांहीं ब्राह्मण मंडळी तेथें होती त्यांस ही गोष्ट समजतांच त्यांनीं सखूच्या शवास अग्नि दिला. वारी आटोपल्यावर ती ब्राह्मण मंडळी परत गांवीं गेली तेव्हां त्यांनीं सखूच्या मरणाची बातमी तिच्या सासऱ्यास सांगितली. त्यास आश्चर्य वाटलें. व पांडुरंगाच्या कृपेचें व सखूच्या भक्तीचें कौतुक झालें व कांहीं चमत्कारानें सखू जिवंत होऊन परत आल्यावर सर्वजण तिजवर प्रेम करूं लागले. ]

॥ श्री ॥

# सचित्र सुमनांजलि

## भाग तिसरा

### ६१ मनास बोध

( चाल–अंजनीगीत० )

मना सज्जना ऐक विनंती ॥ तुझिये ठायींमाझी प्रीति ॥ जिवलग जिविंचा तूं सांगाती ॥ कथित्यें तुज सत्य ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीचे फेरे ॥ फिरतां श्रम तुज झाले बा रे ॥ आतां तरि तूं सावध हो रे ॥ सार्थक करि कांहीं ॥ २ ॥ सुकृत वेंचुनी बहु दिवसांचें ॥ स्टेशन दिसलें नरदेहाचें ॥ तिकिट काढुनी हरिभक्तीचें ॥ मजला त्वां द्यावें ॥ ३ ॥ विपुल नसे रे धन श्रद्धेचें ॥ तिकिटकाढाया भक्तीचें ॥ कामक्रोधादिक चोरांचें ॥ वाटे भय चित्तीं ॥ ४ ॥ गुरुकृपेची सुंदर गाडी ॥ मुक्तिपुरीला नेउनि सोडी ॥ पुरवीं माझी हेचि आवडी ॥ सखया मनराया ॥ ५ ॥ नानापरिच्या देखुनि सोई ॥ रमशिल वेड्या जरि ये ठायीं ॥ सत्ताधारी काळ शिपाई ॥ देइल घालवुनी ॥ ६ ॥ जोंवरि काळ शिपाइ न आला ॥ तिकिट काढुनी देई मजला ॥ जोडितसें बघ कर हे तुजला ॥ वेळ नको लावूं ॥ ७ ॥

[ ६१. या गाण्यापासून तिसऱ्या भागास सुरवात होते. या भागांत एकंदर २५ गाणीं आहेत. पैकीं दोन ( ७७ व ७९ ) कटाव आहेत. या गाण्याचे तीन प्रकार आहेत. पहिला–वर्णनात्मक म्हणजे ग्रंथ कर्त्रीच्या आयुष्यांत घडलेले व तिच्या अवलोकनांत आलेले प्रसंग यांचीं शब्दचित्रें. हीं ६ आहेत ( ७०; ७५ ते ७९ व ८१ ८३ ). दुसरा प्रकार बोध पर. अशीं गाणीं ६ आहेत. ( ६१ ते ६६ ). तिसरा प्रकार रूपकें. म्हणजे संसारांतील साध्या गोष्टी घेऊन त्यांचें अलंकारिक भाषेनें व

अशा वर्णनाच्या द्वारें भक्ति, ज्ञान यांचा बोध करणें हीं १० आहेत ( ६७ ते ६९ ७१ ते ७४ व ८०–८४–८५ ). या सर्व गाण्यांतून ग्रंथकर्त्रीचें कल्पनाचातुर्य, सूक्ष्मावलोकन, ईशदर्शनाची उत्कट इच्छा व प्रसाद हे गुण दृष्टिगोचर होतात. ]

## ६२ मनास उपदेश

( चाल–तूं टाक चिरुनि ही मान० )

**आतां पुरे पुरे अविचार ॥ करीं सुविचार ॥ हे मना ऐक सज्जना अशि तनू पुन्हा कशी मिळणार ॥ ध्रु० ॥ ईश्वरें दिली हे काया ॥ आपुलें स्वरुप वळखाया ॥ कां विषय भोग भोगाया ॥ हरिभक्त शोधुनी फक्त तत्पदीं विनत कधीं होणार ॥ १ ॥ नरदेह दिला अव्यंग ॥ भलभलते न करीं ढंग ॥ हरिभजनिं होय रे दंग ॥ विषयांचा त्याजिसि न संग सांग श्रीरंग कसा दिसणार ॥ २ ॥ मनराज अशी ही पदवी ॥ सखया तुज दिधली बरवी ॥ इंद्रियगण स्वाधिन ठेवीं ॥ विषयांत निशिदिनीं रमत कळेना घात कसा चुकणार ॥ ३ ॥ षड्रिपुंसी करुनी राजी ॥ श्रीहरिच्या भजनीं योजी ॥ यमराज दिवस बघ मोजी ॥ अवचीत धाडुनी दूत नेलिया स्वहित कसें करणार ॥ ४ ॥ सम पाप पुण्य हा पैका ॥ जाहली प्राप्त ही नौका ॥ भवपार करितसे कैकां ॥ नावाडी सद्गुरुराय तयाचे पाय कधीं धरणार ॥ आतां पुरे पुरे अविचार ॥ ५ ॥**

## ६३ जिव्हेस उपदेश

( चाल–मन माझें भ्यालें० )

**परिसें या बोला ॥ राम नाम वद निशिदिनिं रसने होइल सौख्य तुला ॥ ध्रु० ॥ न करीं आतां चुगली चहाडी ॥ कोठुनि जडली तुज ही खोडी ॥ नाम रसाची पाहसी न गोडी ॥ कैसा भ्रम झाला ॥ रामनाम० ॥ १ ॥ कवणें सांगितला तुज धंदा ॥ कां करिसी परक्याची निंदा ॥ भज भज भज श्रीगोविंदा ॥ परमानंदाला ॥ राम०**

॥ २ ॥ मधुर मधुर रस तुजला व्हावे ॥ पहिल्यापासुनि मज हें ठावें नाम रसासी घेउनि पहावें ॥ रुचेल बघ तुजला ॥ राम० ॥ ३ ॥ भलभलतें कां वदसी बाई ॥ कितितरि वेळां पडसि अपायीं ॥ सांगितलें नायकसी काई ॥ करुं तरि मी तुजला ॥ राम० ॥ ४ ॥

## ६४ जिव्हेची प्रार्थना

( चाल–उद्धवा शांतवन करजा० )

किति किति सांगु तुज रसने ॥ नायकसी मम वचनाला ॥ ध्रु० ॥ तव लाड पुरविले किति मी ॥ पुत्राचे जैसे जननी ॥ प्रिय तुजला जें जें व्हावें ॥ मेळविलें बहुतां यत्नीं ॥ तुजला जें न रुचे कांहीं ॥ दाविलें नसे कीं नयनीं ॥ चाल–ऐसें जरि केलें बाई ॥ झालीस बरी उतराई ॥ नायकसी माझें काइं ॥ वद म्हणतां हरिनामाला ॥ १ ॥ रुचि नेणे तुजविण कोणी ॥ सखये तूं चतुर शहाणी ॥ जगदीशें तुजला दिधली ॥ बघ कैशी सुंदर वाणी ॥ शिणतेसी व्यर्थ कशाला ॥ भलभलती बोलुनि कहाणी ॥ चाल–सखये कां झालिस मूढ ॥ कां तुला लागलें वेड ॥ श्रीरामनाम बघ गोड ॥ कशि आवड नुपजे तुजला ॥ २ ॥

## ६५ जिव्हेस प्रार्थना

( चाल–अर्जुना इतर मज कांहीं० )

ऐक ऐक रसने बाई ॥ प्रार्थितें तुला मी काई ॥ जिवलगे ॥ लागलें तुला जें गोड ॥ देवोनि पुरविलें कोड ॥ जि० ॥ हरिनामिं धरीं आवड ॥ इतुकीच मागत्यें जोड ॥ जि० ॥ चाल–श्रीराम वदें सप्रेम हाचि धरि नेम निशिदिनीं बाई ॥ इतुकेंच मला तूं देई ॥ जि० ॥ १ ॥ नाहींस सये तूं आळशी ॥ ठाउकें असे हें मजशी ॥ जि० ॥ भांडाया तत्पर दिससी ॥ जन–निंदा धांवुनि करिशी ॥ जि० ॥ मिष्टान्नीं किति वळवळसी ॥ हरिभजनीं मात्र कां चळसी ॥ जि० ॥ चाल–सर्वथा वदुं नको वृथा गाइं हरि–कथा भवव्यथा जाई ॥ कर्तव्य दुजें

तुज काई ॥ जि० ॥ २ ॥ बोलाया खोट्या गोष्टी ॥ आहेस पटाइत मोठी ॥ जि० ॥ परछिद्र देखुनी दृष्टी ॥ तुज धीर न धरवे पोटीं ॥ ॥ जि० ॥ हरि-भजन करायासाठीं ॥ विनवितां होसि कां कष्टी ॥ जि० ॥ चाल-श्रमलीस आतां ये बैस पुरवि मम हौस वसतसे हृदयीं ॥ नामामृत निशिदिनिं घेई ॥ जि० ॥ ३ ॥

---

## ६६ पंचविषय

( चाल-भूपती खरें तें वैभव सुख० )

रे मना सज्जना काय म्हणावें तुजसी ॥ स्वातंत्र्य गमवुनी स्वस्थपणें बसलासी ॥ ध्रु० ॥ हे पंचविषय तव सेवक पहिले असतां ॥ परि आज तयांची तुजवर चाले सत्ता ॥ कां आनंदानें खासि परांच्या लाथा! ॥ तुज खेद न किमपी काय करावें आतां ॥ चाल-ऐकेन हरीची लीला ये मनीं ॥ तों शब्द-विषय तंव पुढती येउनी ॥ कर्णासि बोलिला तेव्हां अडवुनी ॥ हीं सांगित पद्यें सुस्वर वाद्यें कैसीं ॥ रे बैस इथें तूं कीर्तनीं मौज न ऐशी ॥ १ ॥ वाटलें अंतरीं नमिन गोपिकोत्संगा ॥ तव स्पर्शसुखानें स्वाधिन केलें आंगा ॥ क्षणभरी वाटलें स्मरण करिन श्रीरंगा ॥ तंव नयनापुढती रसविषय करि दंगा ॥ चाल-हरिभजन करीना जिव्हा कधितरी ॥ रसविषय चालवी सत्ता इजवरी ॥ हा गंध विषयही छाळितो बहुपरी ॥ स्व-स्वाधिन होउनि संतसंग कधिं धरिशी ॥ वय व्यर्थ गमाविलें शरण जाय श्रीहरिसी ॥ २ ॥

---

## ६७ माझें सासर

( चाल-असा धरि छंद० )

मूळ धाडावें ॥ माहेरीं मजला न्यावें ॥ ध्रु० ॥ सासू कल्पना बहु खोटी ॥ न वदे केव्हां जिविंच्या गोष्टी ॥ निशिदिनिं मजला करिते कष्टी ॥ काय करावें ॥ माहेरीं० ॥ १ ॥ अहंकार हा सासुरा ॥ मद्यपि

ऐसा येतो घरा ॥ पाहतां होतो जीव घावरा ॥ धीर न धरवे ॥ माहेरीं० ॥ २ ॥ ऐका पतिराजाची मात ॥ काम नामें जगविख्यात ॥ परसदनाची अतिशय प्रीत ॥ किति सांगावें ॥ माहेरीं० ॥ ३ ॥ क्रोध भावोजी आंधळे ॥ भलभलते हे करिती चाळे ॥ यांच्या वचनें अंतर पोळे ॥ किति सोसावें ॥ माहेरीं० ॥ ४ ॥ लोभ भावोजी लोचट ॥ मद मत्सर हे दोघे धीट ॥ मोह भावोजीचा वीट ॥ येत स्वभावें ॥ माहेरीं० ॥ ५ ॥ आशा तृष्णा या पापिणी ॥ नणंदा माझ्या दोघी जणी ॥ यांची सोसेना जाचणी ॥ काय करावें ॥ माहेरीं० ॥ ६ ॥ जाउबाईही दुर्बुद्धी ॥ मजसी बोलेना कधिं सुधी ॥ सासू लागे इच्या नादीं ॥ काय हें बरवें ॥ माहेरीं० ॥ ७ ॥ भ्रांतिबाई गृहकामासी ॥ ऐका रीत तियेची कैसी ॥ किमपि न गणी मम वचनासी ॥ कसें सुख व्हावें ॥ माहेरीं० ॥ ८ ॥ शांति क्षमा बहिणी जरी ॥ येतिल बसाया कधि तरी ॥ संशय श्वान ठेविला द्वारीं ॥ बसबसां धांवे ॥ माहेरीं० ॥ ९ ॥ विवेकबंधु जरी येइल ॥ मजला माहेरीं नेइल ॥ मायबाप श्रीविठ्ठल ॥ कधीं मज पावे ॥ माहेरीं मजला न्यावें ॥ १० ॥

---

## ६८ माहेरचें मूळ

( चाल-शारदे दास कामदे० )

बहु दिवस असे मज हौस मायबापास पहावें नयनीं ॥ पाहतें वाट मज मूळ न ये कां अजुनी ॥ ध्रु० ॥ विख्यात असे मम तात असा श्रीमंत त्रिभुवनीं नाहीं ॥ पंढरपुरिं नांदे देखियला बहुतांहीं ॥ सकळांस तयाची आस परि मनीं त्रास म्हणेना कांहीं ॥ कर ठेवुनियां निज कटीं उभा विटेवर पाहीं ॥ चाल-हा देह अग्निरथ बरवा पाहिला ॥ मन हाच शिपाई तेव्हां बाहिला ॥ हरिस्मरण तिकिट काढाया लाविला ॥ संकल्प आणि विकल्प कल्पना कितिक दाटि बहु म्हणुनी ॥ नच मिळे तिकिट मग येइ पुन्हां परतोनी ॥ १ ॥ कर्णास सहज एक दिवस मिळाला पास श्रवणभक्तीचा ॥ वाटला

मला तो धन्य दिवस सोन्याचा ॥ इतुक्यांत ऐकिली मात त्याच मार्गांत वास चोरांचा ॥ सर्वस्व नेति लुटुनियां स्वभावचि त्यांचा ॥ चाल वैराग्य बहुत मोलाचें पातळ ॥ श्रद्धेची शिवली वेंडी निर्मळ ॥ ज्ञानाची शाल पहा ही दुर्मिळ ॥ सत्कर्म खवा हा नरम आवडे परम घेतला जपुनी ॥ माहेर दूर किति तरी दिसे परि नयनीं ॥ १ ॥ संगतीं क्षमा आणि शांति तशिच उपरती निघाल्या बाया ॥ पडलीच चुकामुक श्रम गेले कीं वांया ॥ अविश्वास म्हणे तव दास मजकडे पास देई ठेवाया ॥ चुकलीच गाडि हे तुझी चाल परतुनियां ॥ चाल-ही गाडी चुकली आतां यापरी ॥ दुसरी बहु उशिरां आहे यावरी ॥ जाहलें खिन्न मी माझ्या अंतरीं ॥ विठ्ठला नेशि कधिं मला ध्यास लागला हाच दिनरजनीं ॥ पाहतें० ॥ ३ ॥

## ६९ तुळसी वृंदावन



( चाल श्रीमंतपतीची राणी० )

सांडोनी इतर उपाधी ॥ तुळसीसि भजावें आधीं ॥ ध्रु० ॥ हें सुंदर नरदेहाचें ॥ वृंदावन किति मौजेचें ॥ पेरिलें श्र॰ण भक्तीचें ॥

गमे शांतिबीज तुळसीचें ॥ घालितें नित्य नियमाचें ॥ हें उदक पहा प्रेमाचें ॥ चाल-आजवरी पाहिली वाट ॥ अंकुर दिसेना नीट ॥ जाहली निराशा स्पष्ट ॥ धरिं धैर्य म्हणे सद्बुद्धि ॥ नको निराश होऊं आधीं ॥ १ ॥ करूं नको खंत इतुक्यांत ॥ ठाउकी नसे तुज मात ॥ हा क्रोध किडा बघ त्यांत ॥ अंकुर भक्षि दिनरात ॥ जरि त्याचा करिशिल घात ॥ पुरतील तुझे मग हेत ॥ चाल-हा क्रोध किडा नच हाले ॥ तुळशिचें रोप नच आलें ॥ वृंदावन वांया गेलें ॥ अशि पुढति न ये कीं संधी ॥ लागली जिवाला व्याधी ॥ २ ॥

---

## ७० संसार

( चाल-हरिची भगिनी० )

प्रिय भगिनींनो जरा आयका क्षणभर कोणी बोलूं नका ॥ प्रपंच धंदा करितां अपुलें अमोलिक वय जाय फुका ॥ ध्रु० ॥ प्रातःकाळीं चहा भुपाळी सडा सारवण त्याउपरी ॥ घाइ मुलांची मग शाळेची खावयास द्या लाडु पुरी ॥ दळण दळोनी मोट धुण्याची घेउनि धांवा नदीवरी ॥ दहा वाजले धुणें न झालें आलीं असतिल मुलें घरीं ॥ उपवासी जातिल कीं न कळे उशिर जाहला स्वयंपाका ॥ प्रपंच० ॥ १ ॥ कधीं नव्हे ते अवचित आले बडे पाहुणे कुणि-कडुनी ॥ चहा बिस्किटें सुंदर चिवडा शंकरपाळे द्या करुनी ॥ शिरा बरा साजूक तुपाचा कंदर्पाचीं भजिं तळुनी ॥ हार फुलांचे पान-सुपारी ठेवा तबकामधिं भरूनी ॥ देव तुळस आज काय कशाची तीन वाजले नच शंका ॥ प्रपंच० ॥ २ ॥ उष्टीं भांडीं जरि नच झालीं सख्या मैत्रिणी येति झणी ॥ परनिंदेची बहु प्रेमानें कहाणी सांगे एक कुणी ॥ लग्न कराया लहान अजुनि कां सोमभटाची ही चिमणी ॥ पति-सदनासी किमपि न राहे रमाबाईची ती सगुणी ॥ दुसरा नवरा करिल खरोखर देशमु-खांची ती लंका ॥ ३ ॥ रखमाईला पोर न झालें दुसरी केली तीच गती ॥ तिसरी चवथी तशाच मेल्या पहा काय ही कर्मगती ॥ जरि

पन्नाशी उलटुनि गेली मुली सांगुनी आल्या किती ॥ व्यसनाधिन तो असे थेरडा परि पैशांना नच कमती ॥ परनिंदेचें काय प्रयोजन निज पुण्याला व्यर्थ मुका ॥ ४ ॥ कारिन मंगळागौर सखीची ओले केले आज गहूं ॥ मनोरमेला मखर घातलें चोळि वेतली कधीं शिवूं ॥ दिपवाळी तर आलि उद्यांवर तूप शर्करा महाग बहू ॥ दिवे लागले तुह्मिच पहाना देवदर्शना काशि जाऊं ॥ देउळ राउळ काय कशाचें क्षणभर येथुन नच सुटका ॥ ५ ॥ निश्चित ठरलें लग्न ठकीचें ह्या यंदाच्या मार्गसरीं ॥ लोक बोलती ऐकियलें मी विहिण कैकई जणुं दुसरी ॥ पुरी फजिति मी करिन तियेची वाइट मजसम मीच खरी ॥ नको नको हा जन्म स्त्रियांचा जीव त्रासला खरोखरी ॥ सत्य सांगतें मीच तुम्हांला लग्न वगीचें करूं नका ॥ ६ ॥ कथा पुराणें जा ऐकाया सून सांगते सासूला ॥ छबडी छोटु न्याजि बरोबर क्षणभर येइल झोंप मला ॥ वटवट करितां स्पष्ट तुम्हांसी खरोखरी मम जिव श्रमला ॥ मुल खोडकर लक्ष ठेवुनी आणा जपुनी दोन्हि मुलां ॥ संसारांतुनि चित्त निघेना धर्म कराना एक रुका ॥ ७ ॥ पराधीन हें जिणें स्त्रियांचें सार्थक करणें काय कसें ॥ देह पराधिन असो बिचारा स्वाधिन अपुल्या चित्त असे ॥ विमल मनानें विमल-चरित हरि वदनीं गावा प्रेमरसें ॥ हरि-नामासम साधन सोपें खरोखरी या जगीं नसे ॥ भवसागर हा पार तराया हरिनामाची ही नौका ॥ ८ ॥ कुकल्पनेचा व्यर्थ पसारा प्रथम ठेविला आवरुनी ॥ काम क्रोध मद मत्सर अवघा केर काढिला चहुंकडुनी ॥ सुविचाराचा सुबक गालिचा हृदयमंदिरीं आंथरुनी ॥ रमाकांत भगवंत न ये कां स्वच्छ अशा या मनभुवनीं ॥ अल्प मती जरि या कृष्णेचा बोल खरोखर नच लटिका ॥ ९ ॥

---

## ७१ भाऊबीज

( चाल–प्रतिकूल होईल कैसा० )

भाउबीज माझ्या सदनीं हर्ष मनीं झाला ॥ दीनबंधु करुणासिंधु ओंवाळीन त्याला ॥ ध्रु० ॥ नवलपरिचीं नव पक्वान्नें करिन सये आजी ॥ श्रवणाचे शंकरपाळे कीर्तनकरंजी ॥ हरिस्मरण केली कैसी जिलबी ही ताजी ॥ चरणसेवनाचे लाडू वळुनि वाढुं त्याला ॥ भाउबीज० ॥ १ ॥ अर्चनाचे अनारसे वंदन चिरोटे ॥ दास्यत्वाचे केले कैसे घीवर गोमटे ॥ सख्यत्वाचा साखरभात भरियेलीं ताटें ॥ आत्मनिवेदन मांडे आवडती त्याला ॥ भाउबीज० ॥ २ ॥ कल्पनांचें कडवोळें तें नको तेलकट ॥ पंचविषय भाजणीचें नको थालीपीट ॥ काम क्रोध लोभाचें तें नको तिळकूट ॥ श्रद्धेचा हा रंगीत पाट मांडुं बसायाला ॥ भाउबीज० ॥ ३ ॥ भावार्थाच्या चांदीचें हें घडविलें ताट ॥ भूतदया रांगोळी ही लिहिली उत्कृष्ट ॥ शांति क्षमा गडवा पेला काय सांगुं थाट ॥ मननाचा करुनि विडा आधीं ठेवियेला ॥ भाउबीज० ॥ ४ ॥ सुबुद्धि या द्रौपदीनें करुनि ही तयारी ॥ पंचप्राण पंचारती ओंवाळिला हरी ॥ निदिध्यास नारळ हा दिला त्याचे करीं ॥ सुबुद्धि ही चोळी त्यानें दिली भगिनीला ॥ भाउबीज० ॥ ५ ॥ कधीं ऐशी भाऊबीज पाहेन नयनीं ॥ तळमळ वाटतसे रात्रंदिन मनीं ॥ हरिल ताप करिल कृपा जरी मोक्षदानी ॥ पुरविली हौस मनिंची करुनि कवनाला ॥ भाउबीज० ॥ ६ ॥

---

## ७२ परीक्षा

( चाल–हरिची भगिनी० )

प्रभुराया मी पडतें पायां दया करुनियां तारिं मला ॥ मायबाप तूं अखिल जिवांचा दया काय मग नये तुला ॥ ध्रु० ॥ नरदेहाचा मंडप साचा मर्त्य लोक हें मैदान ॥ विद्यार्थ्यांना नानापरिच्या सोइ सुखाच्या किति छान ॥ क्षुधा शांतिचे विश्रांतीचे तास

ठेविले ठरवून ॥ अल्प असे कीं फी येथींची पाप पुण्य सम द्रय होन ॥ आत्मज्ञान परीक्षा मोठी असे ठाउकी सकळांला ॥ १ ॥ भूतदयेचा पेपर पहिला पाहुनियां जिव घाबरला ॥ शांति क्षमेचे तसेच दुसरे मार्क न किमपी यांत मला ॥ समदृष्टीचा कठिण बहुत जो बहुतेकांना नच कळला ॥ कळेल कैसा काय मला तो मंदमतीची मी अबला ॥ आस असे परि खास मनींची पास करोनी घ्याल मला॥२॥ नरनारी हा भेद न येथें झटुनि करावा अभ्यास ॥ मनराया तुज करिन विनंती होऊं नको वा नापास ॥ एकवार फी भरली सखया मंडप दिसला तुज खास ॥ त्रास न मानुनि आस पुरविं मम करूनि घेइं नच उपहास ॥ नाहिं परीक्षा दुसरी आतां फसवुं नको वा यांत मला ॥ ३ ॥

---

## ७३ नवरात्र

( चाल–अनंत भगवंताचीं नामें० )

आश्विनमासीं प्रतिपदेसी हर्ष जाहला मनीं ॥ अंबिका बैसलि सिंहासनीं ॥ ध्रु० ॥ ब्रह्मविद्या आद्यशक्ति ही हृदयघटीं सुंदर ॥ वसवी सद्गुरु तो द्विजवर ॥ वैराग्याचें शेत तिजपुढें उगवति सत्वांकुर ॥ समई श्रद्धा सुमनोहर ॥ चित्तशुद्धिची वात त्यामधें ज्ञानतैल भरपुर ॥ कुबुद्धी काजळि करुं या दुर ॥ चाल-होवोनि शुचिर्भुत शुद्ध करुनि अंतर ॥ सद्भाव पाठ हा वाची मन द्विजवर ॥ नवविधा भक्तिच्या माळा किति सुंदर ॥ अहंकार बळि दिला इज-पुढें बोधशस्त्र घेउनी ॥ अंबिका० ॥ १ ॥ पंचविषय पंचामृत मिळुनी जगदंबा न्हाणिली ॥ क्षमेचें वसन शुभ्र नेसली ॥ भूतदयेची सुंदर चोळी आंगिं जिच्या शोभली ॥ शांतेची कुंकुम चिरि रेखिली ॥ नानाविध कल्पना फुलें हीं एक ठायिं मिळविलीं ॥ जनानिच्या पूजेला योजिलीं ॥ चाल-सर्वोपचार हे मनानेंच कल्पुनी ॥ दृढ भावार्थानें शिवशक्ती पूजुनी ॥ वर देती झाली अंबा मनिं तोषुनी ॥ निजपद दावी माय भवानी क्रोधमहिष मर्दुनी ॥ अंबिका० ॥ १ ॥

---

## ७४ हलवा

( चाल-हा भाद्रपदाचा महिना सुखकर० )

संक्रांत जवळ ही आली हलवा केला ॥ द्यावया सख्या श्रीहरिला ॥ध्रु०॥ सद्भाव तिळ हौसेनें अजि आणविले ॥ भ्रांतिचे खडे निवडीले ॥ सद्बुद्धि शर्करा शुभ्रचि पाहुनि घालें ॥ तिजसाठिं यत्न बहु केले ॥ चाल-कल्पना दुग्ध घालोनी ॥ द्वैताची मळी काढोनी ॥ ठेविला पाक गाळोनी ॥ झिझवोनि कोळसे केले पंच विषयांला ॥ द्यावया० ॥ ॥ १ ॥ आणोनि बदाम दयेचे लवंग विलाची ॥ दिसे शांति क्षमा हे साची ॥ लखलखित विरक्तिपात्र सिद्ध होतांची ॥ शेगडी त्रिविध तापाची ॥ चाल-साजणी ग हलवा झाला ॥ कांटा किति सुंदर आला ॥ नवविधा भक्तिचा दिसला ॥ सद्गुरु-बोध-प्याल्यामधिं हलवा भरला ॥ द्यावया० ॥ २ ॥ भगवंत वाटते खंत निशिदिनीं चित्ता ॥ कधिं येइल हलवा करितां ॥ कनवाळा दीन दयाळा बुद्धिचा दाता ॥ इतुकीच विनंती आतां ॥ चाल-हा हलवा करतां यावा ॥ प्रेमानें तुज अर्पावा ॥ दुसरा मज नलगे ठेवा ॥ प्रभुकृपा होय मग सोपा हलवा असला ॥ द्यावया० ॥ ३ ॥

---

## ७५ शंकर झालेला राम

( चाल-कधीं येइल सखये० )

सखयांनो नयनीं पाहुं चला ॥ रघुविर गंगाधर झाला ॥ ध्रु० ॥ मुकुट कुंडलें काढुनि वरवीं ॥ भार जटेचा शिरिं धरिला ॥ १ ॥ रुद्राक्षाच्या घालुनि माळा ॥ भाळीं झळके चंद्रकला ॥ २ ॥ वस्त्राभरणें त्यजुनि सकलही ॥ गजचर्मांबर पांघुरला ॥ ३ ॥ देखियली शिरिं जन्हु-कुमारी ॥ त्रिशूळ डमरु करिं धरिला ॥ ४ ॥ पार्थ वेष सौमित्रें धरिला ॥ जानकि झाली नगबाला ॥ ५ ॥ एकस्वरुप हे हरि हर परि मम ॥ जानकिचा वर मनिं भरला ॥ ६ ॥

---

## ७६ संतमालिका

( चाल–अनंत भगवंताचीं नामें० )

सद्भावानें श्रवण करा हो संत–चरित्रें बरीं ॥ जाहला भक्ताधिन श्रीहरी ॥ ध्रु० ॥ हिरण्यकशिपु प्रल्हादासी गांजित नानापरी ॥ प्रगटले स्तंभीं श्री नरहरी ॥ गजेंद्राचिया करुणावचनें गहिंवरले अंतरीं ॥ धांवुनी उद्धारिला तो करीं ॥ अंधसुतानें पंडुस्नुषेची सभेंत ओढिलि निरी ॥ जाहला अनंत वस्त्रें हरी ॥ चाल–भक्तीस भुकेला नलगे याती कुळ ॥ नामयासंगतीं जेवियला घननिळ ॥ निजकरें खुरपिले सांवतियाचे मळे ॥ कोठें काढी उच्छिष्टातें कोठें पाणी भरी ॥ १ ॥ ज्ञानीयाची भिंत अनंतें चालविली सत्वरी ॥ सखूस्तव रूप स्त्रियेचें धरी ॥ चोख्यासंगें श्रीरंगानें ढोरें ओढिलीं करीं ॥ विणियले शेले कबिराघरीं ॥ मिरेसाठिं श्रीधरें प्राशिलें विषही ते अवसरीं ॥ दळियलें दळण जनिच्या घरीं ॥ चाल–उदकांत तारिल्या तुकयाच्या हो वह्या ॥ दामाजिकारणें महार होवोनियां ॥ पुंडलिकासाठीं तिष्ठतसे अजुनियां ॥ मेहेत्यासाठीं जगजेठी तो सत्वर हुंडी भरी ॥ २ ॥ समर्थांचिया भावार्थासी जाणुनि रुक्मिणिवरें ॥ दाविलें रामरूप गोजिरें ॥ गोरोबाच्या भक्तीसाठीं गिरिधर प्रभु आदरें ॥ घडवितो मडकीं अपुल्या करें ॥ रोहिदासास्तव जगन्निवासें जोडे शिविले खरे ॥ खाजवी हय पार्थाचे वरें ॥ चाल–विकियलें मांस त्या सजन कसाया घरीं ॥ सेनयाकारणें नीच कार्य जो करी ॥ त्या नरहरिसाठीं शंभुलिंग शिरिं धरी ॥ अघटित लीला श्रीगोपाला वर्णूं मी किति तरी ॥ दयाळा पद दावीं सत्वरी ॥ ३ ॥

---

## ७७ कथेचें वेड

( चाल–कटाव० )

हरिकथा गोड लागलें वेड दिनरजनीं ॥ मोहमयी ही मुंबापुरनगरी । पाहतां इजसम नसेच दुसरी । नानापरि नवलाव देखुनी । मोह पडे चित्ताला भारी । चातुर्मासाचि आला आतां । हर्षेचि चित्ता काय

पाहातां सहा वाजतां कान्हेरे शास्त्र्यांची गीता ठाकुरद्वारीं राम
मंदिरीं चला सत्वरी कराल खोटी होइल दाटी तिळभर जागा न
दिसे दृष्टी लोटालोटी तसेंच वसतां लट्ठालठ्ठी वाया दिसती बहु-
तचि हट्टी तेथें वसुनी करिती गोष्टी आटाआटी करुनी येतां गीते-
साठीं शब्द न पडला कर्ण संपुटीं बहुताचि कष्टी चला तेथुनी गोरा
राम बघूं या नयनीं सुहास्य वदनी चापशरासीं करीं घेउनी वाट
पाहतसे उभा राहुनी हृदयीं ध्यावा बहुतचि बरवा वदनीं गावा पुढें
पाहतां विष्णूबोवा जिवा शिवाचा करिति निवाडा तेवढाच घ्या
ऐकुनि कानीं ॥ १ ॥ नमन करोनी चला सत्वर पुढें पहावें विठ्ठल
मंदिर दिसतें सुंदर रुक्मिणिचा वर उभा विटेवर कटावरी कर दिसे
मनोहर त्याचे चरणीं ठेउनिया शिर हर्षचि वाटे कीर्तन करिती
बोवा छोटे भक्तचरित लाविलें गोमटें पंढरपुर हें क्षणभर वाटे प्रेम-
पूर नयनांतुनि लोटे ऐशा परिचा रंग पाहुनी नका वसूं हो दंग
होउनी झपाझपा उचलाच पाउलें श्रीरामाचें मंदिर आलें रामकृष्ण
बोवांचें कीर्तन घ्या ऐकोनी मार्गावरुनी पडेल कानीं राउळांतरीं
पहा जाउनी भरली जागा उभे रहा क्षणभरी एक मग बसा रेटुनी
शुकमुनि सांगति परीक्षितीला जो का भक्त शिरोमणि पहिला
भागवतोत्तम म्हणती ज्याला ज्यासाठीं नरहरी प्रगटला नखें विदा-
रुनि ज्याच्या बाला कोप न शमला पुढें जावया विधि नच धजला
लक्ष्मीला तर कंप सूटला विनवुनि तेव्हां प्रल्हादाला पुढें धाडिला
भक्तराज तो किमपि न भ्याला निशंक गेला देखुनियां तो भक्त
चिमुकला ये ये ऐसें सद्गद वदला हृदयीं धरिला आलिंगीला अंकीं
बसवुनि मुखावरोनी हात फिरवुनी शिर हुंगोनी कृतार्थ केला कथा
भाग या परी ऐकिला प्रेमपूर नावरे जनाला दुःख शोक नच शिवाति
मनाला त्या समयाला वाटे नच जावें सदनाला झाली आरती
नमुनि रघुपती चला पूढती चालुं नका पाहुनियां वरती मोटारीचा
बसेल धक्का एकाएकीं यमलोकाला होइल जाणें लोक बोलती
एकामेका कथाकामुका विमान आलें आम्हि पाहिलें बहुत चांगलें
दिसलें नयनीं ॥२॥ ऐशा परिच्या उपहासाला पात्र न व्हावें जपुनि
असावें दत्तमंदिरीं मात्र पुसावें तेथें कीर्तन आहे बरवें बाळकृष्ण

गोपाळ कृष्णसम गोमातेची प्रीती मोठी उपदेशाच्या सांगुनि गोष्टी धन मिळवी परि बांधि न गांठीं कृष्णा कांठीं गोशाळा बांधिली गोमटी सत्कृत्यचि हें पाहतां दृष्टी कोणी वंदिति कोणी निंदिति परि त्याची वाटेना खंती ऐशा परिच्या या बोवांचें कीर्तन ऐका बसल्या जागा धरुनि बायका नलगे अडका कडाकडीचें भांडण ऐका बोवा म्हणती पुत्र लाडका कीर्तन करितो नाहिंच शंका मायबहिणिनो जरा आयका चरित सांगतों बहुप्रेमाचें श्रवण भक्तिचें प्रेमाबाई नांव जियेचें श्रवण करितसे कृष्ण कथेचें भागवताचा स्कंद दहावा जीवाभावापासुनि ऐके परमकौतुकें खोडी केली यदुकुळातिलकें कोप नावरे नंदराणिला वनमाळी उखळासि बांधिला हातीं काठी घेउनि मोठी पाठीवरि मारीन म्हणोनी दटावीतसे जगजेठी भयभीत होउनी करकमलें मुखकमल झांकुनी अश्रुपूर वाहती लोचनीं बोले तेव्हां कोमलवचनीं मारूं नको गे मजला जननी खोडी न करीं आजपासुनी सांगतसें तुज शपथ वाहुनी नच जाइन परक्याचे सदनीं असें ऐकुनी सद्गदवचनीं प्रेमाबाई बोले तेव्हां काय सांगतां शास्त्रीबोवा पोथी आपुली बांधुनि ठेवा धांवा धांवा माझ्या श्रीकृष्णास सोडवा नंदस्त्रियेला नसेच परवा असें पाहतां लोक बोलती देवा देवा म्हातारीला वेड लागलें द्वापारीं जें चरित जाहलें हिच्या मनानें सत्य घेतलें थांबा थांबा आजीबाई न करा घाई तासिच चालली प्रेमाबाई कवणाचें ऐकेना कांहीं सुनिश्चयाला सत्फल येई शेषशाइनें कौतुक केलें नंद यशोदा गाइ गोंवळें तमाळ नीळें त्यावेळे तें गोकुळ सगळें तिला दावुनी कृतार्थ केली तल्लिन झाली हरिपद कमलीं प्रेमाबाई धन्य माउली ऐशापरि हे कथा चांगली श्रीकृष्णाच्या कृपेनेंच ही वदली कीं ही कृष्णेची जिभली उठोनि आतां साधू संतां करा मागणें प्रीती द्यावी हरिगुण गातां बोला आतां जय गोमाता कीर्तन झालें बारावरती दोन वाजले निघतां तेथुनि किंचित् मागें वळुनि पाहिलें देहासंगें चित्त न आलें कुठें हरपलें बहुत शोधिलें नच सांपडलें यावरि सुचलें कीर्तन रंगीं असेल घुसलें तेथें पाहतां अवचित दिसलें—चाल—गृहीं म्हणतां नच हाले उपाय केले परि नच बोले येइल तेव्हां येवो आतां असें म्हणोनी देह चालला निजावयाला अपुलाल्या सदनीं॥ ३॥

## ७८ कथेंचे वेड

( चाल–असा धरि छंद० )

लागलें वेड ॥ परिसोनि हरिकथा गोड ॥ ध्रु० ॥ सात वाजले हें ऐकोनी ॥ कामधंदा न दिसे नयनीं ॥ कैचें भोजन रुचतें सदनीं ॥ लागली ओढ ॥ १ ॥ नावडती कवणाच्या गोष्टी ॥ न सुचे काढाया गृहिं उष्टीं ॥ कीर्तन दिसों लागलें दृष्टी ॥ काय करुं तोड ॥ २ ॥ कोणी किति केला उपहास ॥ नच तेव्हां ये ऐकायास ॥ काय करावें या चित्तास ॥ धरी ना भीड ॥ ३ ॥ ऐसा नाद लागला जीवा ॥ म्हणतिल वाइट किंवा बरवा ॥ चित्तवृत्ती धरि ना परवा ॥ परि पुरो कोड ॥ ४ ॥ परिस विनंती हे प्रभुराया ॥ जोंवरि दिधली मज ही काया ॥ देई तुझेचि गुण ऐकाया ॥ नको दुजी जोड ॥ ५ ॥

---

## ७९ नाशीक येथील टिळकांच्या स्वारीचें वर्णन

( चाल–कटाव० )

मे महिन्याची तारिख बारा लहानथोरां वाटे कीं दिपवाळी दसरा असा न दुसरा पुण्यनगरिचा दिव्य हिरा जो मातृभूमिचा पुत्र लाडका जनकैवारी राष्ट्रपुढारी पहावयास्तव जिकडे तिकडे गडबड मोठी मार्गी दाटी हर्षभरित जन जाहले पोटीं चंद्र-चकोरा जैसी भेटी नातरि चातकास घनवृष्टी सुखसंतुष्टी गोष्टी झाली त्याच-परी हे उपमा मजला सुचे न दुसरी पहावया टिळकांची स्वारी कुलुपें लावुनि दारोदारीं करी कोण गृहकृत्यें तैशिच टाकुनि सारी धांवति नारी कडेवरी बाळकें गोजिरीं नानापरिच्या पोषाखानीं शृंगारोनी अलंकार घालोनी बहुपरि ऐशा परिची मौज पाहुनी आठवलें मज तैं द्वापारीं कृष्ण-मुरारी मथुरा नगरी कंसवधास्तव आली स्वारी तेव्हां त्या मथुरेच्या नारी पहावया गोवर्धन-धारी हर्ष अंतरीं तैशा परि हें गमे क्षणभरी नानापरिचीं सुस्वर वाद्यें टाळ्या टिपऱ्या बहु आनंदें नृत्य करिति कीं त्याच्या छंदें हर्षभरें जन जाहले वेडे सोडुनियां गाडीचे घोडे चढाओढिनें जुना पुराणा

देशभक्त जो सांभाळोनी हळुहळु नेती अश्व सुशोभित पुढें चालती लोकमान्य अवलोकुनि प्रीती जयजयकारें सकल गर्जती हर्षसमुद्रा आली भरती कडकडाट टाळ्यांचा करिती सद्गद चित्तीं प्रेमाश्रू नयनांतुनि वाहती कोणी करिती सुमन वृष्टि ती बाळें वदती कोमल वचनीं टिळक आम्हां नच दिसला नयनीं हांसुनियां तैं वदली जननी खूण सांगते ऐक बाळका देशभक्तिची माळ गळयामधिं स्वराज्यसाधन पगडी साजे दृढनिश्चय करिं तुरा विराजे प्रसन्न वदनीं गंभीर वचनीं असें ऐकुनी बाळ निघे तत्काळ तेथुनी मिरवणूक तें परतुनि येतां दिसे समस्तां लोकमान्य देखियला पुरता लहान थोरां हर्ष समस्तां सदनीं जातां नाना-परिच्या मारिति बाता स्वराज्य आतां येइल हाता काय पहातां कशास जन हो मागें सरतां बोल बोलतां सरला रस्ता नकळे काई कृष्णाबाई प्रभुचे पायीं करी विनंती स्वराज्य प्राप्ती हेत असे सकलांच्या चित्तीं तव सत्तेनें सकल वर्तती उचित असें तें खचित देउनी पुरविं मनोरथ प्रार्थितसे तुजला ॥ टिळकांची देखुनि स्वारी आनंद जनांसी झाला ॥

---

## ८० अक्कलकोट

( चाल–असा धारि छंद० )

मनाजी ऊठ ॥ बघ आलें अक्कलकोट ॥ ध्रु० ॥ शहरें देखुनि लहान मोठीं ॥ आला कंटाळा शेवटीं ॥ आतां उघडुनि पाहें दृष्टी ॥ हरितिल कष्ट ॥ १ ॥ शहरें देखियलीं जरि नाना ॥ म्हणसी झाल्या बहुत यातना ॥ हे ठायींची देखुनि रचना ॥ होशिल तुष्ट ॥ २ ॥ सोई येथींच्या उत्तम ॥ देखुनि तुजला जाहला भ्रम ॥ थोडा आहेरे मुक्काम ॥ ध्यानिं घे गोष्ट ॥ ३ ॥ आत्माराम येथिंचा भूप ॥ त्याची करुनी घे ओळख ॥ चुकेल चौऱ्यांशीची खेप ॥ होइल नष्ट ॥ ४ ॥ बहुतां जन्माच्या शेवटीं नरदेहाच्या अक्कलकोटीं ॥ येउनि व्यर्थ न व्हावें कष्टी ॥ प्रभुला भेट ॥ ५ ॥

---

## ८१ यशोदागोदोहन

( चाल–गड्यानों घ्या हरिच्या नामा० )

एक वेळ जाउनियां पाहावें ॥ यशोदा–गो–दोहन बरवें ॥ ध्रु० ॥ कितितरि शुभ्र सुवक गाय ॥ काढिते दुग्ध कृष्ण–माय ॥ पाहातां तल्लीन मन होय ॥ गमे हें गोकुळ कीं काय ॥ वाटे परतुनि नच यावें ॥ यशोदा० ॥ १ ॥ देखुनि कृष्णाचें चित्र ॥ भानाचि नुरलें क्षणमात्र ॥ हर्षे रोमांचित गात्र ॥ जाहले धन्याचि तैं नेत्र ॥ वाटे पुनः पुन्हा पाहावें ॥ २ ॥ घेतसे दुग्ध भरुनि वाटी ॥ जननिचें भय वागवि पोटीं ॥ यशोदा पाहे जंव दृष्टी ॥ भयाभित झाला जगजेठी ॥ नवल तें मजला नच वदवे ॥ ३ ॥ ऐसा देखावा पाहतां ॥ होइना निज नयनां परता ॥ भूलाचि पडली मम चित्ता ॥ किती तें वर्णन करूं आतां ॥ दिसलें गोकुळ आज नवें ॥ ४ ॥

---

## स्वप्न.

( चाल–कधिं करिती लग्न० )

रखुमाई–कांत बाई स्वप्नीं मी देखिला ॥ ध्रु ॥ मुकुट तो रत्नमय शिरीं ॥ कर कटावरी ॥ हार कितितरी ॥ तुळशिचे त्याला ॥ स्वप्नीं० ॥ १ ॥ तें दिव्य रूप देखुनी ॥ निवालें मनीं ॥ धन्य मानुनी ॥ घेई आपणाला ॥ स्वप्नीं० ॥ २ ॥ परि नाहीं चरण वंदिले ॥ भान हरपलें ॥ स्वप्न संपलें ॥ खेद बहु झाला ॥ स्वप्नीं ॥ ३ ॥ झांकिले नयन मग पुन्हा ॥ झोंप येइना ॥ चरण दाविना ॥ दीन अबलेला ॥ स्वप्नीं० ॥ ४ ॥

---

## ८३ चहा

( चाल–उद्धवा शांतवन करजा० )

मोहिलें चहाच्या पायीं ॥ मन वेडें झालें बाई ॥ ध्रु० ॥ निद्रेंतुनि जागृत होतां ॥ चित्तांत चहा ये प्रथम ॥ कर चरण चहाविण कांहीं ॥ नूठती कराया काम ॥ रसनेसी प्रिय बहु झालें ॥

हें दोन अक्षरी नाम ॥ चाल-चित्तास करी संतुष्ट ॥ देहाचे हरितो कष्ट ॥ भूलोकीं अमृत श्रेष्ठ ॥ यावरिष्ठ दुसरें काई ॥ मोहिलें० ॥ १ ॥ कवणाचे आले व्याही ॥ कवणाचे आले स्नेही ॥ प्रथम या चहाची घाई ॥ कुशलोत्तर पुसणें नाहीं ॥ जरि नको म्हणे रसना ही ॥ परि मोह सुटेना कांहीं ॥ चाल-अहो एक चहाचा पेला ॥ दृढ करितो मित्रत्वाला ॥ अनुभव हा बहुतेकांला ॥ लटिकें मी न वदें कांहीं ॥ मोहिलें० ॥ २ ॥ मैत्रिणी बसाया येती ॥ जरि चहा न केला पुढती ॥ घरिं जाउनियां बडबडती ॥ स्नेहादर लटिका गणिती ॥ अशि साखर किितिशी सरती ॥ परि तिजला न कळे रीती ॥ चाल-मी केवळ वदलें स्पष्ट ॥ जरि कोणी होतील रुष्ट ॥ व्हावया तयां संतुष्ट ॥ हा घोट चहाचा देई ॥ मोहिलें० ॥ ३ ॥

---

## ८४ मंगळागौर

( चाल-भोलानाथ दिगंबर० )

जयजय मंगलगौरी ॥ तारी आम्हां हिमनग-कुमरी ॥ ध्रु० ॥ मंगल-मय हा मंगळवार ॥ चंदन चौरंग केळीचें मखर ॥ कोमल पत्री सुमनें अपार ॥ अंबेची येईल स्वारी ॥ म्हणवोनी जमविल्या नग-रींच्या नारी ॥ जयजय० ॥ १ ॥ पूजन करुनी सर्वोपचारीं ॥ मंगल आरती उजळोनी वरी ॥ नैवेद्य दाविला विविध प्रकारीं ॥ चौघडा वाजतो द्वारीं ॥ त्रिभुवन-जननीची वर्णिती थोरी ॥ जय० ॥ २ ॥ अज्ञान केवळ अम्ही तव दासी ॥ सद्भाव ठावा नाहिं अम्हासी ॥ कवण्यापरिनें रिझवावें तुजसी ॥ पडियलों याच विचारीं ॥ खेळोनि सारिली रजनी ही सारी ॥ जय० ॥ ३ ॥ माय भवानी परिसावी विनती ॥ निरसोनी अमुची अज्ञान भ्रांती ॥ अक्षय सौभाग्य तव चरणीं प्रीति ॥ भवभीति तंव निवारी ॥ कृष्णेला तुजवीण गति नाहीं दुसरी ॥ जय० ॥

## ८५ मंगलागौरीची आरती

जयजय मंगलगौरी मंगलमय माये ॥ आरती ओंवाळूं तुज हिमनगतनये ॥ ध्रु० ॥ श्रावण मासामाजी अंबे तव थोरी ॥ तुजसाठीं जमवील्या नगरींच्या नारी ॥ निर्मळ मन-सुमनें हीं आणियलीं सारीं ॥ पूजन केलें प्रेमें नाना उपचारीं ॥ १ ॥ माणीकाचे दिवे रत्नांच्या ज्योती ॥ लटकी बोलों कैसी माये वचनोक्ती ॥ माणिक मोतीं रत्नें कैंचीं यापुढती ॥ आमुच्या देशाचे हे दुर्दिन काधिं सरती ॥ २ ॥ पूर्वी नृपतनयेनें पूजियलें तुजसी ॥ सौभाग्य देवोनी रक्षियलें तिजसी ॥ तिजऐसा सद्भाव नच आम्हांपाशीं ॥ कनवाळू नच कोणी माये तुज ऐशी ॥ ३ ॥ नृपकन्येसम आम्हां भक्ती बळ नाहीं ॥ तव यश कैसें गावें न कळे हें कांहीं ॥ घडिभरि तव पद-कमलीं मन नच स्थिर राही ॥ तुजविण कवण आम्हां तारिल भवडोहीं ॥४॥ दारिद्र्य दुष्काळ यांसी पळवावें ॥ सद्बुद्धि सौभाग्य सकलांसी द्यावें ॥ तव वरदानें अवघे सुखरुप जन व्हावें ॥ पुनरपि आमुचे आम्हां मंगल दिन यावे ॥ ५ ॥

समाप्त



# सार्थ श्रीदासबोध

भाषांतरकार— ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

पृष्ठें ७२५ आवृत्ति दुसरी, सोनेरी बाइंडिंग किंमत ४ रुपये

# सार्थ श्रीज्ञानेश्वरी

( मूळ श्लोक, वामनपंडितांची समश्लोकी व मोरोपंती आर्या यांसह )

भाषांतरकार— बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

पृष्ठें मोठीं ९०० .................. किंमत फक्त ३ रुपये

# सार्थ श्रीएकनाथीभागवत

भाषांतरकार— महाराष्ट्रभाषाचित्रमयर, कृ. ना आठल्ये.

पृष्ठें मोठीं १३५० सोनेरी बाइंडिंग ... किंमत फक्त ६ रुपये

# सार्थ श्रीतुकारामाची गाथा

भाषांतरकार— ह. भ. प. विष्णुबुवा जोग

पृष्ठें १६०० ... भाग १ व २ ... किंमत ६ रुपये

# सार्थ श्रीअध्यात्मरामायण

भाषांतरकार— भालचंद्र शंकरशास्त्री देवस्थळी

पृष्ठें ६२५ सुंदर ९ चित्रें, सोनेरी बाइंडिंग किंमत २॥ रुपये

केशव भिकाजी ढवळे, ( रामचंद्र बिल्डिंग ) गिरगांव—मुंबई

# ह. भ. प. ल. रा. पांगारकरकृत पुस्तकें.

| | रु. आ. |
|---|---|
| १ भक्तिमार्ग प्रदीप ( नवीन आवृत्ति १४ वी ) | ०–८ |
| २ सार्थ श्रीदासबोधः–( नवीन दुसरी आवृत्ति ) सुंदर सोनेरी बाइंडिंग पृष्ठें ७२५. | ४–० |
| ३ श्रीतुकारामचरित्रः–( नवीन आवृत्ति दुसरी ) हा वारकरी संप्रदायाचा रहस्यग्रंथच आहे. सुंदर सोनेरी बाइंडिंग पृष्ठें ४७५. | २–० |
| ४ श्रीज्ञानेश्वरचरित्र व ग्रंथविवेचन ( आवृत्ति दुसरी ) | १–८ |
| ५ मुक्तेश्वरचरित्र आणि काव्यविवेचन | १–० |
| ६ श्रीरामदासस्वामींचे समग्र ग्रंथ, पृष्ठें १०७५ सोनेरी बाइंडिंग | ४–० |
| ७ श्रीसमर्थ–ग्रंथभांडार यांत सटीप दासबोधाशिवाय बाकी समर्थांची सर्व कविता आली आहे पृष्ठें ६५० सोनेरी बाइंडिंग. | २–८ |
| ८ श्रीदासबोध–सटीप–( पृष्ठें ४२५ सोनेरी बाइंडिंग ) | २–० |
| ९ नवविधाभक्ति–यांत नवविधा भक्तीचें नऊ प्रबंधांत सविस्तर स्पष्टीकरण केलें आहे. आवृत्ति २ री. | ०–६ |
| १० भक्तिमणिमाला–मूळ भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रत्येक श्लोकाखालीं त्याचा कथासंदर्भ देऊन साधुसंतांच्या वचनाधारें त्यांचें सविस्तर वर्णन केलें आहे. | १–८ |

**केशव भिकाजी ढवळे,**
( रामचंद्र बिल्डिंग ) गिरगांव–मुंबई.

ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ४२३९

# श्रीरामविजयकथामृत

लेखकः— विठ्ठल जिवाजी नाडकर्णी.

श्रीधरस्वामींच्या श्रीरामविजय ग्रंथाचें हें सुबोध भाषांतर सरळ गोष्टींच्या रूपानें लिहिलें असल्यामुळें, बालवाचक, विद्यार्थी, व वारकरी भाविक स्त्री पुरुष यांस आवडेल अशी याची योजना केली आहे.

सुंदर चित्रें ६ कागद ग्लेज पृष्ठें २५० किंमत १२ आणे.

---

# श्रीहरिविजय कथामृत

सुंदर ६ चित्रें पृष्ठें २४० किंमत १२ आणे.

---

# श्रीभक्तविजय कथामृत

लेख[illegible], एम्. ए.

सुंद[illegible] १२ आणे.

REFBK-0004239

---

# सा[illegible]य श्रा[illegible]दाय देवे

( पदपाठ, अन्वय व अर्थ यांसह )

लेखकः— कृष्णाजी भास्कर वीरकर, बी. ए. ( आनर्स. )

कागद ग्लेज पृष्ठें ४८ किंमत ४ आणे

---

# सचित्र सुबोध आरती संग्रह.

सुंदर चित्रें, कागद ग्लेज, पृष्ठें ५२ किंमत ३ आणे.

[illegible]पये

[illegible]गिरगांव—मुंबई

केशव भिकाजी ढवळे